## जाहिर नोटीस

सर्वत्र साहू सावकार व इतर लोक यांसः—

मी या जाहिर नोटिशीनें कळवितो कीं, माझा मुलगा यासिनखां वा। अब्दुलखां रा. हाशमपूर (वडगांव) ता. जळगांव वऱ्हाड हा चैनी व पैशाची उधळपट्टी करणारा निघाला असून त्यांस ताळ्यावर आणण्यास पुष्कळ उपाय केले परंतु ते निष्फळ झाले. अलीकडेस तो कांहीं लोकांचे नादीं लागल्यानें तो कोणास माझी इस्टेट गहाण, खरीदी, अगर पट्ट्यानें देईल असा संभव आहे. तरी सर्वत्रांस या जाहिर नोटिशीनें कळवितो कीं, माझी सर्व इस्टेट माझ्याच ताब्यांत असून तिचा मी मालक आहे. वरील मुलाकडून कोणी माझी जिनगी वरील प्रकारानें लिहून घेतल्यास व त्यास कर्ज दिल्यांस त्याचा मी जबाबदार नाहीं व पुढें होणार नाहीं. या पुढें कोणत्याच सबबीवर त्यांस जे कर्ज दिले जाईल त्या कर्जाचा बोजा माझे इस्टेटीवर राहणार नाहीं. तसेंच चि. यासिनखां यांस ही आपले वतन नीट ठेवण्याबद्दल ताकीद देण्यांत येत आहे. क. ता. २६-१-१९१६

सही

अब्दुलखां वा।। रहमतखां मु. रा. हाशमपूर वडगांव तां. जळगांव (वऱ्हाड) द. खुद

नो. नं. ४९

## नोटीस

रा. रा. शामलाल बालचंद साहू दुकान तेल्हारे ता. आकोट

यांसः—

खालीं सही करणार यांजकडून नोटिस देण्यांत येते कीं, तुमचे दुकानचे ता. ४-८ १९१३ इ।। चे गाहाणखतावरून गोविंदा वा।। खंडु धोबी रा. तेल्हारे याचे कडेस घेणें आहे, त्याचा मी तुमचे दुकानचा हवाला घेतला. व रुपये घेण्या करितां तुह्मास दोन तीन वेळां ह्मटले परंतु तुह्मी रुपये देत नाहीं. करितां तुह्मास या नोटिशीनें मुद्दाम कळविण्यांत येते कीं, ही नोटिस पावल्यापासून ४ दिवसाचे आंत तुह्मी सदहू गहाणाचे रुपये व्याजासुद्धां माझे पासून घेऊन गहाणखत मजला परत द्यावें. तसें न केल्यास मी तुमचे पुढें होणारे व्याजाबद्दल व खर्चाबद्दल वगैरे जबाबदार राहणार नाहीं. उलट माझा खर्च तुह्मास द्यावा लागेल. कळावें. ता. २०-१-१९१६

सही

सुपड्या वा।। नारायण महार रा. तेल्हारे नि. खुद

नो. नं. ५०

## जाहिर नोटीस

नोटिस घेणार कोडीराम वा।। सखाराम महार महपती वा।। फकिरा महार व माधवबा वा।। यदू महार रा. सवंद्रा आकोला आकोट पैठ, यांसः—

खालीं सही करणार यांजकडून नोटिस देण्यांत येत आहे कीं, तुह्मी त्रीवर्गांनीं मिळून २ नोटिसा टपाल मार्फत दिल्या त्या पोहोचल्या. त्या नोटिशीवरून मी तुह्मास रकमा देण्याकरितां तगादा लाविला व अशा खोट्या नोटिसा कां दिल्या, वगैरे बद्दल विचारले असतां लोकांच्या सांगण्यावरून आह्मी असे केले असें सांगून माफी मागितली. रकमा चुकत्या करितो असें कबूल केल्यावरून मी तुह्मास दोन्ही नोटिशीचा जबाब दिला नाहीं. दिपवाळीनंतर रकम देण्यास तगादा केला. तुह्मी आज देतों उद्या देतो असें कबूल करून चाळविलें व नंतर जाहीर खबर नंबर ३६ ची नोटिस वतनदार प्रेस मधून दिली. वरून तुमचा माझी रकम बुडविण्याचा व माझे अब्रूस धक्का लावण्याचा तुमचा विचार दिसतो. तरी या नोटिशीनें तुह्मास कळविण्यांत येते कीं, तुह्मी ही नोटिस पावल्यापासून आठ दिवसाचे आंत तुह्मी त्रिवर्गांकडे असलेले दोन्ही दस्तैवजाची चुकती रकम मजला पोचती करून आपले दस्तैवज भरपाई करून घेऊन जावें. तसें न केल्यास मी या नोटिशीचे खर्चासुद्धां वरील रकमेची दिवाणी व खोटे नोटिशीबद्दल फौजदारी दावा करीन. कळावें. ता. २६-१-१९१६

सही

१ म्यानुबा उदा महार नि।। खुद

दस्तुर चतुरभूज जगुलाल

नो. नं. ५१


ॐ नमः श्रीगणेशाय.

## आर्यवनौषधींचा कारखाना:—मुर्डी.

**मदनामृतसंजीवनी.**

धातुवर्धक, अत्यंत कामोत्तेजक व पौष्टिक, वीर्यस्तंभक, रक्तशोधक, मनोत्साहक कांतिबुद्धिवर्धक, सुवर्णमाक्षिक, मौक्तिक, कस्तुरी व अनेक वनस्पतीमिश्र अद्भुत गुटिका.

यांच्या सेवनानें नपुंसकत्व, स्वप्नजन्य व इतर धातुपात, उन्हाळे इंद्रियशिथिलता कडकी, गर्भसंबंधी मुरलेले विकार, मूत्रसंकोच, धातूचा पातळपणा, स्त्रियांचे धुपणी छातींत रोग हात, पाय मूत्रमार्ग व नेत्र यांचा दाह, क्षय, पांडुरोग, मुलांची खर, जीर्णज्वर, अग्निमांद्य; मस्तकशूळ, मुळव्याधी, वातरोग, निद्रानाश, पित्तविकार बाळांतरोग, मधुमेह, जुनाट पर्मा, मुष्टिमैथुनानें आलेली कृशता इत्यादि अनेक विकार खात्रीनें बरे होऊन शरीर निरोगी, मजबूत व सतेज बनते. पचनशक्ती व स्मरणशक्ति भरपूर वाढून धातू व रक्त यांची शुद्धि, वीर्यस्तंभन व भरपूर कामोद्दीपन होतें, व मनास उल्हास देतात. दूध व जडान्न भरपूर पचूं लागतें. त्यांत उपयुक्त वनस्पतींचें मिश्रण केले असल्यामुळें त्यांत अपायकारक पदार्थ अगदीं नसून वरील विकारांवर अत्यंत गुणकारक आहेत, करितां गुणाबद्दल असंख्य सर्टिफिकिटें मिळाल्या व नित्य मिळतात. पथ्यसेवनाची गरज मुळींच नसून स्त्रिया, पुरुष व मुलें यांस पाहिजे त्या दिवसांत घेण्यास अत्यंत उपयोगी आहेत. एका रुपयाचे आंत मिळणार नाहींत. एकदम ४ रुपयांचावर । कितीही घेणारास टपालखर्च माफ आहे. चार रुपयाचें आंत घेणारा टपालखर्च ९ आणे पडेल. दर एकदम ३६ गो० १ रु० ७६ गो० २ रु० १६६ गो० ४ रु० २७६ गो० ६ रु० ५६० गो० १० रुपये.

१. **अपूर्व नेत्रांजन**—पानें वडस, सारा, फुलें, खुपऱ्या, बिंदु, काच, इ० नेत्रांचे सर्व विकार त्वरित बरे होऊन दृष्टि तीव्र व थंडगार राहते. या रोगास हें अंजन खरें रामबाण आहे. १।। तो. ड. १ रु.

२. **परम्यावर अपूर्व मिश्रण**—कोणत्याही नवा जुना पर्मा व तज्जन्य दाह. तिडाक, मुताची लाग, सकाच, पुयस्त्राव, रक्तस्त्राव इत्यादि विकार पथ्य नसतां सात दिवसांत जातात. तिडीक एका वटकेंत जाते. असे रामबाण औषध कोठेंच मिळत नाहीं. बा० किं० १ रु० १। भार २ रु० सर्व औषध व्हा० नें पाठवं.

सर्व सामानाचा मोठा क्याटलाग मागवावा. तो फुकट पाठवूं. औषधांत अपायकारक पदार्थ अगदीं नसून तीं पूर्ण खात्रीची असल्याबद्दल असंख्य सर्टिफिकिटें आहेत. याशिवाय मोठमोठे रोगांवर अनेक औषधें, ग्रंथोक्त रसायनें, भस्में, पाक, गुटिका आसवें, तेलें व सुगंधी अत्तरें वगैरे माफक दरानें मिळतात. अनु० ख० सो० ट० ख० वे० पडेल. रोखीनें किंवा व्ही. पी. नें पाठवूं. प्रकृतिमान कळविल्यास रोग्याचें निदान व चिकित्सा कळवूं.

**पत्ता:—मु० मुर्डी, पो० हर्णे. जिल्हा रत्नागिरी.** — **कृष्णशास्त्री पेंडसे वैद्य.**

ना० नं० २०



## Oriental Government Security Life Assurance Co., Ltd.

ESTABLISHED 1874.

HEAD OFFICE, BOMBAY.

**FUNDS almost 5 CRORES.**

INVESTED IN GOVERNMENT SECURITIES AND MUNICIPAL AND PORT TRUST BONDS.

*Claims paid* 4½ CRORES

## A Decennial Record of Progress.

| Year. | No. of Polices in force. | Existing Assurances. |
|---|---|---|
| 1884 | 4.823 | 1,59,25,200 |
| 1894 | 20,110 | 5 26,08,850 |
| 1904 | 43,356 | 8 88,02,223 |
| 1914 | 65,269 | 12,37,10,910 |

| Year. | Total Income. | Total Assets. |
|---|---|---|
| 1884 | 6,77,552 | 14,41,429 |
| 1894 | 4259,,607 | 94,49,971 |
| 1904 | 43,64,808 | 2,47,18,8 |
| 1914 | . 72,46,0 | 4,96,8650 |

### *SPECIAL FEATURES.*

Absolute Security—Low Rates—Liberal Conditions.
Forty years continuously increasing prosperity.
Ninety per cent of the entire Profits, after providing for the Reserve and divided among the Policyholders every 3 years.
Native Lives are accepted at the same rates as Europeans
Loans granted to policyholders at reasonable rates.
Prompt Payment of Claims.

***Influential and active agents wanted. Terms liberal.***

—:0:—

Full particulars, prospectus and proposal forms on application to:—

R. Paterson Brown, Manager — *A. C. Lal*, Branch Secretary. *C. P. Berar & Khandesh* NAGPUR.

N. N. 22


हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवाश्रमांत छापून प्रसिद्ध केलें.

Regd-No. N 150

# वऱ्हाडसमाचार.

Berar-Samachar.

वर्ष ५० ] आकोला——सोमवार तारीख ७ माहे फेब्रुवारी सन १९१६ ई० [ अंक ६

## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवीं ट. हां. ........ २ रुपये
वर्गणी आगाऊच घेण्याची वहिवाट आहे.

### जाहिरात

**मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक.**

ह्या बँकेंत खालीं दिलेल्या अटावर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर याच्या दरम्यान एक हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील आणि तो पैसा यापैकीं एकास अथवा जास्त इसमांस अगर यापैकीं मयताचे मागें राहील त्यांस काढतां येईल.

व्याज दर साल दर शेकडा तीन रुपयाप्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारावरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं. नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक } S. Clements,
आकोला ९।९।०९ } एजंट
नं १

**बाटलीवाला यांचें दंतमंजन.**

हें दंतमंजन मायफळाशीं कांहीं इंग्रजी औषधांचा वैद्यकीय रीतीनें मिश्रण करून बनविलें आहे. किं. ८४

**बाटलीवाल्याचें गजकर्णावर मलम.**

यानें गजकर्ण, कुजली, खरूज यांचा विकार एका दिवसांत नाहींसा होतो. किं. ८४

हीं औषधें सर्व औषधी विकणाऱ्या दुकानावर व डॉ. एच. एल. बाटलीवाला जे. पी. मु. वरळी लेबोरेटरी दादर, मुंबई यांजकडे मिळतात.

DR. H. L. Batliwala. Sons & Co Ltd
N. N. 3 Dadar Bombay.

## चांदीचीं भांडीं

नाशिक येथें तयार केलेलीं सर्व प्रकारचीं सुबक व घाटदार भांडीं आमचेकडे विक्रीस तयार असतात. भाव माफक व्ही. पी. नें अगर रोखीनें पाठवूं. मालाचे खरेपणाबद्दल ग्यारंटी देऊं.

**पुरुषोत्तम रामचंद्र वैशंपायन**
**रविवार पेठ नाशिक सिटी**
नो. नं. ४

### अतिशय पौष्टिक व स्तंभक
## विलासिनी वटिका.

शक्ती येण्याकरितां व ती कायम टिकण्याकरितां एकदां वापरा. पहिल्याच दिवशीं गुणाबद्दल औषध घेणाराची खात्री. किं० बाटलीस १२ आणे. पूर्ण गुणास ३ बा. अ. पत्रक सोबत.

सकळकळे अन्ड सन्स
शहर आकोला.

## नोटिशीचे दर

दर ओळीस दीड आणा.
हेडिंगच्या दोन ओळी धरल्या जातील.
नोटीस सुवाच्य असली पाहिजे.
**सूचनाः—** गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील. पापुढें येणाऱ्या नोटीसास स्पेशल चार्ज पडेल.

## विक्रीस तयार

आमचे छापखान्यांत दरखास्तीचे, वकीलपत्राचे, परत भरयाचे, लिस्टफार्म पर्च्यांचे व नकलेकारितां करावयाच्या अर्जांचे नमूने छापून तयार आहेत. ते आमचे छापखान्यांत कोणत्याही वेळीं विकत मिळतील.

वऱ्हाडसमाचार कार्यालय, } मॅनेजर
सदाशिवाश्रम, आकोला }

## श्री दत्तात्रय अलंकारालय
### कोल्हापूर

आमचे कारखान्यांत स्वतःचे देखरेखे-खालीं, मुद्दाम तयार केलेले उत्तम सोन्याचे सुबक दागिने—मंगळसुत्र साज, ठुशा-जोड, गुलाबाचीं फुलें, बिल्वदळी टीका, मुदी; अग्रफुलें साखीं व घागऱ्याचीं वगैरे सर्व जातीचा माल—तसेच चांदीच्या मासोळ्या, चाळ, उपकर्णी, तारें, वाट्या, गडवे, इत्यादि माफक दरानें मिळतील. आम्ही सर्व सोनें ग्याशनलचें शंभर नंबरी वापरीत असतों. व डागाचा उपयोगही नियमितच केलेला असतो. यामुळें जिन्नस पांढरे पडण्याची अगर वाईट निघण्याची भीति बाळगण्याचें मुळींच कारण नाहीं. आमचे जिन-साची लाख काढून वजन तोलून पाहावें. गिऱ्हाइकांची खात्री करून देण्यास आम्ही तयार आहों. व्यापाऱ्यास कमिशन मिळेल. ऑर्डरी प्रमाणें माल तयार करून देऊं, चांदी सोन्याचे खरेपणाबद्दल आम्ही जबाबदार आहों. माल रोखीनें अगर व्ही. पी. नें पाठविला जातो. ऑर्डरी बरोबर एक रुपया अगाऊ पाठविला पाहिजे.

श्रीदत्तात्रय अलंकारालय—कोल्हापूर
नो नं ६

### अस्सल अंगुरी.
## हिंग

केवळ एक आणा तो. पवित्र केशर १॥ तो. शुद्ध शिलाजीत. -॥- तो. खालिस कस्तूरी रु. २५ तो. तिब्वेती ममीरा रु. ३ तो.

**काश्मीर स्टोर्स श्रीनगर नं० ५**
नो० नं० २

### हिंदुस्थानावर अरिष्ट

हिंदुस्थानांतील रहिवाशांच्या पाठीस ज्वर व हिवताप यांचें अरिष्ट सदोदित लागलें आहे. पण त्याचा प्रतिकार करण्यास बाटलीवाला यांचें हिवतापाचें औषध व गोळ्या ह्या रामबाण आहेत. ताप किंवा शीतज्वर येणारसें वाटतांच हें औषध घ्यावें. किं. १ रु.

**बाटलीवाला यांच्या निस्तेज लोकांसाठीं शक्तिकारक गोळया**

हें औषध घेतल्यानें भागवटा, मेंदूचे श्रम, पौरुषनाश, अशक्तता व क्षयरोगाचें स्वरूप, त्याप्रमाणें अजीर्ण इ. इ. विकार ताबडतोब दूर होतात किं. रु. १८.

त्वरा करा. **जंगी लूट** अपूर्व लाभ
**जानेवारी अखेर खर्च माफ.**

उत्तम रंगदार निळीकाळी शाईच्या पुड्या पाव आणा दराच्या १०० रु. १। डायरी बक्षिस. पुडी २०० रु. २। कापडी डायरी. पुडी ४०० रु. ४ डायरी सोनेरी. इनाम न घेतां १००० पुडीस रु. ७॥

**गुण न आल्यास पैसे परत**

वृद्धपण टाकून तरुणत्व प्राप्त करून घ्या.

## तरुण मित्र पाक

किं० २ रु०

केस काढणारा रमेश सोप ३ वड्यांचे पेटीस रु. १ दोन पेट्यास १॥। रु. चार पेट्यास रु. ३ आग न होतां डाग पडणार नाहीं. उत्तम सुवासिक आहे.

**पत्ता** — दयाल्दास लालदास आ. कं.
जंगी स्टोअर बऱ्हाणपूर
नो. [illegible]

# कौतुकरत्नाकर

**छिन्नमस्तानी धुमावती; मातंगी भैरव षोडश देवतांचे चित्रांसह**
**पृष्टसंख्या ६००; विषय ६०० वर आवृत्ती ५ वी. प्र. २००००,**

बंगाल्यांतील कामरूपदेशी ही विद्या फार प्रबळ असून तिकडील जटेली, लंगोटि, छाछुं करणारे अज्ञानवादी यांचेकडून खरी माहिती मिळवुन सिद्धनागार्जुन मंत्र महोदधि, महानिर्वाणतंत्र उड्डीश वगैरे ग्रंथाचे आधारें हा भानुमती ग्रंथ तयार केलेला आहे. ह्याच धर्तीवर प्रसिद्ध झालेल्या इंद्रजाल, जादुबाई इतरसंग्रह, कौतुकचिंतामणी, किमिया, गुप्त गारुडी विद्या वगैरे पुस्तकांचा ह्याचेपुढें हिशेब नाहीं. यांत कोणते विषय आहेत याचा विस्तार कळविणें फार कठीण आहे. मंत्र तंत्र व यंत्र विधिपूर्वक करणें नियम प्रहारिकांचीं वर्णनें भानुमती यंत्र वशिकरणशास्त्र नानाप्रकारचे स्तंभन प्रयोग, उच्चाटन, जारण, मारण प्रयोगविधि, औषधी हुन्नर, नानारंग कला, आत्मविद्यामेस्मेरिझम प्रयोगविधि वगैरे अनेक विषय आहेत. किं. ट. व्ही. पी. सह १॥ रुपया.

# कोकशास्त्र अथवा जीवनसौख्य.

ज्यांना खरोखरीच सौख्य भोगणें आहे त्या प्रत्येकांनीं हें पुस्तक अवश्य संग्रही ठेवावें. या पुस्तकांत कोणते विषय आहेत हे पुस्तकाच्या नांवावरून सहज समजण्याजोगें असल्यामुळें त्याचें वर्णन करणें नको. किंमत १ रुपया ट. ख. २ आणे.

पत्ता:— गंगाधर आर. आणि कंपनी.
हरिश्चंद्र बिल्डिंग मुंबई नं. ४
नो. नं. ७

## नोटीस

शेख ममदु वल्लद बाबा भाई मुसलमान रा. बोरगांव मंजू ता० आकोला

यांसः—

खालीं सही करणार इजकडन नोटीस देण्यांत येते कीं माझे मालकीची कजबे बोरगांवमंजू ता० आकोला येथील स्थावर शेतें वहितीस केली ती येणेंप्रमाणें:—

| स. नं. | ए. गुं. | आ. रु. | हिस्से |
|---|---|---|---|
| ६६८/१ | ५८४ | ८८१० | सालीम |
| ६७१ | १४८१६ | ३१८४८३ | " |
| ६७२/१ | ३८३५ | ९८१३८३ | " |
| ६७३/१ | ५ | १२८२८३ | " |

येणें प्रमाणें माझे मालकीची शेतें स्वामित्वाबद्दल रुपये १८४ दरवर्षीं देण्याचे कबुल करून सन १३२४ ते सन १३२८ फसली अखेर पांच वर्षांकारितां तुह्मी वहितीस घेऊन त्याबद्दल तारीख ६।४।१९१४ इ. रोजीं कबुलायत लिहून नोंदून दिली. स्वामित्वाचे रुपये दरसालचे मार्गशिर्ष शु॥ ५ स देण्याचा करार करून करारशीर रुपये न दिल्यास दरशेकडा २ दोन रुपये प्रा॰ व्याज देण्याचे कबुल करून माझी शेतें मी वापस घ्यावी. व दुसऱ्यास लावून टाकावी. व त्यात नुकसान आल्यास तुह्मी मला भरून द्यावे अशी शर्त लिहून दिली आहे. परंतु तुह्मी मला पाहिले सालचे स्वामित्वाचे रुपये दिले व या सालचे रुपये अद्याप पावेतों दिले नाहींत तरी ते रुपये १८४ नोटीस पावल्यापासून आठ दिवसाचे आंत मजला आणून द्यावे व माझी पावती घ्यावी. तुह्मी कबुलायतीची शर्त मोडली सबब यापुढें तुमचेकडेस ती जमीन ठेवू इच्छित नाहीं. तरी यापुढें तुह्मी शेतांत जाऊं नये व किस्तकारी करूं नये. या प्रमाणें तुह्मी न केल्यास मला रितीप्रमाणें तजवीज करावी लागेल व विनाकारण खर्चात पडावे लागेल, सबब ही नोटीस दिली आहे तारीख २।२।१९१६ इसवी.

सही

गोविंद बाळकृष्ण अ. पा. क.
आई लक्ष्मीबाई जवजे
बाळकृष्ण तीमसे नि. खु.

नो. नं. ६०

## नोटीस

रा. रा. ' बिंजराज कुंजिलाल ' मालक शिवनंद बिंजराज मारवाडी दुकान दहिहांडा तालुका आकोट

यांसः—

खालीं सही करणार याजकडून या नोटिशीनें कळविण्यांत येते कीं मी तुमच्या दुकानची कर्जरोख्याची चुकती बाकी देण्यास आलोंतर रक्कम कळावित नाहीं. व कर्जरोखा आकोल्यास राहिला वगैरे खोटीं सबब दाखवून रक्कम घेत नाहीं. तुह्माला तीन वेळां शंभर शंभर रुपये मिळून ३०० रुपये वसूल दिला आहे. तुमच्या कर्जाचा निकाल करण्यासाठीं मी परभारें रा. रा. मुसा अयुब कच्छी दुकान आकोला यांच्या दुकानीं रक्कम अमानत ठेविली त्यांतून कर्जरोख्याचा हिशेब त्यास दाखवून आपली चुकती बाकी घेऊन जावी. आणि त्याबद्दलची पावती व कर्जरोखा परत त्यांच्या हवाली करावा. या गोष्टीला मुदत दोन दिवसाची दिली आहे. तां. २७ जानेवारी १९१६ रोजीं मला तुह्मी परतवून लाविलें ह्मणून त्या तारखेपासून तुमचें व्याज बंद राहील. आणि राजश्री मुसा अयुब कच्छी यांच्याकडे जी तुमच्या नक्की रकमेपेक्षां फाजील रक्कम जमा राहिल त्याच्या बद्दल तुह्माला दुहोत्राप्रमाणे व्याज द्यावें लागेल. या नोटिशीचा खर्च तुह्मावर पडेल. क. ता. २८ १-१९१६

सही

तुकाराम हरबाजी तेली द. खुद

नो. नं. ६१

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस कळविण्यांत येत आहे कीं सैय्यद उमर व॥ सैय्यद मलंग, मुसलमान रा. पिंपळगांव राजा ता. खामगांव जि. बुलढाणा यांसः—

मी माझ्या तर्फे कोर्टांत काम चालविण्या करितां कुल मुखत्यार पत्र दिले होतें तें मी रद्द केलें आहे. तर कोणीही सदर्हु इसमाशी माझ्या करितां व्यवहार करूं नये: तसें केल्यास मी जबाबदार नाहीं.

सही केली आकोला येथें आज तारीख १ फेब्रुवारी १९१६ रोजीं

सही

कृष्णाबाई जवजे नारायण देशपांडे
इच्या हातचा आंगठा

ना. नं. ६२

## नोटीस

नोटीस बेशमी दामा वल्लद फकीरजी जात कुणबी आडनाव खामणकार राहणार कावडी तालुका वरूडा जि. चांदा पोष्ट वरूडा

यांसः—

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यात येते कीं आमचा बाप नारायण वल्लद संभा आडनाव झाडे राहणार मौजे कोरल हा मरून अंदाजा पंधरा १५ वर्षे झालीं असतील. तेव्हां त्यानीं मौजे कोरल तालुके वणी येथील सेत सर्वे नंबर ७० निशाणी मोहाणीचे तुह्मास मरणाचे पूर्वीं गाहाण विक्री अगर बक्षीस कोणत्या प्रकारानीं लिहून दिले आहे हें आह्मास माहित नाहीं. व हल्लीं राईट ऑफ रेकार्डचें काम सुरू आहे. तेव्हां त्यांस ही तुह्मी बरोबर माहिती सांगत नाहीं. व आह्मी त्याच्या वारस मुली असतांना आह्मास हा लेख दाखवित नाहीं, आणि शेत तुह्मी आमची मातोश्री ही मैयत झाल्या पासून तुह्मीच वाहात आहां. त्यांस अंदाजा नऊ ९ वर्षें झालीं आहेत. करितां ही नोटिस पावल्यापासून १५ पंधरा दिवसाचे आंत तुमचे जवळ जो कांहीं लेख असेल तो गंगया हाणमतु व गंगया लछआपा आणि कृष्णया नागया हे सर्व जात कोमटी सावकार रा. वणी यांचे समक्ष आणून आह्मास दाखवावा. असे तुमचे कडून मुदतींत न झाल्यास आह्मी वारस या नात्यानीं दिवाणी कोर्टांत शेत ताब्यांत घेण्याबद्दल तुमचेवर दावा आणू. नंतर तुह्मी कोर्टांत लेख दाखविल्यास आह्मी कबूल करणार नाहीं. व आमची विनाकारण कोर्टाचा खर्च होईल तो तुमचे जवळून भरून घेऊं. या नोटिशीचे खर्चासुद्धां सबब आगाऊ तुह्मास या नोटिशीनें कळविले आहे. कळावें. ता. २६-१-१९१६ इ. द. धोंडो सखाराम पेनशनर नाझर रा. वणी

सही

१ बना मर्द महादा जात कुणबी
आडनांव बथकल रा. भालर इचे
हातची नि. बांगडी असे द.
धोंडो सखाराम

२ राधा मर्द लक्ष्मण आडनांव बोडे
जात कुणबी रा. रास इचे हातची
नि॥ बांगडी असे द. धोंडो
सखाराम

नो नं. ६३

## जाहीरात

सर्वत्र लोकांस कळविण्यांत येते कीं रा. रामजी नारायण चोपडे तळेगांवकर हे उपदेशकाचें व मराठा शिक्षणा करितां वर्गणी गोळा करण्याचें काम करीत होते. परंतु त्यांना त्या कामावरून काढून टाकले आहे. तरी याउपर त्यांना समाजा तर्फे कोणतेंही काम करण्याचा अधिकार नाहीं. सबब त्यांच्या जवळ कोणीही वर्गणी देऊं नये. व त्यांची पावती घेऊं नये. क. ता. २-२-१९१६ इ.

जैराम गोविंद पाटील
अध्यक्ष
मराठा शिक्षण समाज आकोला

नों. नं. ६४

## नोटीस

रा. रा. शामराव गणेश देशपांडे राहणार आकोला

यांसः—

खालीं सही करणार यांजकडून नोटिस देण्यांत येते कीं, तुह्मी १५-६-१९१४ पासून दरमहा दीड रुपया भाड्यानें आमचे घर राहण्यास घेतलें पण तुह्मी भाडें न दिल्यामुळें गेल्या पांच सहा महिन्या पासून घर खालीं मागितलें तर तेंही तुह्मी केलें नाहीं. आतां ही नोटीस पोचल्या तारखे पासून एक महिन्यांत घर खालीं मागण्या संबंधानें हीच जाहीर नोटीस तुह्मास देत आहे. या मुदतींत भाड्याची रक्कम चुकती करावी. तसें न केल्यास दिवाणींत दावा करून घर ताब्यांत घ्यावें लागेल. व भाडें या नोटिशीच्या खर्चासुद्धां वसूल करण्यांत येईल. मी उमरावतीस राहतो. सबब माझ्या तर्फे घराचा ताबा घेण्यास व भाड्याची रक्कम घेउन पावती देण्यास रा. रा. गोविंद विठ्ठल सकदेव पेनशनर रा. आकोला यांस माझ्या तर्फे पूर्ण अधिकार दिले आहेत. ता. ३-२-१९१६

सही

पांडुरंग सखाराम अग्निहोत्री

नो. नं. ६५

## पत्रव्यवहार

### इजारदार व इनामदार सभा यवतमाळ.

### (जादा जाहीर सभा व इजारा टेनन्सी बिल.)

ही सभा यवतमाळ येथें ता २६-१ १९१६ इ. रोजीं सायंकाळीं चार वाजतां इजारदार सभेच्या दिवाणखान्यांत वणीचे रा. ब. पुराणिक, इजादारसभेचे चेअरमन, यांचे अध्यक्षते खालीं इजारा टेनन्सी बिलाचा विचार करण्याकरितां भरली होती. येथील प्लेग अजीबात कमी झाला नसल्यामुळें व सभेच्या नोटिसाही इजारदारांस पोहोंचण्यास पुरेसा वेळ नसल्यामुळें सभेस फारशी गर्दी नव्हती तथापि त्यांतलेंत्यांत जिल्ह्यांतील दूरदूरचे भागांतून कांहीं इजारदार मोठ्या लगबगीनें सभेस आले होते.

अध्यक्षांनीं सुचविल्यावरून सभेचे सेक्रेटरी रा. दत्तोपंत काणे यांनीं सभेकडे आलेल्या व ता. २७ रोजीं सरकारी कमेटींत विचारा करितां ठेविलेल्या टेनन्सी लॉच्या ( Berar Alienated Villages Tenancy Law) मसुद्याचा मराठींत गोषवारा सांगून सदर्हू कायदा पास झाल्यास इजारदारांच्या हक्काचें व इस्टेटीचें कसें नुकसान होणार आहे हें समजावून सांगितलें. तसेंच या मसुद्याचा विचार करण्यास व त्यावर इजारदारांचें समप्रमत प्रदर्शित करण्यास किती थोडा अवधि मिळाला व यवतमाळास प्लेग असल्यामुळें त्या थोड्या अवधीचाही फारसा उपयोग आपणास कसा करून घेतां आला नाहीं याचें थोडक्यांत दिग्दर्शन केलें. रा. काणे यांचें भाषण झाल्यावर सर्वानुमतें खालील ठराव पास झाले.

**ठराव** १—इजारदार सभेच्या वतीनें ता. २७ चे सरकारी कमेटींत (१) रा. सा. बळवंत रामचंद्र लांडगे व (२) रा. रा. दत्तात्रय कृष्णाजी काणे यांस प्रतिनिधि निवडून पाठवावे.

**ठराव** २—वऱ्हाडांतील इजाऱ्यांतील कुळांचा कायदा हा इजारदारांचा मालकी हक्क नाहींसा करणारा असल्यामुळें ही सभा या कायद्याचा निषेध करिते व अशा प्रकारच्या कायद्याची मुळींच जरूर नाहीं असें आग्रहानें सांगते. तसेच कायदा करण्याचें कारण व या कायद्याचें धोरण सरकारनें सांगणें जरूर होतें तें त्यांनीं सांगितलें नसल्यामुळें सभेस आपलें मत या वेळीं देतां येत नाहीं.

**ठराव** ३—परवानगी मिळाल्यास या सभेचे वकील रा. ब. मुंडले यांस इजारदारां तर्फे मदत करण्यास कमेटींत पाठवावें.

**ठराव** ४—इजारदार सभेचे प्रतिनिधींनीं सदर्हू कायद्यासंबंधानें आपली नापसंती व्यक्त करावी. व इजारदारांचे हक्क आणि त्यांशा झालेले सरकारचे करार पुढें मांडून इजारदार व वऱ्हाडांतील इतर जमिनदार यांत भेद दाखवून फक्त इजारदारां करितांच कायदा करण्याची अवश्यकता नाहीं हें स्पष्टपणें त्यांनीं सरकारास कळवावें

**ठराव** ५—इजारदार सभेच्या प्रतिनिधींनीं सरकारास अशी विनंति करावी कीं, ( सदर्हू कायदा करण्याचें ठरलेंच तर )

कायद्याच्या मसुद्याचा विचार करण्याकरितां येत्या मार्च महिन्यांत पुनः या कमेटीची मीटिंग बोलवावी.

**ठराव** ६—ठराव नं. २ ची नकल ना. चीफ कमिशनर साहेब यांचेकडे व ठराव नं. १,२ व ४ ची नकल मे. स्लाय साहेब यांचेकडे सभेच्या अध्यक्षाच्या सहीनें पाठवावी.

या प्रमाणें सभेचें काम झाल्यावर अध्यक्षांनीं विस्मयपूर्वक कायद्याच्या मसुद्याचा निषेध करून व सर्व इजारदारांस आपल्या हक्कांचे व इस्टेटीचें संरक्षणाकरितां सरकारांत कायदेशीर दाद मागण्यासाठीं नेटानें झटण्या विषयीं उपदेश करून सभा बरखास्त केली. पुढील खटपटीकरितां लागणारा पैसा जमविण्याकरितां वर्गणीचे आकडे ही घेण्यांत आले.

ठरल्याप्रमाणें ता. २७ व २८ रोजीं सरकारी कमेटीची मीटग मे. डेपुटी कमिशनरचे कचेरींत झाली. त्यांत कायद्यांतील कांहीं कलमांचा विचार करण्याकरितां व मत देण्या करितां सरकारनें इजारदार सभेस मुदत दिली आहे. सदर्हू दोन दिवसांत त्या कमेटींत कायद्यासंबंधीं काय काय चर्चा झाली हें इजारदारांस कळविण्या करितां व ह्या कायद्यासंबंधानें इजारदारांचे समग्र मत काय आहे हें सरकारास कळविण्याकरितां इजारदारांची फेर **जादा जाहिर सभा** इजारदार सभेच्या दिवाणखान्यांत ता. १३ फेब्रुवारी सन. १९१६ रोज रविवारीं दुपारीं दोनवाजतां भरविण्याचें ठरलें आहे. त्याचेवेळीं कायद्याचा मराठी मसुदाही सर्वांस पहावयास मिळेल हें बिल इजारदारांच्या मालकी हक्काचा व इस्टेटीच्या नफा नुकसानीचा प्रश्न असल्यामुळें सर्व इजारदारांनीं इजारदारांचे बहुमतांत भर घालण्याकरितां ता १३ चे सभेस अवश्य यावे. येतांना कोणा जवळ जुने कागद पत्र सार्विलें वगैरे असतालि तर तींही समागमे आणावीं अशी सेक्रेटरींची विनंति आहे. कळावें

| | |
|---|---|
| यवतमाळ. | रामचंद्र गंगाधर भागवत. |
| ता. ३१-१-१९१६ | इजारदार सभा यवतमाळ. |

## पत्रव्यवहार.

### ' बाल शिक्षण '

तारीख ३० जानेवारीं रविवारीं सकाळीं आठवाजतां नागपुरास थिऑसाफिकलहॉलमध्यें रा. विनायकराव मराठे माजी हेडमास्तर भंडारा यांचें ' बाल शिक्षण ' या विषयावर प्रवचन झालें. त्यांनीं सांगितलें ' बाल शिक्षण ' हा विषय फार महत्त्वाचा आहे. या संबंधानें माझ्या ज्या कल्पना आहेत त्या प्रथम लोकांपुढें मांडून त्यांबद्दल लोकांत चर्चा होऊन त्या लोकांस कितपत पटतात हें समजलें ह्मणजे त्या पुस्तकांत लिहिणें बरें. मुलांचें शिक्षण " कांहीं येथेंच आहे असें नाहीं. तें सर्व जगांत सुरू आहे. तें शिक्षण मनुष्यांतचकाय परंतु पशू पक्ष्यांत देखील दिलें जातें. शिक्षकांचा धंदा ह्मणजे कांहीं आजन्म सिद्ध गोष्ट नाहीं. इतर धंद्याप्रमाणें शिक्षण देण्याची स्वतंत्र कला आहे. एंजीनिअर ज्याप्रमाणें घर बांधावयाचें असल्यास घराची जागा, भोवतालची परिस्थिति, ऊन, पाऊस, वारा, वगैरे अनेक गोष्टींचा विचार करतो व त्यास घर कस बांधावें हें समजून घ्यावें लागतें. त्याप्रमाणें शिक्षकाचा धंदा पाहिजे तो मनुष्य करूं शकणार नाहीं. त्यास त्या कलेचें ज्ञान करून घेतलें पाहिजे. परंतु तशी स्थिति आढळून येत नाहीं. ज्यास दुसरा कांहीं धंदा नाहीं. तो पांच सात मुलें एकत्र करून त्यांस शिकवीत बसतो! त्या शिक्षकाची योग्यता काय आहे याचा विचार कोणी करीत नाहीं! इंग्रजींत— एज्युकेशन व इन्स्ट्रकशन्— असे दोन शिक्षण वाचक शद्ब आहेत. इन्स्ट्रकशन् ह्मणजे डोक्यांत ज्ञान भरणें व एज्युकेशन ह्मणजे जें मुळांत आहे याची वाढ करणें. कोंबडीचे अंड्याची वाढ पिलांमध्यें हात. प्रथम त्या पिलाची स्थिति नुसत्या उदका प्रमाणें असते. त्याच पाण्याचे पुढें पिलू होतें. त्याची विलक्षण वाढ होते. प्रथम अंड्यांत असलेल्या जलस्थिति मध्यें व नंतर जीवस्थितिमध्यें आल्या नंतरचे स्थितिमध्यें केवढा फरक पडतो. तसाच फरक बाल व प्रौढ बुद्धींत पडला पाहिजे. बुद्धीची वाढ ह्मणजे काय? असें विचारलें असता सामान्य शिक्षकास तें सांगतां येणार नाहीं. प्रथम मुलास जें शिक्षण द्यावयाचें त्याचें ध्येय काय आहे याचा निश्चय केला पाहिजे. प्रथम ध्येयाची जाणीव झाली पाहिजे. मुलावर नागरीक वगैरे नात्यानें जबाबदारी काय येणार, उद्योग करून त्यानें पोट कसें भरेल याबद्दल प्रथम विचार झाला पाहिजे. ज्या जागेवर इमारत बांधावयाची त्या जागेचा ज्याप्रमाणें एंजिनियर अगोदर विचार करतो, त्याप्रमाणें मुलांचें शिक्षण सुरु करण्याचें अगोदर त्याचे 'डोक्याचा' विचार झाला पाहिजे. त्याचे बुद्धीचा विकास त्याचे डोक्यावर आहे. प्रथम डोक्याची स्थिति समजली पाहिजे. डोकें तपासून मुलास कोणत्या धंद्यांत घालावयाचें हें ठरविलें पाहिजे. डोक्याचे मुख्य चार प्रकार करता येतात — १ पुढचें कपाळाचे बाजूस भव्य, २ कपाळाचे बाजूस टेंगूळ आल्यासारखें; ३ मागचे बाजूस अगदीं सपाट, ४ पुढचा भाग बसकट असें. आतां सांगितलेल्या आकारावरून मनुष्य विचारी, चिडखोर युक्तिवान व प्रथम जडबुद्धी परंतु पुढें हुशार या बद्दल ओळखतां येते. शिक्षक लोकास याचें ज्ञान नसलें ह्मणजे ते मुलांस निष्कारण धाक दाखवितात, मारतात. त्यांस पुष्कळ तऱ्हेनें नांवें ठेवतात. मुलांस दगड, गधा ह्मणतां ह्मणतां तो तसाच होत जातो. कारण तसें असल्याबद्दल त्यास संशय येऊ लागतो. मुलांचे डोकें चांगलें असलें तरी त्याजवर अनुवंशीक गुणांचाही मोठा परिणाम होतो.

त्यांनीं आपले अनुभवाच्या एक दोन गोष्टी सांगितल्या. भंडारा येथें असतां एक उत्तम ' डोक्याचा मुलगा ' त्यांचे शाळेंत असे परंतु अभ्यासांत तो फार मंद असे त्याचे ठिकाणीं स्मरण शक्ति फार कमी होती. त्याचे कारणाबद्दल चवकशी करता समजलें कीं त्याचे बापास मद्यपानाचें भयंकर व्यसन असून घरांत सारखी कटकट भांडण तंटे चालत. याचा परिणाम मुलावर झाला होता. त्यास प्रेमानें वागवून प्रमोशन देत गेल्यामुळें तो मुलगा कांहींसा बरा होऊन हल्लीं कारकुनीचे काम करीत आहे.

भोगावीं असतां एक मुलगा नुसता स्वस्थ बसत असे. कितीही सांगा ऐकावयाचा नाहीं. त्यास दुसरे मुलां बरोबर शिक्षण देण्यास आरंभ केला तेव्हां तो कांहींसा ऐकू लागला. अशा मुलास शिकविण्याकरितां अनेक युक्त्या योजाव्या लागतात. मुलांची स्वभावता वृत्ति चंचल असते. कित्येक मुलें जन्मता मठ्ठ असतात. परंतु व याचे वाढी बरोबर त्यांच्या बुद्धींत फरक पडत जातो. सात वर्षा पासून चवदा वर्षापावेतों त्यांची स्मरण शक्ति चांगली असते, चवदाचे पुढें कल्पना वाढते; आपले देशांत इतर सुधारलेल्या देशांपेक्षां शिक्षण अति थोडे आहे. सहा मुलांत एक मुलगा शाळेंत जातो. चवऱ्याणव मुलें अशिक्षीत आहेत. एक हजार मुलींत दोन मुली शिकत आहेत ! अशा प्रकारची शिक्षणाची हेळसांड होत आहे. ' अंड्यांतील जला पासून पिलूं होतें ह्मणून मी जें उदाहरण दिलें त्याप्रमाण बुद्धीची वाढ करण्याकरितां प्रयत्न झाले पाहिजेत. आंडें चोवीस दिवस उबविल्या नंतर पिलू होतें. परंतु हल्लीं असें कांहीं एक यंत्र काढलें आहे कीं ज्याचे योगानें आंड्यास उब देऊन एका दिवसांत पिलूं तयार होतें ! शिक्षणाचे ही असेंच करता येईल. तसें करणें सोपें आहे. मुलांचा व्यर्थ काल घेतला जातो. मुलास सहा महिन्यांत लिहिणें वाचणें शिकविणें कठीण नाहीं. शिक्षणास व्यर्थ आणिला आहे. कठीणपणा कांहीं दिवसापूर्वीं आपलेकडे बालोद्यान पद्धतीबद्दल बरीच चळवळ सुरू झाली होती. परंतु मनरो साहेब गेल्याबरोबर सर्व बंद. ही स्थिति चांगली नाहीं. शिक्षक वर्ग तयार झाला पाहिजे वगैरे.

या प्रमाणें त्यांनीं सुमारें पाऊणतास भाषण केलें. आपण शिक्षणाच्या कामांत फार मागसलेलो आहोंत हें सर्वांस ठाऊकच आहे. थिआसोफिकल सोसायटीनें विशेष कांहीं काम केलें असेल तर तें शिक्षण संबंधींच होय. व त्याच प्रयत्नाचें फल हिंदु युनिव्हर्सिटी आहे असें ह्मणण्यास हरकत नाहीं.

सभासद.

वऱ्हाडसमाचार

मिति माघ शुद्ध ४ शके १८३७

## उपयुक्त कायदा.

मुंबईचे ना. चिमणलाल हरिलाल सेटलवाड यांनीं कलकत्त्याच्या वरिष्ठ कायदेकौंसिलपुढें एक नवें बिल आणण्याचा आपला उद्देश जाहिर केला आहे. या बिलाचा हेतु व कारणें यांची चांगली समजूत पटण्यासाठीं हा आजचा लेख आहे.

प्रत्येक हिंदु मनुष्य मरतांना आपली संपत्ति आपल्या हयात असलेल्या पुत्रांच्या नांवें लिहून ठेवून बहुधा परलोकास प्रयाण करीत असतो. तो निपुत्रिक असेल तर तो दुसऱ्या कोणाला तरी आपला वारस नेमून व त्याच्या नांवाची इस्टेटीची मालकी करून देऊन जातो. पण एखाद्याला जर अशी इच्छा झाली कीं संपत्तीची अशा रीतीनें विल्हेवाट लावतांना अद्याप ज्यांचा जन्म झालेला नाहीं अशा भावी नातवांना किंवा नातींना आपण संपत्तिचा कांहीं भाग ठेवावा, तर हल्लींच्या कायद्याप्रमाणें त्याला तसें करतां येत नाहीं. इंग्रज सरकारच्या कायद्याच्या कोर्टांतून जो हिंदुधर्मशास्त्राचा किंवा मुसलमानांच्या शरीअतीचा भाग रूढ झालेला आहे व ज्या प्रमाणें कोर्टापुढें आलेल्या प्रश्नांचा निकाल न्यायाधिशांकडून करण्यांत येत असतो, त्यांत अजात वंशजांची वरच्यासारखी तरतूद करण्यासंबंधानें कांहीं एक तजवीज सांगितलेली नाहीं. हल्लींचा हिंदु लॉ घ्या, किंवा मुसलमान लॉ घ्या, तो व्यवहाराला कसा अपुरा पडतो त्याचें हें उदाहरण आहे.

पण हे कायदे जर व्यवहाराला अपुरे पडत असले तर पुरवणी दाखल नवे कायदे सुचवून लोकांचा व्यवहार सुकर करणें हें कायदेशास्त्रज्ञांचें काम आहे. ना. मि. सेटलवाड यांनीं दाखविलेली सध्याच्या कायद्यामुळें होणारी अडचण काल्पनिक नाहीं. समजा एका सावकाराचा पुत्र दुराचरणी आहे तो नालायक आहे, आपल्या मागें तो आपल्या इस्टेटीचें वाटोळें करील हें बापास कळत असून सुद्धां मरतांना त्याला आपली इस्टेट त्या दुराचारी पुत्राचे नांवावर ठेवून जावें लागेल. तसें तो न करील तर त्यानें आपली इस्टेट दुसऱ्या कोणाला तरी देऊन टाकली पाहिजे किंवा एखाद्या धर्मकृत्यास अर्पण केली पाहिजे. पण पुढें मागें आपणास नातू होईल व त्याला आपण आपली इस्टेट ठेवूं असें जरी त्या सावकाराला वाटलें तरी हल्लींच्या कायद्याप्रमाणें त्याला तसें करतां येत नाहीं. याचा परिणाम असा झाला आहे कीं लक्षावधि रुपयांच्या इस्टेटी नालायक, दुराचारी, व उधळ्या मुलांच्या हातांत उघड्या डोळ्यानें देऊन श्रीमंत पित्यांना स्वर्गाचा रस्ता सुधरावा लागला आहे. असें करतांना त्यांच्या जिवाला कीती कष्ट झाले असतील, पै पै करून सांचविलेल्या लक्षावधि रुपयांच्या इस्टेटीची मुलाचे हातून भविष्यकाळीं होणाऱ्या धूळदाणीचें काल्पनिक चित्र त्यांचे डोळ्यापुढें उभे राहिलें असेल तेव्हां त्यांच्या अंतःकरणाला कसा पीळ पडला असेल, याची कल्पनाच केली पाहिजे. ना. मि. सेटलवाड यांच्या बिलानें ही आपत्ति दूर होऊन मृताच्या इच्छे प्रमाणें त्याच्या इस्टेटीचा वारस त्याच्या भावी पौत्रादिकांना होतां येईल तर श्रीमंताच्या बऱ्याचशा दुराचारी, दुर्व्यसनी, पुत्रांची बुद्धि हि ठिकाणीं येण्याचा संभव आहे. कारण, आपणांस अजीबात वगळून सगळीची सगळी इस्टेट आपल्या पौत्राच्या नांवावर करून देण्याचा अधिकार या नव्या कायद्यानें मनुष्यास प्राप्त होतो असें कळल्यावर एक सदाचरणानें

राहून बापाची मर्जी संपादली पाहिजे. व इस्टेटीचा वारसाचा हक्क तरी मिळविला पाहिजे, नाहींतर तो आपल्या अजात अशा पुत्राला गेल्यामुळें जन्मभर त्या हक्काला आपण मुकूं अशी भीती आतांपर्यंत लक्ष्मीपुत्रांना वाटत नव्हती ती यापुढें वाटूं लागेल, व त्यायोगें कांहींचें वर्तन तरी सुधरलें तर सुधरेल. या कायद्यापासून कोणाला ही अपाय घडण्याचा संभव दिसत नाहीं. तेव्हां याच्या भावी नैतिक परिणामाकडे दृष्टी देऊन सर्व जनतेकडून आणि सरकारी अधिकाऱ्यांकडून या बिलाला पुष्टि मिळेल अशी आशा करणें वावगें होणार नाहीं.

## लढाईसाठीं सोडत!

मुंबईच्या 'टाइम्स' पत्रांत युद्धफंडाची रकम फुगाविण्यासाठीं एकानें अशी युक्ती सुचविली आहे कीं यासाठीं एक लाटरी (सोडत) काढावी. तिच्या दर तिकिटाची किंमत २ रुपये ठेवून ५० लक्ष तिकिटें काढावीं. हीं तिकिटें विक्रीसाठीं पोष्ट आफिसांतून ही ठेवण्यांत यावीं. सर्व तिकिटें विकली जाऊन १ कोट रुपये हातीं आल्यावर त्या रकमेंतून २५ लक्ष रुपये सोडतीच्या बक्षिसां प्रीत्यर्थ खर्च करून बाकीचे ७५ लक्ष रुपये युद्धफंडास देण्यांत यावे. युक्ती चांगली आहे, पण तिला नैतिक दृष्ट्या आक्षेप घेतां येण्यासारखा आहे. हा तिच्यावरचा आक्षेप दूर करण्यासाठीं सरकारनें विशेष नियम करून जुगारीच्या कायद्यांत ही लॅाटरी येणार नाहीं असें जाहिर करावें असें सदर सूचना करणाराचें ह्मणणें आहे. नीति ती नीति व अनीति ती अनीति. कायद्याला नीतीचें स्वरूप पालटण्याची शक्ति नाहीं. एखादी गोष्ट फायदेशीर असली तर ती नीतीच्या दृष्टीनें रास्त असेलच असा नेम नाहीं. तेव्हां टाइम्स मधल्या लेखकानें सुचविल्याप्रमाणें लॅाटरी काढली व सरकारनें जुगाराच्या कायद्यांतून तिची मुक्तता केली अशी घटकाभर आपण समजूत करून घेतली तरी सोडतींत पैसा घालून एकदम श्रीमंत होऊं पाहणें हें नीतीस सोडून आहे असा विचार विचारी मनुष्याच्या मनाला टोचल्यावांचून कधीं रहावयाचा नाहीं; आणि सरकारही अशा अनीतीच्या पायावर रचलेल्या सोडतीस संमति देईल असें आह्मांस वाटत नाहीं.

## शेतकी शिक्षणासंबंधाचा विचार.

हिंदुस्थानांतल्या लोकांना कृषिकर्माचें शिक्षण देण्यासंबंधाच्या प्रश्नाचा विचार करण्याकरितां हिंदुस्थान सरकारानें ता. ४ फेब्रुवारीं रोजीं एक कान्फरन्स बोलाविलें आहे. यांत १३ युरोपियन मेंबर व फक्त २ हिंदी मेंबर आहेत! जेथें हिंदी लोकांच्या हितसंबंधाचा विचार करावयाचा तेथें सुद्धां काळ्या गोऱ्या सभासदांमध्यें असें व्यस्त प्रमाण ठेवण्यांत यावें हें आश्चर्य आहे. निंमे काळे व निंमे गोरे सभासद नेमले असते तर सरकारला हिंदी सभासदांनीं भलभलती सल्ला देऊन चुकीच्या मार्गाला लाविलें असतें अशी भीती सरकारला पडली कीं काय कोण जाणें! साऱ्या हिंदुस्थानांत ज्यांना कृषिकर्माची व्यावहारिक माहिती उत्तम प्रकारची आहे असे दहा पंधरा हिंदी गृहस्थ सरकारला सापडले नसते असें नाहीं. या कान्फरन्सपुढें शेतकी कॉलेजें व प्रयोगक्षेत्रें उघडणें हा एक मोठा प्रश्न यावयाचा आहे. सध्या प्रत्येक प्रांतांतून एकेकच शेतकी कॉलेज आहे. त्या ठिकाणीं ही संख्या निदान पांचपट तरी व्हावयास पाहिजे. सध्यां एकेका कॉलेजाला भपकेदार प्रयोग शाला, व टोलेजंग इमारती, आणि लठ्ठ पगाराचे युरोपियन प्रोफेसर देण्यांत येतात, त्यांच्या जागीं तेवढ्याच खर्चांत मध्यम प्रतीचीं दोन तीन तरी कॉलेजें सहज चालवितां येतील व या कॉलेजां मिळून पुष्कळ अधिक विद्यार्थ्यांना कृषिकर्माचें शिक्षण मिळेल. प्रयोग क्षेत्रांची संख्या ही अशीच वाढवावयास पाहिजे. शास्त्रीय कृषिकर्मपद्धति ही एकंदरीनें कशी फायदेशीर होते हें आमच्या गांवढळ शेतकऱ्याला प्रत्यक्ष पाहून कळलें पाहिजे, आणि या साठीं प्रत्येक तालुक्यास अशी प्रयोगक्षेत्रें उघडण्यांत आलीं तर शास्त्रीय कृषिकर्माचा प्रसार हिंदुस्थानांत झपाट्यानें होईल. खेडेगांवच्या शाळांतून शिकणारीं मुलें बहुधा शेतकऱ्यांचीं असतात. त्यांना लिहिण्यावाचण्यावरोबर शेतकी कामाचें ही शिक्षण मिळालें तर मुलाला शाळेंत पाठविण्याला त्यांचे आईबाप अनमान करतात असें जें सध्यां दिसतें, तो प्रकार नाहींसा होऊन प्रत्यक्ष उद्योग धंद्याचें शिक्षण लहानपणापासून मिळाल्यानें त्या मुलाचा ही फायदा होईल. खेडेगांवातल्या शाळासाठीं प्रत्यक्ष शेतकाम केलेले असेच शिक्षक नेमिले पाहिजे हें उघड आहे. सारांश या कान्फरन्स पुढें फार महत्त्वाचे प्रश्न आहेत, आणि त्यांचा विचार करण्याचे वेळीं ज्यास्त हिंदी सभासद नेमण्याची बुद्धि सरकारास झाली नाहीं ही खेदाची गोष्ट आहे.

## युरोपांतील महायुद्ध.

गेल्या दहाबारा दिवसांत पश्चिम रणक्षेत्रांत जर्मनीच्या चळवळीनें थोडीशी उचल खाल्लेली दिसून आली, आणि त्याचवेळीं इसोंझो दरींत आस्ट्रियानें ही थोडीशी जागृति दाखविली. फ्रान्समध्यें इतके दिवस नुसती तोफांची सलामी झडत असे. पण वर सांगितलेल्या अवधींत शत्रूंनीं दोस्त राष्ट्रांच्या फळीवर जोराचे हल्ले केले. ता० २८ जानेवारी हा जर्मन केसरचा वाढदिवस असल्यामुळें त्या दिवशीं कांहीं तरी अघटित कृत्य जर्मन लोक करून दाखवितील अशी भीती वाटत होती, परंतु सुदैवानें तसें कांहीं घडलें नाहीं. याचें कारण दोस्त राष्ट्रांच्या सैन्याची व्यवस्थित तयारी हेंच असलें पाहिजे. अशा तयारीला तोंड देऊन अघटित घटना करून दाखविण्यास जर्मनीला हजारो लोकांच्या जीवाचे बळी द्यावे लागले असते. पण दिवसें दिवस लोकांच्या प्राणहानी विषयींची जर्मनीची बेपर्वाई शिथिल होत चालली आहे, आणि फ्रेंच व ब्रिटिश तोफांच्या सरबत्तीच्या उग्रतेचा अनुभव जर्मन लोक कधीं विसरणार नाहींत. जर्मन झेपलिनांनीं वातावरणांतून खालीं बांब टाकण्याचा आणि निरुपद्रवी बाया व मुलें यांचा संहार करण्याचा आपला क्रम अद्याप चालविलाच आहे. पण त्यापासून झगड्यासारखी हानि सुदैवानें झाली नाहीं. इसोंझो दरींत आस्ट्रियनांनीं जोरानें हल्ले करून इटालियन लोकांना थोडे मागें हटण्यास लाविलें खरें, पण इटालियन लवकरच सावरले. आणि हातचा गेलेला मुलूख परत मिळविण्यास त्यास फार वेळ लागावयाचा नाहीं. पूर्व ग्यालिशिया कडची बातमी अलीकडे फार थोडी आली आहे. तथापि आली आहे तिजवरून पाहतां तिकडे रशियानें नुकतेच मिळविलेल्या मोठाल्या विजयावर विरजण घालण्याचे शत्रूचे प्रयत्न निष्फळ होत आहेत असें ह्मणण्यास हरकत दिसत नाहीं. सालोनिका कडील स्थिति आहे तशीच आहे. तिकडे ब्रिटिश व फ्रेंच फौजेला आणखी कुमक मिळाली आहे किंवा नाहीं तें कळत नाहीं. तथापि येवढी गोष्ट खरी कीं तेथें रसद व दारुगोळा यांचा चांगला बंदोबस्त करून ठेवण्यांत आला आहे. सर्बियाप्रमाणें मांटिनीग्रोमध्यें ही शत्रूचें आक्रमण झालें असल्यामुळें सालोनिका येथील ठाण्याची विशेष मजबुती करण्याची अवश्यकता दोस्त राष्ट्रांना वाटत आहे ती योग्यच आहे. अल्बानियांतलें सर्बियन सैन्य १४०००० व मांटेनीग्रोचें सैन्य २०००० इतकें सगळें पायदळच आहे. पण यांच्या रक्षणार्थ तोफा असाव्या तशा नाहींत. सर्बियन सैन्याला पुनः सज्ज करण्याची तजवीज चालली आहे. अलीकडे बल्गेरियाचें नांव फारसें कोठें ऐकूं येत नाहीं. पण ते व्हालोनावर हल्ला करण्याच्या तयारींत असावेत अशी शंका येते. सालोनिका हें सुरक्षित ठिकाण इंग्रज व फ्रेंच यांना मिळाल्याची गोष्ट शत्रूच्या डोळ्यांत सलत असली पाहिजे व ते त्यावर हल्ला करण्याची संधी केव्हां मिळेल याची वाट पाहत असतील. ही संधी मिळण्यास जितका विलंब होईल तितका दोस्त राष्ट्रांना फायदेशीर आहे. सध्याच्या लढाईत दोन्ही पक्षांना प्रश्न जो आहे तो दारुगोळ्याच्या सामुग्रीचा नसून लढणाऱ्या माणसांचा आहे. जमनानें माणसांचा पुरवठा कोठवर करावा? इंग्लंडमध्यें बोलून चालून इतके दिवस लष्करी नोकरी खुषीची होती. आतां सक्तीचें तत्त्व प्रसंग पाहून इंग्लंडच्या सर्व राजकीय पक्षांनीं मान्य केलें आहे. इंग्लंडनें सक्तीचें तत्त्व मान्य केल्या बरोबर शत्रूचा पांचावर धारण बसली आहे, आणि आज रशियाशीं, तर उद्यां इटलीशीं तर परवा मांटेनीग्रोशीं वेगवेगळा तह करण्याच्या खटपटी शत्रूनें करून पाहिल्या आहेत. पण सर्वांचा एक निश्चय आहे कीं एकजुटीनें राहू. मग जें काय व्हावयाचें असेल तें होवो. ब्रिटननें सक्तीचें तत्त्व मान्य करण्यापूर्वी जर्मन पत्रें छिद्रान्वेषणबुद्धीनें अशी टीका करीत असत कीं इंग्लंड आपल्या दोस्तराष्ट्रांच्या जिवावर उदार होऊन युद्धांत जय मिळवावयास पाहत आहे. पण आतां या टीकेला जागाच उरली नाहीं. इंग्लंडनें स्वदेशाभिमानानें प्रेरित होऊन त्यासाठीं उराशीं बाळगलेल्या तत्त्वाचा हा जो त्याग केला आहे त्याबद्दल फ्रेंच, रशियन व इटालियन लोक त्यांची फार फार प्रशंसा करीत आहेत. इंग्लंडच्या या कृत्यानें बेल्जम, सर्बिया व मांटेनीग्रो यांच्या सारख्या छोट्या छोट्या राष्ट्रांना ही मोठा धीर वाटू लागला आहे; तैग्रिसकडच्या बातम्या तर फारच आनंदाच्या आहेत. मध्यंतरीं मुंबईंत व अन्यत्र जनरल टाउनसेंड यांच्या हाताखालच्या सैन्याविषयीं अत्यंत काळजी उत्पन्न करण्यासारख्या बातम्या उठल्या होत्या. पण त्या सपशेल खोट्या ठरल्या. तुर्क लोकांचे तिकडे अवर्णनीय हाल होत आहेत. नद्यांना पूर येऊन तुर्क लोक लपून बसले होते त्या खंदकांतून पाणी शिरलें आहे. जनरल टाउनसेंड यांच्या लोकांची जागा उंच असल्यामुळें त्यांचें कांहीं नुकसान झालें नाहीं. अर्झरुमच्या किल्ल्यांत तुर्क लोक अडकून पडले आहेत. त्यांचें व मेलाघेर्ट येथील सैन्याचें दळणवळण अजीबात तोडून टाकण्यांत आल्यामुळें त्यांची अत्यंत शोचनीय अवस्था झाली आहे.

## नवें बजेट.

हिंदुस्थान सरकारचें नवें बजेट लवकरच कायदे कौंसिलपुढें विचारासाठीं येईल, आणि सध्या लढाईसाठीं होत असलेल्या अवाढव्य खर्चामुळें नवा कर बसविणें सरकारला भाग होणार आहे असा पुष्कळांचा अंदाज आहे. अशा वेळीं सरकारला हितचिंतक मित्रांची वाण कधीं पडत नाहीं. आपलें स्वतःचें अंग बचावून परभारें दुसऱ्यावर कराचें ओझें पडेल अशा प्रकारच्या सूचना करणारे हित चिंतकांचें पीक अशा वेळीं मोठेंच यावयाचें. त्याप्रमाणें तें आलें आहे यांत नवल नाहीं. यांच्या कित्येक सूचना फार गमतीच्या आहेत व कांहीं खरोखर विचार करण्यासारख्या आहेत. त्या या—हिंदुस्थानांतलें पोस्टेज कमींत कमी पाव आणा आहे तें अर्धा आणा करावें. (वर्तमान पत्रांना २० तोळ्यापर्यंत अर्धा आणा आहे ते १२ तोळ्यांपर्यंत अर्धा आणा करण्याचें नांव कोणी काढीत नाहींत. कारण ही सूचना करणारीं वर्तमानपत्रें सगळीं जाहिरातींनीं पुष्ट अथवा जड झालेलीं असतात); मिठावरचा कर एक रुपयानें वाढवावा; हिंदुस्थानांत प्राप्तीवरची किमानपक्ष मर्यादा कर बसविण्यास हल्लीं १००० रुपये आहे ती पूर्ववत ५०० रु. करावी; हिंदुस्थानांत दारिद्र्य असण्याला कारण तेथील लोकांचीं ज्ञातिभोजनें व लग्नकार्यांतला खर्च हीं आहेत. तेव्हां या उपायांनीं देशांत दारिद्र्य ओढून आणणारांचे हातपाय मोडण्यासाठीं दोन्हींवर जबर कर बसवावा. शिकार करणें हा केवळ चैनीचा प्रकार आहे. सबब त्या चैनीवर जबर कर प्रत्येक वाघाच्या शिकारीला २० रु. डुकराच्या शिकारीला १० रु. हरणाच्या शिकारीला ५ रु. व पक्ष्याच्या शिकारीला १ रु. कर बसवावा. मोटारगाड्यांवर, परदेशी दारूवर, परदेशांतून येणाऱ्या इतर मालावर, किंवा इकडून निर्गत होणाऱ्या कच्च्या मालावर कर बसविण्याचें नांव कोणी काढीत नाहींत. हल्लीं फ्याशनेबल केस कापणाऱ्या न्हाव्यांचा व उत्तम कट करणाऱ्या शिंप्यांचा धंदा भरभराटींत आहे. तेव्हां त्यांच्यावर ही कर बसवावा असें कित्येकांचें ह्मणणें आहे. खाणावळीवर अवश्य कर पाहिजे, पण चहाच्या दुकानावर नको असें हा परवा एक चहाप्रिय ह्मणत होता. नाटकाच्या खेळाचे

वेळीं व तसेच गायनाच्या जलशाचे वेळीं किंवा सर्कशीचे वेळीं दर तिकिटामागें एक पैसा सरकारासाठीं ज्यास्त आकारण्यांत यावा अशी पुष्कळांची इच्छा दिसते. असके कर बसवा व तमके बसवूं नका अशी सरकारला सूचना करणाऱ्या हितचिंतकांना स्वतःवर थोडासा कर बसवून घेण्याची स्वार्थबुद्धि यत्किंचित् ही नाहीं हें सांगावयास नकोच.

## जर्मनीच्या केसरची स्थिति.

जर्मनीचे बादशहा केसर विल्यम हे कालपुळीनें अत्यवस्थ असून त्यांचे नातलग त्यांची शेवटची भेट घेण्यासाठीं मृत्युशय्ये भोंवतीं गोळा होत आहेत अशी सुद्धां बातमी मध्यें आली होती. पण केसरवरचें तें गंडांतर टळून आतां तें आस्ट्रियन बादशहाच्या बोकांडीं बसलें आहे असें दिसतें. अलीकडे लोक आस्ट्रियन बादशहाच्या आयुष्याचे दिवस मोजूं लागले आहेत. तथापि केसरकडचें लक्ष अगदींच कमी झालें आहे असें नाहीं. विलायतच्या डेलीमेल पत्राच्या बातमीदारानें केसरचे केस कसे आहेत, त्यांच्या डोक्याला टक्कल पडलें आहे काय? वगैरे महत्त्वाची बातमी त्या पत्राला अत्यंत काळजी पूर्वक दिली आहे. तो म्हणतो— मी केसरला ता. १८ जानेवारि रोजीं निश येथें पाहिलें, तेव्हां त्याचे केस पांढरे झालेले व त्याचा चेहरा उदास व खिन्न झालेला, शरीरयष्टि थकून गेलेली, आणि डोळे खोल गेलेले, अशी मूर्ती मला दिसली. विलायती पत्राचे बातमीदार आपलें काम चोख बजावीत नाहींत असें कोण म्हणेल?

## टेनन्सी बिल.

### इजारदार व त्यांचीं कुळें.

मध्यप्रांताला कायदे कौंसिल मिळाल्यापासून वऱ्हाडला महत्वाचा असा कायद्याचा मसुदा पाहिल्यानेंच इजारदारां संबंधानें येणार आहे. सर्वच वऱ्हाडासाठीं टेनन्सी बिल म्हणून येणार असल्याचें गाजत होतें. पण सध्या हक्क नोंदणीचें काम चालूं आहे. आणि जमीनीच्या कबजेदारांची टिपणें तयार होईपर्यंत सध्यां विशेष कांहींच करतां येण्यासारखें नाहीं असा विचार दिसतो. म्हणून तूर्तच्या टेनन्सी बिलामध्यें फक्त इजारदार व त्यांचीं कुळें यांच्या मधील परस्पर हक्का संबंधानें कायदा करण्याचें घाटत आहे. इजारदार व त्यांचीं कुळें यांच्यामध्यें नेहमीं न्याय कोर्टांतून दावे चालूं असतात आणि अशी भांडणाची स्थिती कायद्यानें लौकर मिटेल तितकी कायमची मिटवावी असा सरकारचा हेतू आहे. इतर खालसा जमिनीच्या हक्का संबंधानें फारसा भानगडी पडत नसतात. आणि जें कांहीं कज्जे सध्यां चालत असतात ते हक्क नोंदणीच्या सरकारी कागद पत्रांनीं बहुतेक कायमचेच मिटतील पण तसा प्रकार इजारदार व त्यांचीं कुळें यांच्या दरम्यान नाहीं. त्यांच्या मधील भांडणांत अनेक प्रकारचे वाद निघतात आणि कोर्टी कोर्टांतून लढतां लढतां उभय पक्षांची व विशेषतः पैशानें कमजोर असलेल्या पक्षाची हानि फार मोठी होते. तेव्हां ही उपयुक्त व लोकांच्या कल्याणाची बाब सध्याच्या टेनन्सी बिलानें हातीं घेतली आहे हें सुचिन्ह होय. बहुतेक इजारदारांचा भरणा यवतमाळ जिल्ह्यांत आहे, आणि रा. रा. स्लाय साहेब, नामदार स्टांडन, नामदार रा. जोशी नामदार रा. ब. दामले इत्यादि मंडळींची कमीटी या बिलाचा पूर्ण विचार करण्यासाठीं मुद्दाम यवतमाळ येथें भरली होती. त्यांतल्या त्यांत नामदार रावश्री जोशी हे जमेदारांतर्फे कौंसिलदार आहेत आणि त्यांच्या हातांत इजारदारांच्या कल्याणाची बाजू सुरक्षित आहे हें निराळें सांगणें नको.

नव्या टेनन्सी बिलाचे मुख्य मुद्दे अगदीं थोडे आहेत आणि त्यांचें एक वेळ विवेचन केलें म्हणजे त्यांचा सोपेपणाही लक्षांत येईल. यवतमाळच्या बाजूला सरासरी साडेतीनशे इजारदार आहेत; पण त्यांचीं वहितदार कुळें मात्र एक लक्षा जवळ जवळ आहेत नव्या बिलानें या दोन समुदायामधील जमिनीसंबंधाचे हक्क निश्चित व्हावयाचे आहेत म्हणून या दृष्टीनें पाहतां हें बिल फार महत्वाचें आहे असें लक्ष्यांत येईल. आणि याच बिलांतील मुख्य तत्वांच्या धोरणानें वऱ्हाडांतील जहागीरदार, इजारदार, व पालंपटदार, आणि त्यांचीं कुळें यांच्या मधील हितसंबंधाचा पुढें मागें कायद्यानें निर्बंध होण्याचा मोठा योग आहे आणि म्हणूनही या दुसऱ्या बाजूनें देखील या बिलाला विशेष महत्व सर्व वऱ्हाडची मंडळी देऊं लागतील.

आतां प्रस्तुतच्या बिलांतील पहिला मुद्दा म्हणजे इजाऱ्याची संस्था निघण्यापूर्वीच जे जमिनीचे वहितदार त्यांच्या संबंधाचा होय. न्याय कोर्टांतील ठराव एकच गोष्ट सांगतात ती ही कीं या इजाऱ्याच्या पूर्वीचीं कुळ म्हणजे खालशांतील जमीनीचें सरकारी कबजेदारच होत. इजारदारांना ते फक्त जमीन महसुलाची रकम देण्याला जबाबदार असतात. बाकी शेतीच्या वहितीचा हक्क त्यांचा त्यांच्या कडेच राहील पण आतां नव्या बिलां अन्वयें जर हा वहितीचा हक्क कोणी राजीनाम्यानें सोडू इच्छील तर जाहीर लीलावानें तो विकण्याचा हक्क इजारदारांना मिळणार आहे. अर्थात या लिलावाचें उत्पन्न त्यांनाच मिळेल.

इजारा स्थापित केल्यानंतर जीं कुळें वहितदार झाला त्यांच्या संबंधांत या बिलामुळें दोन वर्ग करण्यांत येणार आहेत. पहिला वर्ग म्हणजे वीस वर्षांच्या वहिवाटीचीं कुळें होत. या कुळांनीं इजाऱ्यांतील शेतीला आपल्या मेहनतीनें नवीन तेजी आणली आणि त्या शेतीवर आपला जीव का प्राण ठेवून शेती वहिवाटली आहे हें विसरतां कामा नये. अशा कुळांकडून इजारदारांना जो मुनाफा घ्यावयाचा त्याची एक मर्यादा ठरवून देण्याचा बिलांत विचार आहे. सरकारच्या जमाबंदीच्या साऱ्याची रकम पाहून त्याच्या योग्य व वाजवी कांहीं पटी पर्यंत इजारदारानें रकम वसूल करावी; आणि ही रकम नियमित वर्षा वर्षांनीं वाढविण्याचा इजारदारास हक्क राहील. कुळानें स्वतः जमीन वहावी किंवा त्याला एकेक वर्षापेक्षां अधीक कौलपट्ट्यानें दुसऱ्याला जमीन वाहण्यास देतां येऊं नये.

कुळांच्या दुसऱ्या वर्गामध्यें २० वर्षापेक्षां कमी वहिवाटीचीं कुळें येतील. इतर खालसा जमिनीमध्यें सरकारी कबजेदार व त्यांचीं पोट कुळें यांच्या मधील संबंध जसे उभयतांच्या इच्छेवर व त्यांच्यामधील होणाऱ्या करारावर अवलंबून असतात तसेच संबंध इजारदार व त्यांचे २० वर्षापेक्षां कमी मुदतीचे वहितदार यांच्या मध्यें राहतील. या कुळांनीं आपला वीहतीचा हक्क विकणें झाल्यास त्याच्या संबंधानें इजारदाराला अग्रक्रयाचा हक्क देण्यांत येणार आहेत. वर जीं तत्वें संक्षेपानें सांगितलीं आहेत तीं नव्या बिलांत प्राधान्यें करून लोकांपुढें येतील; आणि त्यांच्या संबंधानें येवतमाळ जिल्ह्यांत चांगली लोकजागृती आहे असें दुसऱ्या रकान्यांत छापलेल्या यवतमाळच्या पत्रावरून दिसून येईल पण इजारदारांची जशी ही विचार जागृति व उठावणी दिसत आहे तितक्या मानानें त्यांच्या लक्षावधि कुळांचा पक्ष सरकारा पुढें नेटानें मांडण्यांत येईल, इतकी या मुक्या कुळांमध्यें चळवळ दिसत नाहीं. तेव्हां कुळांनीं ही योग्य वेळीं सावध व्हावें असें आम्ही सुचवितों.

# वऱ्हाडवृत्त.

**हवामानः—** गुरुवारच्या महोदय पर्वा नंतर पुनः थंडी वाढत आहे व ऊन ही तितकेंच तीव्र आहे. सध्यां थंडी व ऊन यांची बहुतेक समसमा होत चाललेली दिसते. ठिक ठिकाणीं प्लेगाचा मंद विस्तार होत आहे बाकी इतर बाबतींत लोकांचें आरोग्य प्रजावृद्धी व सुखसमृद्धी या दोन्ही बाबतींत वाढत्या प्रमाणावर आहे. पाऊस पडेल कीं काय असा रंग विकल्पें ढग सांगतात.

**प्लेगः—** २९ जानेवारी अखेरच्या सप्ताकाचे प्लेगाच्या मृत्यूचे आंकडे पाहतां उमरावती जिल्ह्यांत पुष्कळ गांवीं व खेडोपाडीं मिळून प्लेगानें ३८९ लोक मेले. यवतमाळ जिल्हा ३१ आकोला १७३ व बुलढाणा ६३ असे मिळून एकंदर वऱ्हाडचे प्लेगाचे मृत्यू ६९३ आहेत.

अलिशान नामदार चीफ कमिशनर यांचा मुक्काम अमडापुराहून आज महार खेड्याला होईल. त्यानंतर खामगांव, बाळापूर, शेगांव, माटरगांव इत्यादि भागांत साहेब बहादुरांची स्वारी येत्या आदितवार पर्यंत वऱ्हाडांत फिरतीवर राहील.

ऑनररी क्यापटन ले. रॉबर्टसन हे व्हाइसरायच्या आमल्यातून परत आकोल्यास सिव्हिल सर्जनच्या जागीं येत आहेत.

रा. रा. दुर्जनसिंग पोलीस डेपुटि सुपरिंटेन्डेन्ट यांस वर्ग ४ मधून वर्ग ३ ची बढती मिळाली आहे हें कळविण्यास आनंद वाटतो.

रा. रा. महमद अब्दुस् सतार एक्स्ट्रा असिस्टंट कमिशनर आकोला यांस ४०० रुपये पगारावरून ५०० रुपयांच्या पगाराची बढती मिळाली ही त्यांच्या कामगिरीला व लोक प्रियतेला भूषणास्पद होय.

शहर ...
यांचीं व्याख्यानें नागपूर शहरीं
तीं गेल्या शनिवारीं संपलीं. यां
नाचा व चित्रपटांचा अभ्यास
लाभावा या हेतूनें सरकारनीं जि
जिल्हा साहेब, म्युनिसिपालिटी
जिल्हा बोर्ड यांच्यांतील मुख्य
पुष्कळसे हेड मास्तर व डेपुटि इ
अधिकाऱ्यांस नागपुरास मुद्दाम
आतां नागपुराहून ही शहर सै
जुनी विद्या ग्रहण करून आले
आपल्या ज्ञानामृताचा फायदा
हेतूप्रमाणें लोकास करून देण्यास चु

**शेतकी परिषदः—** वऱ्हाड
सभा येत्या २१ व २२ फेब्रुव
शेतीच्या प्रयोगशाळेच्या मंडप
आहे.

रा. रा. सत्येंद्र कृष्ण घो
खामगांव यांस आफि. सब जज
लपुरास बदलण्यांत आलें.

## नोटीस

नोटीस बेशमी रामू चंद्र
रा. कुंभेफळ ता. खामगांव
यांसः—

खालीं सही करणार इजा
देण्यांत येते कीं माझी स्था
मौजे पिंपी व माखनेर ता.
खामगांव जि. बुलढाणे येथें
त्या इस्टेटीसंबंधी कोर्ट काम
मी तुम्हास माझे तर्फे काम
ता. २-४-१९१४ रोजीं मुखत्या
करून दिले होते. परंतु तुम
काम चागले होत नसल्यामुळे
तुमचे मुखत्यारपत्र आम्हास
नसल्याकारणानें तुम्हास या
विण्यात येते कीं तुम्ही सद
१४ चे मुखत्यारपत्र आज
आहे असे समजावे व यापुढें
तुम्ही कोर्टातील अगर कोणते
नये. सध्या खामगांव येथील
कोर्टात ४२ सन १९१६ चा
जागे संबंधी मनवरअली वह
खामगांव यावर तुम्ही चाल
मोकदमा मला पुढें चालवि
तुम्ही सदहू मोकदम्याची
१९१६ आहे. त्या दिवश
त्यार म्हणून कचेरींत
सदहू मोकदम्या संबंधी
जबाब देणे आहे तो
दुसरे वकीलाचे मार्फत
मोकदम्याशीं व माझे
तुमचा कांहीं संबंध
कळावें तारीख ३-२-१
मलकापूर

सही
किसनाबाई मर्द भा
नो. नं. ६८

## जाहिर नोटीस

रा. रा. बापुना वल्लद खानाजी धोबी रा शिरल नेमान तर्फे पिंपळखुट तो बाळापुर यांसः—

खालीं सही करणार इजकडून या जाहिर नोटीशीनें कळविण्यांत येते कीं, तूं माझा लग्नाचा नवरा असून मी लग्न झाल्या नंतर तुझे घरी सात आठ वर्षे होती. मी त्या वेळीं अज्ञान होती. पुढें मी तुझे घरीं सज्ञान झाली त्यास ५ पांच वर्षे झाली. मी तुमचा योग्य रितीनें संसार करीत असतां तुह्मी विनाकारण मजला आज दोन वर्षे झाली घरांतुन कारणा शिवाय काढून दिलें. मी तुझी आज दोन वर्षे वेऊन जाल ह्मणून लोकांचे कर्ज काढून खात आहे. परंतु तुह्मी मजला नेण्यास येत नाहीं यामुळें मजला लोकांचे रुपये १२५ सव्वाशे कर्ज अन्न वस्त्राचे झाले आहे. आतां मजला कोणी कर्ज देत नाहीं ह्मणून मजला आतां ही नोटीस देणें भाग झाले नाहीं तर मी आणखी वष सवा वर्षतुमची नेण्याची वाट पाहिली असती. असो आतां मजला उपास काढवत नाहींत तर तुह्मी ही नोटीस पावल्यापासून आठ दिवसाचे आंत मजला घेऊन जावे. आणि लोकांचे कर्ज रुपये १२५ देऊन त्याची पावती ध्यावी. या प्रमाणें न केल्यास मी तुमचेवर फौजदारी कोर्टांत अन्नवस्त्राची फिर्याद करीन. या नोटिशीचा जबाब नोटीस पावताच द्यावा. हि नोटीस दिली सही ता. २९-१-१६

सही

शेवंती मर्द बापुना धोबी रा. मौजे शिरल नेमान पोष्ट आलेगांव ता. बाळापूर जि. आकोला वऱ्हाड नि. आंगठा

ना. नं. ६७

## नोटीस

नथू वा॥ भगवान धोबी राहणार शिरल नेमान्याच तालुका बाळापूर पोष्ट आलेगांव जिल्हा आकोला

यांसः—

खालीं सही करणार इजकडून नोटिस देण्यांत येते कीं, तूं माझा लग्नाचा नवरा असून लग्न होण्यास सरासरी १२-१३ वर्षे झालीं. व मला शहाणी होण्यास सरासरी ४-५ वर्षे झालीं. तेव्हां पासून मी पांच सहा वेळां आले. मी शहाणी झाल्यावर मी तुमचे घरीं तीन वर्षे होते. परंतु तुह्मी मला चांगले रितीनें वागविले नाहीं. नेहमीं मारठोक करीत असा, अखेरीस माझेआंगावरील दागिने काढून घेऊन मला घरांतून काढून दिले. व सांगितले कीं, जर तूं माझे घरीं येशील तर मी तुला ठार करीन. त्या धाकानें मी आपले आईबापाचे घरीं जाऊन राहिले. त्यांस दोन वर्षे झालीं. मी आपले बापाचे गांवीं लोकांचे कर्ज काढून पोट भरले त्यामुळें मला लोकांचे रुपये २०० कर्ज झाले. मी बरेच वेळां घेऊन जाण्याबद्दल तुह्मास ह्मटलें असतां तुह्मी मला घेऊन गेले नाहीं. करितां तुह्मास कळविले जाते कीं आठ दिवसाचे आंत तुह्मी मजवर झालेले कर्ज रु. २०० देऊन मला घेऊन जावे व मला चांगले रितीनें वागवावे तसें न केल्यास नोटिस हीच फारकती समजून मी दुसऱ्याशीं गंधर्व करीन. मग तुमचा कोणतेही प्रकारें मजवर सत्ता राहणार नाहीं. ता. २८-१-१६

दस्तुर बाजीराव व्यंकोजी देशमुख राहणार चरणगांव वरणगांव

सही

सोनी मर्द नथू जात धोबी रा. शिरल नेमान्याच नि. आंगठा खुद

नो. नं. ६६

## NOTICE

The Treasury officer is now prepared to issue and encash Universal Currency Notes and Home Notes ( Bombay Circle ) of other denominations for the public on demand as far as possible

Endeavours will be made as far as possible in all trnsactions to meet the r.qu rements of the payee as to the form of currency in which he desires to take payment.


ॐ नमः श्रीगणेशाय.

## आर्यवनौषधींचा कारखानाः—मुर्डी.

**मदनामृतसंजीवनी.**

धातुवर्धक, अत्यंत कामोत्तेजक व पौष्टीक, वीर्यस्तंभक, रक्तशोधक, मनोत्साहक कांतिबुद्धिवर्धक, सुवर्णमाक्षिक, मौक्तिक, कस्तुरी व अनेक वनस्पतीमिश्र अद्भुत गुटिका.

यांच्या सेवनानें नपुंसकत्व, स्वप्नजन्य व इतर धातुपात, उन्हाळे इंद्रियशिथिलता कडकी, गर्भसंबंधी मुरलेले विकार, मूत्रसंकोच, धातूचा पातळपणा, स्त्रियांची धुपणी छातींत रोग हात, पाय मूत्रमार्ग व नेत्र यांचा दाह, क्षय, पांडुरोग, मुलांची खर, जीर्णज्वर, अग्निमांद्य; मस्तकशूळ, मुळव्याधी, वातरोग, निद्रानाश, पित्तविकार बाळांतरोग, मधुमेह, जुनाट पर्मा, मुष्टीमैथुनानें आलेली कृशता इत्यादि अनेक विकार खात्रीनें बरे होऊन शरीर निरोगी, मजबूत व सतेज बनते. पचनशक्ति व स्मरणशक्ति भरपूर वाढून धातू व रक्त यांची शुद्धि, वीर्यस्तंभन व भरपूर कामोद्दीपन होतें, व मनास उत्साह देतात. दूध व जडान्न भरपूर पचूं लागतें. त्यांत उपयुक्त वनस्पतींचें मिश्रण केले असल्यामुळें त्यांत अपायकारक पदार्थ अगदीं नसून वरील विकारांवर अत्यंत गुणकारक आहेत, करितां गुणाबद्दल असंख्य सर्टिफिकिटां मिळाल्या व नित्य मिळतात. पथ्यसेवनाची गरज मुळींच नसून स्त्रिया, पुरुष व मुलें यांस पाहिजे त्या दिवसांत घेण्यास अत्यंत उपयोगी आहेत. एका रुपयांचे आंत मिळणार नाहींत. एकदम ४ रुपयांच्यावर कितिही घेणारास टपालखर्च माफ आहे. चार रुपयाचें आंत वेगळा टपालखर्च ५ आणे पडेल. दर एकदम ३५ गो० १ रु० ७५ गो० २ रु० १६५ गो० ४ रु० २७५ गो० ६ रु० ५१० गो० १० रुपये.

१. **अपूर्व नेत्रांजन**—पानें वडस, सारा, फुलें, खुपऱ्या, बिंदु, काच, इ० नेत्रांचें सर्व विकार त्वरित बरे होऊन दृष्टि तीव्र व थंडगार राहते. या रोगास हें अंजन खरें रामबाण आहे. १॥ तो. ड. १ रु.

२. **परम्यावर अपूर्व मिश्रण**—कोणत्याही नवा जुना पर्मा व तज्जन्य दाह. तिडीक, मुत्रांची लाली, सकाच, पुपस्राव, रक्तस्राव इत्यादि विकार पथ्य नसतां सात दिवसांत जातात. तिडीक एका घटकेंत जाते. असे रामबाण औषध कोठेंच मिळत नाहीं. बा० किं० १ रु० १। भार २ रु० सर्व औषध व्हा० नें पाठवं.

सर्व सामानाचा मोठा क्याटलाग मागवावा. तो फुकट पाठवूं. औषधांत अपायकारक पदार्थ अगदीं नसून तीं पूर्ण खात्रींची असल्याबद्दल असंख्य सर्टिफिकिटें आहेत. याशिवाय मोठमोठे रोगांवर अनेक औषधें, ग्रंथोक्त रसायनें, भस्में, पाक, गुटिका आसवें, तेलें व सुगंधी अत्तरें वगैरे माफक दरानें मिळतात. अनु० ख० सो० ट० ख० वे० पडेल. रोखीनें किंवा व्ही. पी. नें पाठवूं. प्रकृतिमान कळविल्यास रोग्याचें निदान व चिकित्सा कळवूं.

पत्ताः—मु० मुर्डी, पो० हर्णै, जिल्हा रत्नागिरी. } कृष्णशास्त्री पेंडसे वैद्य.

ना० नं० २०



## Oriental Government Security Life Assurance Co., Ltd.

ESTABLISHED 1874.

HEAD OFFICE, BOMBAY.

### FUNDS almost 5 CRORES.

INVESTED IN GOVERNMENT SECURITIES AND MUNICIPAL AND PORT TRUST BONDS.

*Claims paid* $4\frac{1}{2}$ CRORES

### A Decennial Record of Progress.

| Year. | No. of Polices in force. | Existing Assurances. |
|---|---|---|
| 1884 | 4.823 | 1,59,25,200 |
| 1894 | 20,110 | 5 26,08,850 |
| 1904 | 43,356 | 8 88,02,223 |
| 1914 | 65,269 | 12,37,10,910 |

| Year. | Total Income. | Total Assets. |
|---|---|---|
| 1884 | 6,77,552 | 14,41,429 |
| 1894 | 4259,,607 | 94,49,971 |
| 1904 | 43,64,808 | 2,47,18,8 |
| 1914 | , 72,46,0 | 4,96,8650 |

### *SPECIAL FEATURES.*

Absolute Security—Low Rates—Liberal Conditions.
Forty years continuously increasing prosperity.
Ninety per cent of the entire Profits, after providing for the Reserve und divided among the Policyholders every 3 years.
Native Lives are accepted at the same rates as Europeans
Loans granted to policyholders at reasonable rates.
Prompt Payment of Claims.

***Influential and active agents wanted. Terms liberal.***

—:0—

Full particulars, prospectus and proposal forms on application to:—

R. Paterson Brown
Manager

*A. C. Lal,*
Branch Secretary.
*C. P. Berar & Khandesh*
Nagpur.

N. N. 22


हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवाश्रमांत छापून प्रसिद्ध केलें.

Regd-No.N 150

# वऱ्हाडसमाचार.

Berar-Samachar.

वर्ष ५० ] आकोला--सोमवार तारीख १४ माहे फेब्रुवारी सन १९१६ ई० [ अंक ७

## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवीं ट. हां. ........ २ रुपये
वर्गणी आगाऊच घेण्याची वहिवाट आहे.

---

### जाहिरात

**मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक.**

ह्या बँकेंत खालीं दिलेल्या शर्तीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर याच्या दरम्यान एक हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील आणि तो पैसा यापैकीं एकास अथवा जास्त इसमांस अगर यापैकीं मयताचे मागें राहील त्यांस काढतां येईल.

व्याज दर साल दर शेकडा तीन रुपयाप्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारावरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं. नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक आकोला ९।९।०९ } S. Clements, एजंट
नं १

---

## अस्सल अंगुरी.

# हिंग

केवळ एक आणा तो. पवित्र केशर १॥ तो. शुद्ध शिलाजीत. -॥- तो. खालिस कस्तूरी रु. २५ तो. तिबेटी ममीरा रु. ३ तो.

**काश्मीर स्टोर्स श्रीनगर नं. ५**
नो० नं० २

### हिंदुस्थानावर अरिष्ट

हिंदुस्थानांतील रहिवाशांच्या पाठीस ज्वर व हिवताप यांचें अरिष्ट सदोदित लागलें आहे. पण त्याचा प्रतिकार करण्यास बाटलीवाला यांचें हिवतापाचें औषध व गोळ्या ह्या रामबाण आहेत. ताप किंवा शीतज्वर येणारसें वाटतांच हें औषध घ्यावें. किं. १ रु.

**बाटलीवाला यांच्या निस्तेज लोकांसाठीं शक्तिकारक गोळ्या**

हें औषध घेतल्यानें भागवटा, मेंदूचे श्रम, पौरुषनाश, अशक्तता व क्षयरोगाचें स्वरूप, त्याप्रमाणें अजीर्ण इ. इ. विकार तावडतोब दूर होतात किं रु. १८.

---

**बाटलीवाला यांचें दंतमंजन.**

हें दंतमंजन मायफळाशीं कांहीं इंग्रजी औषधांचा वैद्यकीय रीतीनें मिलाफ करून बनविलें आहे. किं. ८४

**बाटलीवाल्याचें गजकर्णावर मलम.**

यानें गजकर्ण, कुनली, खरूज यांचा विकार एका दिवसांत नाहींसा होतो. किं. ८४

हीं औषधें सर्व औषधीं विकणाऱ्या दुकानावर व डॉ. एच. एल. बाटलीवाला जे. पी. मु. वरली लेबोरेटरी दादर, मुंबई यांजकडे मिळतात.

DR. H. L. Batliwala. Sons & Co Ltd
N. N. 3 Dadar Bombay.

---

# चांदीचीं भांडीं

नाशिक येथें तयार केलेलीं सर्व प्रकारचीं सुबक व घाटदार भांडीं आमचेकडे विक्रीस तयार असतात. भाव माफक व्ही. पी. नें अगर रोखीनें पाठवू. मालाचे खरेपणाबद्दल ग्यारंटी देऊ.

**पुरुषोत्तम रामचंद्र वैशंपायन**
**रविवार पेठ नाशिक सिटी**
नो. नं. ४

---

**आतिशय पौष्टिक व स्तंभक**

## विलासिनी वटिका.

शक्ती येण्याकरितां व ती कायम टिकण्याकरितां एकदां वापरा. पहिल्याच दिवशीं गुणाबद्दल औषध घेणाराची खात्री. किं० बाटलीस १२ आणे. पूर्ण गुणास ३ बा. अ. पत्रक सोबत.

सकळकळे ॲन्ड सन्स
शहर आकोला.

---

त्वरा करा. **जंगी लूट** अपूर्व लाभ

**जानेवारी अखेर खर्च माफ.**

उत्तम रंगदार निळीकाळी शाईच्या पुड्या पाव आणा दराच्या १०० रु. १। डायरी बक्षिस. पुडी २०० रु. २। कापडी डायरी. पुडी ४०० रु. ४ डायरी मोनेरी. इनाम न घेतां १००० पुडीस रु. ७॥

**गुण न आल्यास पैसे परत**

वृद्धपण टाकून तरुणत्व प्राप्त करून घ्या.

## तरुण मित्र पाक

किं० २ रु०

केस काढणारा रमेश सोप ३ वड्यांचे पेटीस रु. १ दोन पेट्यास १॥। रु. चार पेट्यास रु. ३ आग न होतां डाग पडणार नाहीं. उत्तम सुवासिक आहे.

पत्ता — दयालदास लालदास आ. कं.
जंगी स्टोअर बऱ्हाणपूर
नो. नं ५

---

## नोटीशीचे दर

दर ओळीस दीड आणा.
हेडिंगच्या दोन ओळी धरल्या जातील.
नोटीस सुवाच्य असली पाहिजे.

**सूचनाः**— गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील. पावुढें येणाऱ्या नोटीसास स्पेशल चार्ज पडेल.

---

## विक्रीस तयार

आमचे छापखान्यांत दरखास्तीचे, वकील पत्राचे, परत भरण्याचे, लिस्टफार्म पर्च्यांचे व नकलेकरितां करावयाच्या अर्जांचे नमूने छापून तयार आहेत. ते आमचे छापखान्यांत कोणत्याही वेळीं विकत मिळतील.

वऱ्हाडसमाचार कार्यालय, सदाशिवाश्रम, आकोला } मॅनेजर

---

## श्री दत्तात्रय अलंकारालय कोल्हापूर

आमचे कारखान्यांत स्वतःचे देखरेखेखालीं, मुद्दाम तयार केलेले उत्तम सोन्याचे सुबक दागिने— मंगळसुत्र साज, ठुशा-जोड, गुलाबाचींफुलें, बिल्वदळ टीका, मुदा, अग्रफुलें सार्थी व घागऱ्याचीं वगैरे सर्व जातीचा माल—तसेच चांदीच्या मासोळ्या, चाळ, उपकर्णी, तारें, वाट्या, गडवे, इत्यादि माफक दरानें मिळतील. आम्ही सर्व सोनें न्याशनलचें शंभर नंबरी वापरीत असतों. व डागाचा उपयोगही नियमितच केलेला असतो. यामुळें जिन्नस पांढरे पडण्याची अगर बाईट निघण्याची भीति बाळगण्याचें मुळींच कारण नाहीं. आमचे जिनसाची लाख काढून वजन तोलून पाहावें. गिऱ्हाइकाची खात्री करून देण्यास आम्ही तयार आहों. व्यापाऱ्यास कामिशन मिळेल. ऑर्डरी प्रमाणें माल तयार करून देऊं, चांदी सोन्याचे खरेपणाबद्दल आम्ही जबाबदार आहों. माल रोखीनें अगर व्ही. पी. नें पाठविला जातो. ऑर्डरी बरोबर एक रुपया अगाऊ पाठविला पाहिजे.

श्रीदत्तात्रय अलंकारालय—कोल्हापूर
नो नं ६

---

# कौतुकरत्नाकर

**छिन्नमस्तानी धुमावती; मातंगी भैरव षोडश देवतांचे चित्रांसह पृष्ठसंख्या ६००; विषय ६०० वर आवृत्ती ५ वी. प्र. २००००,**

बंगाल्यांतील कामरूपदेशी ही विद्या फार प्रबळ असून तिकडील भटेली, लंगोटि, छाछु करणारे अज्ञानवादी यांचेकडून खरी माहिती मिळवून सिद्धनागार्जुन मंत्र महोदधि, महानिर्वाणतंत्र उड्डीश वगैरे ग्रंथाचे आधारें हा भानुमती ग्रंथ तयार केलेला आहे. ह्याच धर्तीवर प्रसिद्ध झालेल्या इंद्रजाल, जादुवाई इतरसंग्रह, कौतुकचिंतामणी, किमिया, गुप्त गारुडी विद्या वगैरे पुस्तकांचा ह्याचेपुढें हिशेब नाहीं. यांत कोणते विषय आहेत याचा विस्तार कळविणें फार कठीण आहे. मंत्र तंत्र व यंत्र विधिपूर्वक करणें नियम ग्रहादिकांचीं वर्णनें भानुमती यंत्र वशिकरणशास्त्र नानाप्रकारचे स्तंभन प्रयोग, उच्चाटन, जारण, मारण प्रयोगविधि, औषधी हुन्नर, नानारंग कला, आत्मविद्यामेस्मोरिझम प्रयोगविधि वगैरे अनेक विषय आहेत. किं. ट. व्ही. पी. सह १॥ रुपया.

# कोकशास्त्र अथवा जीवनसौख्य.

ज्यांना खरोखरीच सौख्य भोगणें आहे त्या प्रत्येकांनीं हें पुस्तक अवश्य संग्रहीं ठेवावें. या पुस्तकांत कोणते विषय आहेत हे पुस्तकाच्या नांवावरून सहज समजण्याजोगें असल्यामुळें त्याचें वर्णन करणें नको. किंमत १ रुपया ट. ख. २ आणे.

पत्ताः— गंगाधर आर. आणि कंपनी.
हरिश्चंद्र बिल्डिंग मुंबई नं. ४

नो. नं. ७

## जाहीरात

आम्हांस म्याट्रीक अगर नॉन म्याट्रीक असे अनुभवीक इंग्लिश टीचर इंग्रजी तिसरे इयत्तेचे मुलांस शिकावण्या करितां पाहिजे आहेत. शिवाय कारस्पांडनचें काम ही त्यांना करावें लागेल. दरमहा रुपये ३० तीस त्यांना देऊं. सहा महिन्याकरितां पाहिजे आहेत. वर्तन चांगले व संभावितपणाचें पाहिजे. पत्र व्यवहार खालील पत्त्यावर करावा.

तेल्हारा ता० ९-२-१९१६ | शेटं हरकचंद गुलाबचंद तेल्हारा ता० आकोट जि. आकोला द० नथु आपा.

नो. नं. १९


## पत्रव्यवहार.

## " रावबहादुर ठाकुर " यांचा

# गौरव.

—:※:-:※:-:※:—

विद्वत्‌ शिरोमणि करिती बहुमान हा तुझा आज ॥
घडलें तुजकडुनी कीं, स्तुत्य असें न्याय्यसें जनीं काज ॥ १ ॥
गांभिर्यें, नैपुण्यें, केली त्वां चाकरी बहू वर्षें ॥
अंतीं सुखमय सुफला झाली, तुज गौरविती जन हर्षें ॥ २ ॥
विद्या, वैभव, विनयें, शोभासि कीं, कोंदणांत जेविं हिरा ॥
कानूंपंडित, सज्जन, अधिकाऱ्यां माजिं श्रेष्ठ सत्य नरा ॥ ३ ॥
अधिकार, मान, वैभव, असुनी संपत्ति, दैव, अनुकूल ॥
शिवला न गर्व मुळिं ज्या, निःसंशय थोर, थोर ! तव कूळ ॥ ४ ॥
मोठ्या बहादरीनें, नेकीनें, राखिलीत ठाकुरकी ॥
" रावबहादुर ठाकुर " झालें हें सार्थ नाम अवनीं कीं, ॥ ५ ॥
दीर्घायुष्य असो, बहुश्रुतपणा, देहींच आरोग्यता ॥
सत्कार्यीं रति, वैभवीं सदयता, वाढो! जनीं मान्यता ॥
व्यावा थोर धडा असाच अपुला, कीं, पुत्र पौत्रादिकीं ॥
विघ्नें दूर पळोत, हस्त प्रभुचा राहो सदा मस्तकीं ॥ ६ ॥

" कृष्णसुत "

## पत्रव्यवहार

## अकोलें येथील निराश्रित वर्गाचे लोक.

आमच्या शहरच्या निराश्रित वर्गाला वर्षांतून थोड्या प्रसंगीं तरी कांहीं हालचाल करावीशी वाटते हें पाहून सज्जनांना संतोषच होईल. हालचाल ह्मणजे जीवंतपणाची खूणच. गेल्या सक्रांती निमित्त येथील महारवाड्यांतील शालागृहांत रा. ब. महाजनि, रा. रा. भाऊसाहेब चिपळूणकर, रा. रा. बापूसाहेब फडके वगैरे कांहीं उंच जातीच्या लोकांनीं महार लोकांस तिळगूळ वांटला. रा. ब. महाजनि यांच्या अध्यक्षतेखालीं रा. भाऊसाहेब चिपळूणकर यांनीं या सणाचें महत्त्व सांगितलें. जीभेवर सर्व मदार कशी आहे, गोड बोलण्यानें काय काम होतें, तें त्यांनीं नीट समजावून सांगितलें. नंतर रा. रा. फडके यांनीं सक्रांति पासून दिवस कसा मोठा होत जातो तें सांगितलें. सूर्य थोडा थोडा लवकर उगवून उशिरां उशिरां मावळतो. ह्मणजे आपण पुढें जाऊन मागच्याची वाट पहात राहतो. या उदाहरणानें पुढें सरसावलेले मागासलेल्यांची वाट पहात असतात असें त्यांनीं दाखविलें. आह्मां सर्वांना मिळून पुढें उडी मारावयाची आहे. पण आमचे पाय जर मागें राहिले तर आमची उडी पुढें जाणार कशी? ह्मणून निराश्रित वर्गानें मागें राहूं नये. इतर वर्ग त्यांची वाट पहात थबकले आहेत. तर निराश्रितांनीं आमच्या बरोबर गावे. त्यांनीं इतरांना गांठावें; व सर्वांनीं मिळून पुढें जावें असा उपदेश रा. रा. बापूसाहेब फडके यांनीं केला.

नंतर रा. रा. नंदुजी या महार गृहस्थांनीं सर्वांचे आभार मानून या उपदेशाकडे आपल्या लोकांचें चित्त वेधलें. शेवटीं अध्यक्षांनीं स्वावलंबनाचा धडा अमेरिकेंतील बुकर टी. वाशिंगटन व हिंदुस्थानांतील सर सय्यद अहमद यांच्या उदाहरणावरून आमच्या निराश्रित वर्गानें घ्यावा असें सांगितलें व शिक्षणांत अघाडीस येण्याचा प्रयत्न करावा असें ह्मटलें. या नंतर उंच व निच वर्गांच्या लोकांनीं परस्परांस तिळगूळ वाटल्यावर व अध्यक्षांचे व वक्तयांचे आभार मानल्यावर लोक घरोघरीं गेले. सभेंत ५०-६० निराश्रित व ८-१० ब्राह्मण मंडळी होती.

हा प्रसंग नुकताच होऊन गेला होता, तरी निराश्रित वर्गांतील आमचे बंधु आणखी कांहीं कारणानें पुनः एकत्र जमले. ता. २९ जानेवारीच्या रात्रीं रा. रा. केशव जानूजी खंडारे यांनीं आपल्या घरीं ह्मणजे श्रीखोलेश्वराच्या देवालया समोरील बोर्डिंगांत रा. रा. रावोबा शेकोकार यांचें किर्तन करविलें. हें हरिकीर्तन येथील प्रसिद्ध नागरिक रा. रा. रामचंद्र विष्णु महाजनि यांना सरकारनें रावसाहेब हा किताब दिला. ह्मणून त्यांचा गौरव करण्यासाठीं व येथील सावतराम रामप्रताप मिल मधील वीव्हिंग मास्टर रा. रा. तात्या साहेब केळकर हे मुंबईस नोकरी निमित्त जाणार ह्मणून त्यांना निरोप देण्यासाठीं जो कार्यक्रम ठरविला होता त्या पैकींच पहिला भाग होता. ता. ३० रोजीं सकाळीं या उभय गृहस्थांस पानसुपारी झाली. व जमलेल्या मंडळीचा फोटो घेण्यांत आला. हा त्या कार्यक्रमाचा दुसरा भाग. शनिवारीं रात्रीं किर्तनाच्या पूर्वी एक ठराव या निराश्रित मंडळीनें मंजूर केला. नागपूर येथें जी नवी युनिव्हार्सिटी होणार आहे, तिच्या संबंधानें जी वाटाघाट चालली आहे, तींत निराश्रित वर्गाकडे कोणाचेंच विशेष लक्ष गेलेलें नव्हतें; ह्मणून उमरावतीच्या महार मंडळीनें स्वावलंबनावर भिस्त ठेवून निराश्रित वर्गासाठीं सदर्हु युनिव्हार्सिटीस जोडलेल्या प्रत्येक कॉलेजांत तीन तीन विशिष्ट शिष्यवृत्ति सरकारनें ठेवण्याची मेहेरबानी करावी असा विनंति अर्ज केला होता. या अर्जाला सरकारनें अनुकूळ उत्तर दिलें आहे; सरकार अशा विशिष्ट शिष्यवृत्ति देण्याची मेहरबानी करणार आहे; पण शिष्यवृत्तींची संख्या त्यांनीं ठरविली नाहीं. सरकारच्या या मेहरबानीबद्दल त्यांचे आभार मानण्याचा हा ठराव होता; व त्यांतच तीन तीन शिष्यवृत्ति असाव्या अशी पुनः विनंति आहे. हा ठराव सरकारकडे येथील डि. क्ला. मिशन ब्रांचचे अध्यक्ष रा. ब. अण्णासाहेब महाजनि यांनीं कळवावा असा या सभेनें त्यांस अधिकार दिला आहे. असेंही या ठरावाच्या शेवटीं ह्मटलें आहे. या वेळीं महार जातीचे ५०-६० लोक हजर होते. या प्रसंगीं रा. रा. नंदुजी शिवाजी हे अध्यक्ष होते; व रा. रा. गणेश आकाजी गवई यांनीं हा ठराव सुचविला व योग्य अनुमोदन व पुष्टि मिळून तो मंजूर झाला. ठराव मंजूर करून घेतल्यावर रा. रा. राघोबा शेकोकार महार यांनीं दोन अडीच तास कीर्तन केलें. हे गृहस्थ जातीचे महार असून गोरेगांवचे राहणारे आहेत. हे फारसे शिकलेले नसतां त्यांनीं जें कीर्तन केलें त्यावरून थोड्या जास्त परिश्रमानें ते चांगले कीर्तनकार होतील अशी उमेद वाटते. यांनीं निरूपणा करितां " देव वसे ज्याचे चित्तीं त्याची धरावी संगति " हा तुकाराम बोवांचा अभंग घेतला होता; व दृष्टांता साठीं वत्सलाभिमन्युविवाह हें आख्यान सांगितलें. कीर्तनांत कित्येक पदें त्यांचीं स्वतःची होतीं. कित्येक संस्कृत लोक वगैरे ही त्यांनीं स्पष्ट ह्मटलें; व सर्व कीर्तन पदें नीट समजून घेऊन रचलेलीं होतीं; व तीं समजून देतांनाहि त्यांनीं नीट समजून दिलें. सभार्थीग्रहणाही या गृहस्थांच्या आंगीं चांगला आहे. भाषन् तरी हे महार आहेत असें उमगत नाहीं. ब्राह्मण हरिदासांची कीर्तनें ते पहातील तर पद्धतही उत्तम उचलतील असें वाटतें.

रविवारीं सकाळीं रा. रा. रामभाऊ महाजनि यांचें अभिनंदन करतांना रा. रा. गवई यांनीं ह्मटलें कीं दादासाहेब हे राजकीयच नव्हे तर सामाजिक बाबतींतहि या शहरांतील एक पुढारी गृहस्थ आहेत. व निराश्रित वर्गा विषयींचे यांचे सतत श्रम व कळकळ आपणां सर्वांस माहितच आहे. हे गृहस्थ नुसते पुढारी नाहींत. ते मोठे धोरणी व विचारी पुढारी आहेत; व ते एकांगी नाहींत. जसे राजकीय तसे सामाजिक बाबतींतही ते कार्यभार उचलतात; व आह्मां निराश्रितांमध्यें मिळून मिसळून वागून त्यांनीं आमचें प्रेम स्वाधीन करून घेतलें आहे. हे लवकरच वऱ्हाडांतले अग्रगण्य पुढारी होतील अशी आशा आहे. तर यांचें अभिनंदन करणें ह्मणजे नुसतें कर्तव्यच नव्हे तर आह्मांला मनापासून आवडणारें कर्तव्य आहे; आह्मीं यांत कांहीं विशेष करतों आहों असें आह्मांला वाटत नाहीं. आमचे परमपूज्य गुरुवर्य रा. ब. अण्णासाहेब महाजनि या विद्वान् व सामाजिक पुढारी गृहस्थाचे दादासाहेब हे चिरंजीव होत. हें लक्षांत आणलें ह्मणजे आपण योग्य माणसाचाच गौरव करित आहों, हें तोंडानें उच्चारावयास पाहिजे असें नाहीं.

रा. रा. तात्यासाहेब केळकर यांच्या संबंधानें बोलतांना रा. रा. गवई ह्मणाले यांचे घराणेंच मोठे करारी व कट्टे प्रार्थना समाजी आहे. यांचे वडिलाप्रमाणेंच तात्यासाहेबांसहि जातिभेद ह्मणून कांहीं आहे असें स्वप्नांत सुद्धां माहित नाहीं. ते निराश्रितांबद्दल फार काळजी वहातात; व बोर्डिंगच्या विद्यार्थ्यांना त्यांचा फार उपयोग होत असे. यानंतर रा. रा. उमाये यांचें भाषण झालें. त्यांत त्यांनीं दादासाहेब महाजनि हे येथील निराश्रितांच्या कामाचे आधार स्तंभच आहेत असें ह्मटलें. आणि ह्मणून त्यांचा गौरव करण्यांत आह्माला आनंद वाटतो ह्मणून सांगितलें. पण रा. रा. तात्यासाहेब येथून जातात ह्मणून या प्रसंगीं थोडे दुःख होतें; तथापि तात्यासाहेबांचे आमच्या लोकांवर इतकें प्रेम आहे कीं ते कोठेंहि गेले तरी आमच्या उन्नतीचें काम करित राहणार ही आमची खात्री आहे. तेव्हां आह्मी येथले लोक जरी त्यांच्या प्रेमाला मुकणार तरी ते निराश्रितांचेच काम करीत राहतील ह्मणून आह्मी निराश्रित वर्ग त्यांच्या प्रेमाला आंचवणार नाहीं ह्मणून आह्माला आनंदच होतो.

रा. रा. राघोबा शेकोकार हरिदास यांनीं महाजनि ह्मणजे मोठा आहे जन्म ज्यांचा असा अर्थ सांगून त्यांची थोरवी त्यांच्या नांवाला सार्थ करिते असें ते ह्मणाले.

अशीं गौरवपर भाषणें झाल्यावर उभयतां पाहुण्यांस पुष्प हारांनीं मंडित केलें व पानसुपारी व लव्हेंडर दिलें.

नंतर दादासाहेब महाजनी यांनीं उत्तरा दाखल चार शद्ब सांगितले, त्यांत आपण सरकारच्या एवढ्या गौरवाला पात्र नाहीं; आपल्यापेक्षां जास्त पात्र गृहस्थांचा असा सन्मान व्हावयास पाहिजे होता; वगैरे विनयपूर्ण प्रस्तावना करून त्यांनीं सांगितलें कीं आपण आपलें काम पुढें असेंच चालवूं ज्या वाडिलांमुळें मला काम करण्याची स्फूर्ति मिळते व माझा गौरव होण्यास कारण झालें त्यांना साजेसें माझ्या हातून सतत काम होत राहो एवढी माझी इच्छा आहे ती ईश्वर पुरी करो. इतकें ह्मणून दादासाहेब गादिवर आल्यामुळें खालीं बसले. नंतर रा. रा. तात्यासाहेब केळकर यांनीं आपल्या सन्मानाबद्दल आभार मानले; व आपण आपलें काम नित्य करीत राहू, निराश्रित वर्गाचा आपणाला विसर पडणार नाहीं, असें सांगितलें. नंतर त्यांनीं बोर्डिंगांतील विद्यार्थ्यांना उपदेश केला. ते ह्मणाले तुमच्या लोकांत शारीरबल उंच वर्गापेक्षां जास्त आहे. नुसते शाळेंत सध्यां मिळणारें शिक्षण घेऊन आह्मासारखे तुह्मी दुर्बळ होऊं नका. तुह्मी उद्योग धंद्यांत शिरा. शरीरबळाची हानि होणार नाहीं असें शिक्षण घ्या. शेवटीं बोर्डिंगचे मालक केशवराव यांस त्यांनीं एकच गोष्ट सांगितली कीं, कोणतीहि संस्था चालविणाऱ्याच्या अंगीं विद्वत्ता असली ह्मणजे उत्तमच; तथापि विद्वत्ता नसली तरी मनाचा मोठेपणा व धार्मिकपणा आणि सदाचाराची वागणूक हीं त्याला अवश्य पाहिजेत. यांच्या

अभावीं तो स्वतःचेंच नुकसान करितो असें नाहीं तर आपल्या संस्थेची राखरांगोळी करतो. अशा प्रकारचीं उदाहरणें पुष्कळ पाहण्यांत येतात. या साठीं मन मोठें ठेऊन धार्मिकपणें वागून सदाचरण ठेवून चांगल्यांच्या संगतींत राहून आपल्या संस्थेची त्यानीं प्रगति व उर्जितावस्था साधावी. शेवटीं अध्यक्ष रा. रा. संभू अन्सू खंडारे यांचे आभार मानून काम आटोपले व नंतर रा. रा. रावोबा शेकोकार गोरेगांवकर यांनीं जमलेल्या मंडळीचा फोटो घेतला; व हा आनंदाचा प्रसंग असा साजरा करून येथील निराश्रित लोकांनीं आपल्यांतील चैतन्य साफ गेलें नाहीं हें सिद्ध केलें.

एक प्रेक्षक

---

## वऱ्हाडसमाचार

मिति माघ शुद्ध ११ शके १८३७

## सृष्टि धर्म आणि सुधारणा.

परमेश्वरानें मनुष्याला इतर प्राण्यांपेक्षां बुद्धि व मननशक्ति ही विशेष दिली व तिच्या साधनानें तो आपली उन्नति करून घेत असतो. शीत, उष्ण, पाऊस यांच्या पासून स्वतःचे रक्षण करण्यासाठीं देवानें त्याच्या अंगावर मेंढरासारखी दाट लोकर दिली नाहीं, पण तो आपल्या बुद्धीच्या बळावर लोकर आणून तिचें कापड विणून पांघरतो. शत्रूपासून बचाव करण्यास त्याला शिंगें नाहींत; पण तो बुद्धीचा उपयोग करून नव्या नव्या प्रकारचीं शस्त्रें तयार करतो. याप्रमाणें त्याच्या बुद्धीचा उपयोग करीत करीत तिचा विकास झालेला आहे व त्या विकासा बरोबर मनुष्यजातीची सुधारणाही विकास पावली आहे. त्यानें आपल्या बुद्धीच्या व मननशक्तीच्या प्रभावानें अनेक सृष्टिशक्तींना आपल्या दासी बनविलें आहे. अनेक सृष्टचमत्कारांचें ज्ञान करून घेऊन त्यांचीं शास्त्रें रचिलीं आहेत, व तर्कशक्तीच्या जोरावर भविष्यकाळच्या गोष्टींसंबंधानें ही तो अनुमानें करीत असतो. सारांश आपल्या ज्ञानाच्या प्रभावानें भूत, वर्तमान व भविष्य या तिन्ही काळांचा स्वामी होण्याची महत्त्वाकांक्षा तो धरीत आहे. इतकी प्रचंडशक्ति आपणास प्राप्त झाल्याबद्दल सहजिकच त्याला गर्व वाटेल व तो आपल्या शक्तीचा दुरुपयोग करील; पण याही गोष्टीचा बंदोबस्त सर्वशक्तिमान् परमेश्वरानें करून ठेविला आहे. मनुष्याला ज्ञान, बुद्धि, तर्कशक्ती वगैरे गोष्टी त्यानें दिल्या आहेत, पण त्या पूर्णत्वानें दिल्या नाहींत. त्यांत स्खलनशीलता ठेविली आहे. यामुळें पुष्कळ वेळां चांगल्या शहाण्या शहाण्या माणसांची बुद्धि सुद्धां भ्रष्ट झालेली, चांगल्या तत्त्वज्ञान्यांची सुद्धां विचारसरणी चुकीची व त्यांचीं अनुमानें खोटीं ठरलेलीं आपण पाहतों. मनुष्याची मति अस्थिर, त्याचें ज्ञान अनिश्चित, व त्याचे तर्क स्खलनशील असतात ही आमच्या मतें ईश्वरीयोजनाच आहे. ही योजना नसती तर ज्यास्त ज्ञान संपादन केलेल्या व सुधारलेल्या माणसांनीं आपल्याहून कमी प्रतीच्या माणसांना पायांखालीं तुडविलें असतें कीं काय कोण जाणे! ही योजना आहे ह्मणूनच शास्त्रज्ञांनीं एकाकाळीं निश्चित ह्मणून ठरविलेले सिद्धांत कालांतरानें साफ खोटे ठरून त्यांच्या गर्वाचा परिहार होतो.

अनेक पाश्चात्य शास्त्रज्ञांनीं आपल्या श्रेष्ठ ज्ञानाच्या जोरावर प्राच्य देशासंबंधानें सिद्धांत ठरविले आहेत. त्यांतला एक सिद्धांत असा आहे कीं सुधारणा ही सृष्टपदार्थांच्या नियमाला धरून चालते. बकलनें जगाच्या सुधारणेचा जो इतिहास लिहिला आहे त्यांत हाच सिद्धांत प्रतिपादिला आहे. दुसऱ्या कित्येक पाश्चात्य विद्वानांनीं यापुढें तर्क लढवून सुधारणेचा मार्ग निश्चित करून टाकला. ते ह्मणतात कीं सुधारणेचा जन्म प्रथम भरतखंडांत होऊन मग ती आसीरिया, काल्डिया, चीन वगैरे देशांत गेली. कोणी ह्मणतात कीं ती या दुसऱ्या देशांतून प्रथम जन्म पावून मग भरतखंडांत आली. पण सुधारणेच्या उगमाबद्दल जरी असा मतभेद असला तरी त्या सर्वांचें एका बाबतींत एकमत आहे. आणि ती बाब ही कीं सुधारणा या देशांत जन्म पावली खरी, पण येथील हवापाणी तिला न मानवल्यामुळें ती येथेंच नष्ट झाली. उष्णदेशांत सुधारणेचा विकास होणें शक्य नाहीं. त्या विकासाला थंड हवाच अनुकूळ आहे. सांगण्याचा मतलब हा कीं यूरोप व अमेरिका हे देश काय ते सुधारणादेवीचे लाडके पुत्र, हिंदुस्थान, चीन वगैरे देशांत सुधारणा टिकणें शक्य नाहीं, मग तिचा विकास कोठून होणार? आज अनेक वर्षें हे सिद्धांत पाश्चात्य विद्वानांनीं आपल्या उराशीं बाळगून ठेविले आहेत व त्यांच्या जोरावर पाश्चात्य राष्ट्रें आमच्या प्राच्य राष्ट्रांना अधम प्रतीचे समजत आलीं आहेत. पण हे सिद्धांत किती चुकीचे आहेत हें आतां आह्मी दाखवूं शकतों. कलकत्त्याच्या मॉडर्न रिव्ह्यूचे संपादकांनीं या सिद्धांताचा पोकळपणा उत्तम रीतीनें सिद्ध केला आहे. ते ह्मणतात कीं देश, काल, समाजस्थिति, वगैरे गोष्टींचा परिणाम मनुष्यावर घडतो, नाहीं असें नाहीं; पण सुधारणेच्या विकासाला बाधक होणाऱ्या या बंधनांचा उच्छेद करण्याची शक्ति ही मनुष्याचे ठायीं आहे ही गोष्ट पाश्चात्य लेखक विसरतात. अमक्याच हवेंतल्या किंवा देशांतल्या लोकांनीं सुधारणेचा विकास करून उन्नति प्राप्त करून घ्यावी, असा मक्ता किंवा ताम्रपट परमेश्वरानें कोणालाच व केव्हां ही दिलेला नाहीं. त्याच्या दृष्टीनें सगळी मनुष्य जात सारखी आहे. थंड हवेंतल्या माणसांना इतर हवेंतल्या माणसांहून अधिक असें कोणतें इंद्रिय आहे? जर ऋतुमान किंवा हवामान यांच्यावर सुधारणा अवलंबून असती, तर तिचा जन्म तरी अगोदर या देशांत कां आला असता? हिंदुस्थानचे लोक उपजतच मूर्ख व युरोपचे उपजतच शहाणे कां न निपजते? प्राचीनकाळीं हिंदुस्थानचे लोक अत्यंत सुधारलेले होते व त्याच काळीं यूरोपांतले लोक जंगली कां होते? अशी स्थिति होती त्याकाळीं भरतखंडांतल्या ऋषींनीं जर असा सिद्धांत लिहून ठेविला असता कीं सुधारणा ही उष्ण देशांतच जन्मणें किंवा विकास पावणें शक्य आहे, इतरत्र नाहीं, तर तो त्यांचा सिद्धांत त्याकाळीं सर्वमान्य ठरला नसता काय? पण आज त्याची सिद्धता युरोपच्या विद्वानांनीं मान्य केली असती काय? सारांश काय, तर सुधारणा ही हवामानावर अवलंबून नाहीं, मनुष्याच्या प्रयत्नांवर व त्याला मिळणाऱ्या संधीवर आहे. प्राचीन काळच्या आर्यऋषींनीं अध्यात्मविद्या व दर्शनशास्त्रें यांत जेवढी प्रगति केली होती, तेवढी अद्याप ही युरोपच्या लोकांना करतां येत नाहीं. कांहीं कारणांमुळें आमच्या प्राचीन सुधारणेचा मार्ग खुंटला. तिची प्रगति बंद पडली, त्या प्रगतीच्या मार्गांतल्या अडचणी आह्मांला दूर करतां आल्या नाहींत व ह्मणून आह्मी मागें पडलों. पण आतां पाश्चात्य ज्ञानाच्या प्रभावानें आह्मी उष्ण देशांत राहणारे बोस, राय, प्रभृति भारतवासी सुद्धां भौतिक शास्त्रांच्या प्रगतींत शीतप्रधान देशांतल्या शास्त्रज्ञांकडून वाहवा मिळऊं लागलों आहों कीं नाहीं? हीं उदाहरणें पाश्चात्य पंडितांचे वरील सिद्धांत भ्रममूलक आहेत हें ठरवितात कीं नाहीं! पाश्चात्यांचे सिद्धांत जर खरे असते तर हिंदुस्थानला निराश होऊन सदैव दुःखांतच दिवस काढणें भाग पडतें. पण ते भ्रममूलक आहेत हें ठरविण्याला हवी तेवढीं प्रमाणें आहेत. उदाहरणार्थ कास्मीर हा अतिशय थंड प्रदेश घ्या. पण मुंबई, कलकत्ता, मद्रास वगैरे ठिकाणच्या पेक्षां तेथील लोक अधिक सुधारलेले आहेत असें कोण ह्मणेल? हवामानावरच सुधारणा अवलंबून राहती तरी हिंदुस्थानांतल्या उष्ण प्रदेशांतल्या लोकांना स्वतःची उन्नति करून घेण्यासाठीं आपल्या आयुष्याचा कांहीं काळ कास्मीरसारख्या देशांत घालवून सुधारणेचा लाभ करून घेतां आला असतां त्याला युरोप खंडाच्याच प्रवासाचें कारण नव्हतें. सारांश सुधारणेच्या विकासाचा तेथील शीत हवेशीं संबंध जोडणारे पाश्चात्यांचे सिद्धांत साफ चुकीचे आहेत. ते विचाराच्या, तर्काच्या किंवा अनुभवाच्या कसोटीला बिल्कुल उतरत नाहींत. ह्मणून असे शुष्क तर्कवितर्क कुतर्क करीत बसण्यांत किंवा अशा सिद्धांतावर भरंवसा ठेवून निष्क्रिय होतां कामा नये. मनुष्याचा प्रयत्न हा खरा सुधारणेचा विकास करणारा महामंत्र आहे. या महामंत्राची दृढ कास धरून आणि ईश्वराच्या न्यायबुद्धीवर श्रद्धा ठेवून हिंदुस्थानचे लोक उन्नतीच्या यत्नास लागतील, तर त्यांना निराश होण्याचें बिल्कुल कारण नाहीं.

---

## विद्यार्थी आणि नाटकें.

शाळेच्या संमेलनासारख्या प्रसंगीं विद्यार्थ्यांनीं नाटकाचा प्रयोग करून दाखविण्याची जी चाल पडली आहे तिच्या विरुद्ध आह्मीं नुकताच एक लेख लिहिलेला वाचकांच्या लक्षांत असेलच. आमच्यासारखेंच मत मुंबईचे सुप्रसिद्ध, अनुभवी व सात्विक स्वभावाचे डे० ए. इन्स्पेक्टरचें काम अनेक वर्षें करून पेनशन घेतलेले रा. सा. पाणंदीकर यांचें ही आहे. त्यांनीं हें नाटकाचें बंड मोडण्यासाठीं विद्यार्थ्यांच्या पालकांच्या साह्याची याचना ‘इंदुप्रकाश’ पत्राच्या द्वारें केली आहे. रा. सा. पाणंदीकरांच्या या प्रार्थनेचा विशेषसा उपयोग होईलें असें आह्मांस वाटत नाहीं. कारण, मुलांचे पालक आपल्या मुलाच्या शिक्षणाचे संबंधांत इतके उदासीन असतात कीं ठरल्या वेळीं मुलाला फीचे पैसे देणें व पुस्तकें घेऊन देणें या पलीकडे त्यांच्याविषयीं आपलें कांहीं कर्तव्य आहे याची पुसट जाणीव सुद्धां फारच थोड्यांच्या ठायीं दृष्टीस पडते. यापेक्षां खुद्द तरुण विद्यार्थीवर्गच अधिक समजूतदार आहे असें आह्मांस वाटतें. त्यांनाच या नाटकापासून होणारें नुकसान नीट समजावून देऊन तें टाळण्याविषयीं कळकळीची प्रार्थना केली, तर अधिक उपयोग होईल असें वाटतें.

---

## हिंदु युनिव्हर्सिटीची स्थापना.

ता० ४ फेब्रुआरी रोजीं काशी येथें व्हाइसराय लॉर्ड हार्डिंज यांच्या हातून हिंदु युनिव्हर्सिटीची कोनशिला मोठ्या समारंभानें बसविण्यांत आली. कित्येकांची या युनिव्हर्सिटीपासून होणाऱ्या भावी लाभाविषयींची अपेक्षा फार मोठी आहे; आणि ज्या उत्साहानें दरभंग्याचे महाराज, प. मालवीय, डा. सुंदरलाल प्रभृति मंडळीनें कामाला सुरुवात केली आहे तो उत्साह पुढें तसाच टिकला व लॉर्ड हार्डिंज आणि सर हारकोर्ट बटलर यांच्यासारखे सहानुभूतिपर दृष्टीनें तिच्याकडे पाहणारे अधिकारी हिंदुस्थानाला लाभत गेले, तर हिंदु युनिव्हर्सिटी थोडें बहुत तरी उपयुक्त कार्य करण्यास समर्थ होईल. पण या दोन्ही गोष्टींची अनुकूलता पुढें राहीलच असा काय नेम सांगावा? हिंदुस्थानच्या लोकांची आरंभशूरता ही प्रत्येक चांगल्या संस्थेच्या प्रगतीच्या आड आली आहे असा आजपर्यंतचा अनुभव आहे; आणि दुसरी ह्मणजे सहानुभूति प्रेरित अधिकाऱ्यांचा सदैव लाभ घडणें ही तर केवळ दैवाधीन गोष्ट आहे. अशा स्थितींत बंगलोरच्या टाटा रिसर्च युनिव्हर्सिटीचा अनुभव लक्षांत घेतला ह्मणजे हिंदु युनिव्हर्सिटीच्या भावी भाग्योदयाविषयीं मन साशंक होणें स्वाभाविक आहे. परमेश्वर करो आणि आमची शंका खोटी ठरो.

---

## जर्मनीचें विश्वासघाताचें कृत्य.

प्रत्येक दिवशीं जर्मनीचें एकेक नवें विश्वासघाताचें कृत्य उघडकीस येऊन साऱ्या जगभर त्या राष्ट्राची छीः थू होऊं लागली आहे आणि जर्मन सुधारणेविषयीं लोकांना तिटकारा वाटूं लागला आहे. एज नांवाच्या एका ऑस्ट्रेलियन वर्तमानपत्रानें एक नवें जर्मनीचें कृत्य उघडकीला आणिलें आहे. त्यावरून जर्मन लोक किती निरनिराळ्या वेषांनीं गुप्त हेरांचें काम करण्यासाठीं बाहेर पडत असत तें दिसून येतें. युद्ध सुरू होण्याच्या किंचित् अगोदर शास्त्रीय ज्ञानाची प्रगति करण्याचा उद्देश धारण करणाऱ्या ब्रिटिश असोसिएशनचे कांहीं सभासद आस्ट्रेलियांत गेले होते. त्यांत चार जर्मन प्रोफेसर

होते. लढाई सुरू झाली तरी हे तेथेंच राहिले. पैकीं दोघे आपण तटस्थ आहों व केवळ शास्त्रीय शोधक आहों अशा शपथा घेऊन निघून गेले. पण बाकीचे दोघे गुप्त हेरांचें काम करीत राहिले होते. त्यांच्याविषयीं कुजबुज सुरू झाली तेव्हां ते पळाले. तथापि त्यांतला एक पकडला गेला तेव्हां त्याच्या सामानांत आस्ट्रेलियाच्या लष्कराविषयींची संपूर्ण माहिती व लष्करी खात्याचे नकाशे सापडले!

## इतर बातम्या.

पुण्याच्या सार्वजनिक सभेनें वैद्यकी पदव्याच्या बिलाविरुद्ध सरकाराकडे अर्ज पाठविला आहे.

मद्रासच्या मेडिकेल सिंडिकेटनें आयुर्वेदिक दवाखान्याशीं संबंध ठेविल्याबद्दल डा. कृष्णस्वामी यांचेवर जो ठपका ठेविला होता तो मद्रास सरकारनें काढून टाकिला.

लॉर्ड चेम्सफर्ड यांना लॉर्ड हार्डिंज यांचें राजकीय धोरण पूर्णपणें मान्य असून तेंच धोरण पुढें ठेवण्याचा त्यांचा विचार आहे अशी नक्की बातमी मुंबईच्या सोशल रिफॉर्मर पत्राला लागली आहे.

इंदूर संस्थानांत तेथील महाराजांनीं पुष्कळ शिक्षणविषयक सुधारणा एकदम सुरू करण्याबद्दल हुकुम सोडला आहे. विद्यार्थ्यांची वैद्यकी तपासणी, सक्तीचें व मोफत शिक्षण, नैतिक व शारीरिक शिक्षण, नागरिकत्वाचें शिक्षण इ. अनेक गोष्टी यांत आहेत.

बडोदें येथें अखिल भारत वर्षीय टेनिस टूर्नमेंट झालें. त्यासाठीं हिंदुस्थानांतले नामांकित टेनिस खेळणारे एकत्र झाले होते. पण सामने बरोबरीचे झाले.

पंजाबी लोकांचा विमान फंड १० लक्ष रुपये झाला.

बहार व ओरिसा प्रांतांतल्या लोकांनीं वर्गणी जमवून लॉर्ड हार्डिंज यांचा एक पुतळा बांकीपूर येथें उभा केला आहे.

मुंबई प्रसिद्ध शिल्पकार रा म्हात्रे यांच्याप्रमाणेंच त्यांचा १०।११ वर्षांचा मुलगा ही उत्तम पुतळे करूं लागला आहे.

इंदुरास एक मिशन कॉलेज आहे. त्या कॉलेजच्या प्रिन्सिपाल साहेबांचें कांहीं कारणावरून विद्यार्थ्यांशीं थोडे दिवसापूर्वी भांडण झालें होतें. व त्या संबंधांत प्रिन्सिपाल साहेबांना विद्यार्थ्यांची माफी मागावी लागली होती. आतां असें कळतें कीं अलाहाबाद युनिव्हर्सिटीच्या परीक्षेसाठीं अर्ज पाठविण्याचे वेळीं सदर प्रिन्सिपाल साहेबांनीं कॉलेजांतल्या जवळ जवळ अर्ध्या मुलांना परीक्षेस जाऊं दिलें नाहीं! यावरून विद्यार्थ्यांनीं युनिव्हर्सिटीकडे तारा करून दाद मागितली आहे.

## धर्मपंथ आणि शिक्षणसंस्था.

प्रत्येक धर्मपंथाची वेगळी शिक्षणसंस्था असणें हें राष्ट्रहिताच्या दृष्टीनें घातुक आहे असें कित्यकांचें प्रामाणिक मत आहे. त्यांच्या दृष्टीनें धर्मापासून विभक्त अशीच शिक्षणपद्धति हिंदुस्थानांत पाहिजे, पण तींत या हिंदु युनिव्हर्सिटीनें व्यत्यय आणिला आहे. लॉर्ड हार्डिंज साहेबांचें तसें मत नाहीं; व लॉर्ड रिपन यांचें ही नव्हतें. लॉर्ड हार्डिंज साहेबांनीं या मुद्यासंबंधानें बोलतांना लॉर्ड रिपन साहेबांची योग्य प्रशंसा केली आहे. लॉर्ड रिपन यांच्या संबंधानें स्तुतिपर उद्गार दुसऱ्या कोणत्याही व्हाइसरायांच्या तोंडून क्वचितच निघाले असतील. गुणी मनुष्यालाच गुणी जनाची पारख असते तसा येथें प्रकार घडला आहे. असो. धर्मपंथाचें शिक्षण देणाऱ्या संस्था इकडे निघाल्यास अनर्थ होतील असें भय कित्येकांस वाटतें. याचें कारण धर्मविषयक मतभेद विकोपास जाऊन त्याचें रूपांतर परमताविषयीं असहिष्णुता व द्वेष यांत होत असतें, व तें अनर्थावह असतें. हिंदुस्थानच्या मागील काळांतल्या इतिहासांतल्या गोष्टींचें चित्र अद्याप ज्यांच्या डोळ्यांपुढें उभें आहे ते त्यामुळें भयभीत होतात. पण लॉर्ड हार्डिंज यांना तशी भीती वाटत नाहीं. शिक्षणाचा संस्कार हिंदुस्थानच्या लोकांच्या मनावर घडलाच पाहिजे व परमताविषयीं भ्रातृभाव ठेवून स्वधर्माचे संस्कार ज्याला त्याला आपापल्या धर्मातल्या तरुणांच्या मनावर करतां येतील व धार्मिक शिक्षणाच्या अभावामुळें तरुणांच्या वृत्तींत येणारी कठोरता दूर होऊन स्वधर्मश्रद्धा आणि परधर्माविषयीं आदर या सख्ख्या बहिणी हातांत हात घालून नांदूं लागतील असा त्यांना पूर्ण भरंवसा आहे. निदान ही अनुभव घेऊन पाहण्याजोगी गोष्ट खास आहे. जर प्राचीनकाळीं हिंदुस्थानांत निरनिराळे धर्म एके ठिकाणीं अनेक शतकें गुण्यागोविंदानें राहिले, तर या विसाव्या शतकांत आणि इंग्रजासारख्या त्रयस्थ राज्य कर्त्यांच्या अंमलाखालीं त्यांना तसें राहतां येणार नाहीं असें समजणें म्हणजे ब्रिटिश अंमल आणि त्या बरोबरच शिक्षणापासून घडणारे संस्कार या दोहोंविषयीं ही अश्रद्धा दाखविण्यासारखें आहे.

## हिंदुस्थानचें औद्योगिक भवितव्य

मि. हेडन नांवाच्या एका शास्त्रज्ञाचें विलायतेंतल्या भूगर्भशास्त्र विषयक एका संस्थेपुढें नुकतेंच एक भाषण झालें, तेव्हां व्याख्यात्यांनीं हिंदुस्थानच्या खनिज संपत्ती पासून त्या देशांत कोणकोणते कारखाने काढतां येतील या विषयीं थोडेंसें सांगितलें. अल्युमिनमचा खप हिंदुस्थानांत वर्षाचे काठीं फक्त १९०० टन आहे, तेव्हां तो कारखाना चालणार नाहीं. म्यांगनीजचा चांगला चालेल. सरकारनें विलायतेंतल्या कारखानदारांना जसें द्रव्यसाह्य केलें तसें केल्याशिवाय रंगांचे कारखाने इकडे चालणार नाहींत. हिंदुस्थानांत दरसाल पाऊण कोट रुपयांची काच परदेशाहून येते. त्यांतली निंमे इकडे तयार होण्यास हरकत नाहीं. मात्र जपानी राज्यकर्त्यांचें धोरण हिंदुस्थान सरकारनें उचललें पाहिजे. पण सर्वांत अतिशय उपयुक्त व अतिशय व्यावहारिक असा उद्योग म्हणजे कृत्रिम खतें करण्याचा हा होण्यासारखा आहे असें मि. हेडन म्हणाले. मि. हेडन यांच्या भाषणावरून एक गोष्ट उघड होते ती ही कीं सरकारनें औद्योगिक बाबतींत आपलें धोरण ज्यास्त अनुकूळ ठेविल्या खेरीज कांहीं होणें शक्य नाहीं. राजकीय सुधारणा आधीं आणि मग औद्योगिक सुधारणा हेंच तत्त्व या गोष्टीच्या मुळाशीं आहे. पण हें तत्त्व हिंदुस्थानच्या राज्यकर्त्यांना अद्याप पटत नाहीं ही दुर्दैवाची गोष्ट आहे; आणि ज्यांचें राज्यकर्त्यांपाशीं विशेष वजन आहे ते युरोपियन व्यापारी या तत्त्वाचें नांव काढतांच कसे गुरगुरतात तें गेल्या आठवड्यांत मद्रासच्या कायदेकौंसिलाच्या बैठकीचे वेळीं चांगलें दिसून आलें. उद्योग आणि राजाश्रय यांची सांगड हिंदुस्थानांत तर प्राचीन काळीं होतीच. पण कानडासारख्या देशांत अजूनही ती आहे. तिच्यावांचून औद्योगिक प्रगति होणें अशक्य असें इंग्रज ग्रंथकारच म्हणत आहेत. खुद इंग्लंडांत सरकारनें हें तत्त्व मान्य केलें आहे. पण हिंदुस्थानांत मात्र नुसती आंकड्यांची माहिती देण्यापलीकडे हिंदुस्थानच्या कारखानदारांना दुसरें कांहीं विशेष साह्य देण्यास सरकार तयार नाहीं. एकंदरींत हिंदुस्थानचें औद्योगिक भवितव्य अशा रीतीनें मोठ्या अडचणींत सापडले आहे.

मि. हेडन म्हणतात कीं भूगर्भ व खनिजशास्त्र शिकलेल्या लोकांना हिंदुस्थानांत उत्तम कार्यक्षेत्र मोकळें आहे. मात्र त्यांना कामाचा प्रत्यक्ष अनुभव पाहिजे, नुसती पुस्तकी विद्या नको. प्रश्न हा आहे कीं अशी माणसें हिंदुस्थानानें कोठून आणावयाचीं? अशा प्रकारचें प्रत्यक्ष अनुभवाचें शिक्षण देण्याची तजवीज हिंदुस्थानांत सरकारनें कोठें केली आहे?

## महायुद्धाची प्रगति.

युद्धकलेच्या दृष्टीनें महत्त्वाचें असें गेल्या आठवड्यांत विशेष कांहीं घडलें नाहीं. बाल्कनमध्यें दोस्तराष्ट्रांचीं विमानें जाऊन पोंचलीं; उलट शत्रूचें एक झेपलिन सालोनिकाकडे गेलें. मोनास्टिरकडच्या शत्रूच्या हालचाली विषयीं अद्याप कांहीं खबर नाहीं. सर्बिया आणि मासिडोनिया या प्रदेशांतल्या मोडलेल्या रेल्वेची दुरुस्ती करण्याचें व दारूगोळा वगैरे तिकडे नेण्याचें काम शत्रूकडून सुरू असलें पाहिजे. सालोनिकावर हल्ला करण्याचा शत्रूचा बेत खरोखरच आहे काय व असल्यास तो कधीं अंमलांत येणार तें ही सांगतां येत नाहीं. तुर्क लोकांनीं अर्झरूम सोडलें अशी जी बातमी बाहेर आली आहे तींत तथ्य दिसत नाहीं. येवढें खरें कीं तिकडे रशिया जयावर जय मिळवित आहे आणि लवकरच तो सगळा आर्मेनिया पादाक्रांत करील अशी भीती तुर्कांना वाटत आहे. मेसोपोटेमिया मध्यें नद्यांना आलेले पूर ओसरेपर्यंत लढाई बंद आहे. तिकडे इंग्रजांशीं टक्कर देण्याला तुर्कांना कुमकेची फार जरूरी आहे. अर्थात सालोनिकावर होणाऱ्या हल्ल्यांत तुर्कांची मदत असण्याचा संभव दिसत नाहीं. तुर्कांना दारूगोळ्यासाठीं जर्मनीच्या तोंडाकडे पाहावें लागतें, आणि केसरपुढें 'जी हुकुम' करावें लागत आहे. तुर्कांची ही शोचनीय स्थिति कांस्तांतिनोपल मध्यें पुष्कळांना आवडत नाहीं. पण एनव्हर पादशहाच्या करड्या अंमलामुळें त्यांना आपल्या मनाची क्षुब्धता दाबून ठेवावी लागत आहे. अशी मनाची कुचंबणा असंतोष वाढवीत आहे. जर्मनीची अरेरावी ज्यांना सहन होत नाहीं अशा पक्षाचे अध्वर्यु प्रिन्स युसफ इज्जदिन यांचा वध झाल्यापासून तुर्की सरकारवरच्या संकटांत मोठीच भर पडली आहे. जर्मनी करील तो हुकुम तुर्की फौजेला एनव्हर पादशाहाच्या धाकामुळें पाळावा लागतो खरा. पण ही गुलामगिरी ज्यांना आवडत नाहीं असे तुर्की लष्करी अंमलदार कांहीं थोडे नाहींत. आपल्यावर एखादा प्रसंग गुदरला तर जर्मनी व आस्ट्रिया दोन्ही नामानिराळे होतील हें त्यांना पूर्णपणें कळत आहे. आस्ट्रियानें रेटीत रेटीत आपली फौज उत्तर आलबानियामध्यें नेली आहे. पण इंग्रजांनीं ती लाट दक्षिणेकडे येऊं दिली नाहीं. आतां सर्वांचे डोळे वसंताकडे लागले आहेत.

रशियांत रिगाकडे कांहीं महत्त्वाची गोष्ट घडली नाहीं. बुकोविनामध्यें जर्मनीनें आपल्या जडतोफा जमविल्या आहेत. पण गेल्या सालीं हिंवाळ्यांत रशियाची जी तयारी होती त्यापेक्षां यंदा पुष्कळ ज्यास्त असल्यामुळें जर्मनीचें पाऊल यंदा पुढें पडत नाहीं.

पश्चिम रणक्षेत्रांत अलीकडे जर्मनीची ज्यास्त चळवळ दिसत आहे, आणि फ्राइससारख्या क्षुद्र ठिकाणीं त्यांना थोडासा जयही मिळाला आहे. पण डांपीर, न्युव्हिल, लिहोन्स, कार्नाय वगैरे अनेक जागीं त्यांना इंग्रजांकडून दपटशहा ही मिळाला आहे. सॉमकडे जर्मनसैन्य गोळा होत आहे, व तिकडे कांहीं फ्रेंच खंदक ही त्यांनीं घेतले आहेत. पूर्व आफ्रिकेंत सर होरेस डोरिएन यांनीं मोहिम सुरू केली आहे. ईजिप्तमध्यें आरब लोकांच्या टोळ्या अद्याप फुटल्या नाहींत. आणि सुएझ कालव्यावर पूर्वेच्या बाजूनें हल्ला येतो कीं काय यावर इंग्रजांची बारीक नजर आहे. हल्ला यावयाचा असला तर अगोदर विमानांची धाड येईलच. हा हल्ला व्हावयाचाच असला तर आणखी महिना पंधरा दिवसांतच झाला पाहिजे. कारण पुढें पाण्याच्या अभावामुळें तिकडून सैन्य येणें अशक्य होईल. ईजिप्त हल्ला करण्याचा शत्रूचा बेत मूर्त स्वरूप धारण करील असा रंग दिसत नाहीं. ग्यालीपोलींतून इंग्रजांचें सैन्य मोकळें झाल्यामुळें सुएझच्या कालव्याचा बंदोबस्त कडेकोट झाला आहे व ईजिप्तवरच्या मोहिमीची अशक्यता वाढली आहे. इंग्लंडची हवा सध्या विमानसंचाराला अनुकूळ असल्यामुळें जर्मन विमानें इंग्लिश खाडी ओलांडून इंग्लंडच्या किनाऱ्याकडे वारंवार जात आहेत यांत आश्चर्य नाहीं. या खेपेस मोठमोठे कारखाने जेथें आहेत अशा शहरांवर जर्मन विमानांचा कटाक्ष दिसतो. निरुपद्रवी बायका मुलांवर बांब टाकून त्यांची हत्त्या करण्यांत जर्मनीला कांहींच शंका वाटत नाहीं इतका त्याच्या मनावर सैतानाचा पगडा बसला आहे. याचा परिणाम असा झाला आहे कीं इंग्रजांनीं ही जशासतसें वर्तन ठेवणें भाग आहे असें लॉर्ड रोज बरी सारखे मुत्सद्दी सुद्धां म्हणूं लागले आहेत. हिंवाळा संपल्यावर जर्मन विमानांच्या संचाराला अधिक जोर येईल. भूमध्यसमुद्राकडची कांहीं बातमी नाहीं. यावरून तिकडे शांतता दिसते. लुसिटानिया बोटीबद्दलचा जमनी व अमेरिका यांच्या मधला तंटा निकालाला आला आहे, पण ह्यॅमलेटप्रमाणें करूं कीं नको करूं अशी अमेरिकेची मानसिक दुर्बलता व्यक्त होण्यापलीकडे अद्याप कांहीं निष्पन्न झालें नाहीं.

# वऱ्हाडवृत्त.

**हवामान**—आकाश आभ्राच्छादित असून थोडी खंड वृष्टिही झाली. काल दुपारपासून दुपारीं उष्णता भासूं लागली आहे. प्लेगाचा पुनः उद्भव कांहीं स्थळीं होईलसें दिसतें.

**पानसुपारी**—राजेशाही थाटावर रावबहादूर ठाकूर यांच्या सन्मानार्थ पानसुपाऱ्या पुष्कळ होत आहेत ही गोष्टच साक्ष देते कीं सद्गुणांचीं रत्नें अधिकाराच्या रश्मींनी फार खुल्तात आणि सहृदय माणसें गुणीजनांचें असेंच स्वागत करीत असतात.

गेल्या ९ वे तारखेला सर बेंजामिन राबर्टसन बाळापूरास उभाउभी गेले होते. तेथें त्यांस मानपत्र देतांना पुष्कळ सद्गृहस्थांनीं १२०० रुपयावर वार-फंडाला वर्गणी दिली

## NOTICE

The Treasury officer is now prepared to issue and encash Universal Currency Notes and Home Notes ( Bombay Circle ) of other denominations for the public on demand as far as possible Endeavours will be made as far as possible in all trnsactions to meet the requirements of the payee as to the form of currency in which he desires to take payment.

The above orders do not yet apply to the Treasuries at Nagpur, Akola and Amraoti where Government treasury work is done by branches of Presidency Banks. As soon as arrangements are completed with the Banks concerned, a further notice will be issued giving the date from which free encashment of currency notes at these centres will be available.

## नोटीस

रा. रा. सुरजमल नवलराम मारवाडी व गणेशराम नवलराम मारवाडी दुकान कोसगांव ता. बाळापूर

यांसः—

खालीं सही करणार यांजकडून नोटिस देण्यांत येते कीं, मी तुह्मास ता. २६-६-०९ रोजीं रकम रु. ९०० चे व ता. २-४-०८ रोजीं रकम रु. ८०० चे अशी दोन गहाणखतें लिहून दिलीं. त्या आठशे रुपयाचे गहाणा पैकीं रु. ३०० तुह्माकडे घेणें निघतात. ते रुपये तुह्मी मजला अद्याप पावेतों दिले नाहींत. व मी तुह्माला आकोले येथें अडतीचे दुकानांत तुमची व रामानंद दानमल यांची अडतीची दुकान एक असतांना सन १९०९व १९१०व १९११-१२ या चार वर्षांचा मी अदाजा चारहजार ४००० रुपयाचा कापूस दुकानांत जमा केला. व त्यांत रामानंद दानमल कडेस जो कापुस जमा झाला त्याचे रुपये २००० तुह्मी कबूल केले. व तुमच्याकडेस जो जमा झाला तो तुह्मी जमा केला नसून त्या जमा झालेल्या कापसाच्या तगपड्या मजपाशीं आहेत. त्या रकम रुपये २००० च्या आहेत. व मी तुह्माला वरील दोन्ही गहाणखताचे सर्व रुपये दिले. असून तीं दोन्ही गहाणखतें ह्मणजे ता. २६-६-०९ व ता २-४-०८ अशी दोन्ही गहाणखतें परत मागितली असतां देतो असें ह्मणतां व गहाणखताच्या फिर्यादी करणार असें ऐकितो. करितां तुह्माला नोटिशीनें कळवितो कीं ही नोटिस पावल्यापासून आठ दिवसाचे आंत माझी दोन्ही गहाणखतें व माझ्या तगपड्याचे रु.२००० मजला परत देऊन माझे सहीची पावती घ्यावी. त्याप्रमाणें न केल्यास व या नोटिशीचा जबाब न दिल्यास व माझी गहाणखतें परत न दिल्यास व तगपड्याचा निकाल न केल्यास रितीप्रमाणें तजवीज केली जाईल. ही नोटीस दिली. ता. १०-२-१६ इ. द. देविदास जैराम देशपांडे रा आकोला

सही

जानजी वा॥ बाबजी आंद नि. खुद

हातची द. देविदास जैराम देशपांडे

पि रा. आकोला

नो. नं. ७३

## नोटीस

नोटिस बेशमी खालीं सही करणाराकडून गिरधर परशराम किराड साहू दुकान परतवाडा ता. एलिचपूर जि उमरावती

यांसः—

तुमच मजवर कर्ज आहे. त्यांत तुमचे जवळ दोन दोन हजाराचे दोन गहाण आहेत. त्यापैकीं मी तुमचे पहिल्या गहाणाचा हवाला नारायणजी वा॥ गंगारामजी यासी दिला. त्याप्रमाणें तो तुमचे येथें रुपये देण्यास आला असतां तुह्मी त्यास सांगितले कीं माझे खाते चुकते करीत असाल तर रुपये घेतो. नाहींतरें एका गहाणाचे रुपये घेत नाहीं करितां या नोटिशीनें तुह्मास कळविण्यांत येते कीं तुमचे दुसरे गहाणांत कांहीं लंद फंद आहे; करितां त्याचा माझे समोर रुजू झाल्या खेरीज तुह्मी कोणाचे जवळून दुसऱ्या गहाणाच ह्मणजे मागून जे लिहीले त्याचे पैसे घेऊं नये. परंतु पाहिल्या गहाणाचे रु. नारायणजीचे जवळून घ्यावे असें न केल्यास नारायणजी तर्ट यांचे ह्मणणें असें आहे कीं, पुढें व्याजाचा मी जबाबदार नाहीं व मी ही यापुढें आपली कोणती तक्रार ऐकणार नाहीं. गोविंदा वा॥ वायलाजी यांस जे मी फरोक्त लिहून दिले ते पोकळ आहे. त्याचे जवळून आपण पैसे वैगेर घेऊं नये. नोटीस दिली सही ता. १०-२-१९१६ इ. द. रामजी तुकडाजी पाटील

सही

रामजी तुकडाजी पा. द. खुद रा. बोर्डी

ता. एलिचपूर जि. उमरावती

नो नं. ७४

## नोटीस

नोटिस बेशमी गींगा वा॥ इमामखां तेली रा ताजनापेठ आकोला.

यांसः—

मैनाबी मर्द मजेखां रा. ताजनापेठ आकोला तर्फे मि. एम. एम खान साहेब वकील आकोला यांचे कडून नोटीस देण्यांत येते कीं तुह्मी आमचे पक्षकाराचे मालकीचे घर ताजणापेठेतील त्याचे वर्णन खालील प्रमाणें ( घर नंबर ४९ ताजणापेठ येथील दोन मजली घरापैकीं खालील मजला त्याची चतुःसिमा उ सरकारीसडक द. मेयाबीचे घर पु प. मैदाबीचे घर ) येणें प्रमाणें चतु:सिमेंतील घर तुह्मी महिन्याचे करारानें भाड्यानें घेतले आसून हल्लीं त्याचें भाडे तुह्मी दिले नाहीं. व अनेक वेळी सांगीतले असतां ताबाही सोडीत नाहीं. करितां नोटीस देण्यांत येते कीं नोटीस पावल्यापासून १५ पंधरा दिवसाचे आंत घराचे राहिलेले भाडे देऊन घर खाली करुन द्यावें. तसे न केल्यास त्या घराचे भाडे दरमहा २५ रुपये प्रमाणें द्यावें लागेल. आणि तुमचेवर फिर्याद करून कोर्ट मारफत घराचा ताबा लागलेले खर्चा सुद्धां घेतला जाईल. हें लक्षात ठेवावे कळावे ता. ९-२-१६ इ.

पक्षकार तर्फे वकील

M. M. Khan.

आकोला.

नो. नं. ७५

## नोटीस

नोटीस बेशमी खालीं लिहून देणाराकडून गोविंदा वा॥ वायलाजी जात गासीमाळी अडनाव बरोकार रा० बोर्डी ता० इलिचपूर जि० उमरावती

यांसः—

नोटीस देतो कीं ता० ९-१-१९१६ इ. रोजीं मी तुह्मांस जे फरोक्त लिहून दिलें रुपये ७००० चे ते अगदीं पोकळ आहे त्यात गिरधर वा॥ परशराम याचा ५००० रुपयांचा हवाला व रोख नगदी भरून पावलों रुपये २००० हजार परंतु त्यांत मला एक पै पावली नाहीं. व हवाल्याचें पैसे तुह्मी देऊं नये. तुह्मी मला भलते कांहीं सांगून फरोक्त लिहून घेतले. आतां या नोटिशीनें जाहीर करितो कीं आपण हवाल्याचे पैसे दिल्यास मी त्याचा जबाबदार नाहीं व आपली खरेदी पोकळ आहे ही नोटीस दिली सही ता० १०।२।१६

दस्तूर रामजी तुकडाजी पाटील

सही

रामजी तुकडाजी पाटील रा. बोर्डी

ता. इलिचपूर जि. उमरावती

नो. नं. ७६ दस्तूर खुद

## NOTICE.

The following extract from Government of India, Home Department Resolution No. 2951-2964, dated the 18th December 1914, is published for general information.

NAGPUR:
The 7-2-1916 } F. S. A. Slocock
*Chief Secretary to the Chief Commissioner, Central Provinces.*

### RESOLUTION.

2. Every native of India who contemplates proceeding out of India to foreign countries is strongly urged before leaving to furnish himself with an authoritative certificate of identity, in the appended form, signed by the Deputy Commissioner, in the case of residents of British India, and by the Political Agent in that of residents of Native States. In the case of a student the certificate should be signed by the head of his last school or college and countersigned by the Deputy Commissioner or Political Agent, as the case may be.

Appeals for assistance by destitute Indians who desire repatriation and by students who, owing to embarrassed circumstances, are unable to complete their course of education, cannot be dealt with satisfactorily unless the parties are in a position to produce evidence of identity. The possession of a certificate of identity will be specially useful to young men of good family, as it may enable the Secretary of State to obtain for them social and other attentions.

Those who are desirous, however, of travelling in countries where a passport will be necessary are advised to furnish themselves with such a document also before leaving India, in lieu of, or in addition to, a certificate of identity. It should be remembered that no person is entitled to a passport, as of right, on the ground that he is a British subject, and the production before authorities outside India of a certificate of identity, unless supplemented by documentary evidence of respectability, is not sufficient to ensure that a passport will be granted.

### FORM OF CERTIFICATE OF IDENTITY.

1. Name of applicant ______
2. Father's name and caste ______
3. Residence ______
4. Age of applicant ______
5. * Nationaliy of applicant ______
6. Social or pecuniary status of father ( or guardian ) ______
7. Date of probable departure of applicant form India ______
8. Object of applicant's visit to England ( Europe ) / America / Iapan. ______

Siguatnre of Deputy Commissioner or Politicel Agent, or Head of School or College. †

Signatnre of applicant,

Signed before me,

Deputy Commissioner or Political Agent,

Dated ______

* i. e. Whether a British subject by birth or by naturalization ( or a subject of Native State. )

† Countersignature of the Deputy Commissioner or Political Agent should be obtained on certificates signed by Heads of Schools or Colleges.

NOTE.—Holders of certificates of identity intending to apply subsequently in England or elsewhere for a passport to visit a foreign country are warned that no person is entitled to a passport as of right on the sole ground that he is a British subject. The production of a certificate of identity, therefore, will not ordinarily be sufficient to secure the grant of a passport, unless it is supplemented by documentary evidence of respectability, endorsed by a local Government or other authority competent to issue passports in India, certifying that the holder is a fit and proper person to receive a passport.

## नोटीस

रा. रा भीवराज वा॥ जगन्नाथ मारवाडी दुकान मनबद आलुके आकोट जि. आकोला

यांसः—

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुमचे नवळ माझे नावाचे सालबंदी गाहाण खत १२०० रुपयांचे आहे त्याचा करार असा कीं दरसाल दोनशें २०० रुपया प्रमाणे सहा किस्ती आहेत. व त्यांचा करार दरसालचे दरसाल मार्ग शीर्ष महिन्यांत देत जावे. याप्रमाणें तुमच्या पहील्या कीस्तीचा करार सन १९१५ सालचा असून त्या सालीं मजला पैकि बरोबर न झाल्यामुळें तुमची एक सालबंदी पडली. हल्ली चालु सालात मी मागील सालबंदी २०० रुपये व तिचे व्याज बारामहिन्याचे ३६ रुपये व चालु सालची सालबंदी २०० रुपये येकूण ४३६ रुपये आह्मी दोनवेळ तुमचे दुकानावर घेऊन आलो असतां तुह्मी रुपये घेतले नाहीं. करीतां रकम माझे घरांत पडून राहिली आहे. करितां नोटीस देण्यांत येते कीं ही नोटीस पावल्यापासून ३ दिवसाचे आंत दोन्ही सालबंद्याचे रुपये घेऊन मला दोन पावत्या लिहून द्याव्या. जर तुह्मी असें करणार नाहीं. तर करारचे पुढें झालेल्या दिवसाचे मी व्याज देणार नाहीं व कोर्टांत दावा घातल्यास कोर्टखर्च ही देणार नाहीं. कळावे तारीख ३-२-१९१६ इ.

सही.

मारुती वा॥ नरसिंग पाथरकार
रा. मनबद दस्तुर खुद
नो. नं. ७०

## नोटीस

लक्ष्मी जवजे विठोबा सुतार रा. चिखली परगणे हातगांव तालुके मुर्तिजापूर इजला

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं तूं माझी सावत्र आई आहेस. तुझा फक्त अन्नवस्त्राचा आधिकार आहे सर्व स्थावर जंगम जिनगीचा मी मालक आहे. मी माझे सख्खे बहिणी जवळ पुष्कळ दिवसापासून रहात आहे तूं माझे कोणतेही जिनगीचा संबंध ठेऊं नये. ती कोणास खरेदी, गहाण, बक्षिस, किंवा पत्र्यांनें देण्याचा तुझा आधिकार नाहीं. कदाचित दिल्यास मी किंवा माझी जिनगी कोणतेच प्रकारें बांधले जाणार नाहीं. कळावें. आकोला ता० २ माहे फेब्रुवारी सन १९१६ इ.

सही

नि. सिताराम वल्लद विठोबा अ. पा. क. मेहुणा जयराम वल्लद रामजी सुतार रा. चिखली तो मुर्तिजापूर

नो. नं. ७१

## जाहिर नोटीस

सर्व शेट सावकार दुकानदार राहणार जिल्हा आकोला

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं लक्ष्मी जवजे विठोबा सुतार राहणार चिखली तालुके मुर्तिजापूर ही अज्ञानाची सावत्र आई आहे. तिजला दुसरे कोणाचे कर्ज काढण्याची जरूरी नाहीं. तिजला कोणी कोणत्याच प्रकारचें कर्ज देऊं नये किंवा तिचे जवळून खरेदी गहाण, किंवा बक्षिस जिनगी घेऊं नये. घेतल्यास त्याची जबाबदारी त्या देणारावर राहील. अज्ञान किंवा त्याची जिनगी मुळीच जबाबदार नाहीं. कळावें.

आकोला तारीख २ माहे फेब्रुवारी सन १९१६

सही

नि. सिताराम वा विठोबा अ. पा. क. मेहुणा जयराम वा रामुजी सुतार रा. चिखली ता. मुर्तिजापूर

नो. नं. ७२


ॐ नमः श्रीगणेशाय.

### आर्यवनौषधींचा कारखाना:—मुर्डी.

**मदनामृतसंजीवनी.**

धातुवर्धक, अत्यंत कामोत्तेजक व पौष्टीक, वीर्यस्तंभक, रक्तशोधक, मनोत्साहक कांतिबुद्धिवर्धक, सुवर्णमाक्षिक, मौक्तिक, कस्तूरी व अनेक वनस्पतीमिश्र अद्भुत गुटिका.

यांच्या सेवनानें नपुंसकत्व, स्वप्नजन्य व इतर धातुपात, उन्हाळे इंद्रियशिथिलता कडकी, गर्भसंबंधी मरकेले विकार, मूत्रसंकोच, धातूचा पातळपणा, स्त्रियांची धुपणी छातींत रोग हात, पाय मूत्रमार्ग व नेत्र यांचा दाह, क्षय, पांडुरोग, मुलांची खर, जीर्णज्वर, अग्निमांद्य; मस्तकशूल, मुळव्याधी, वातरोग, निद्रानाश, पित्तविकार बाळांतरोग, मधुमेह, जुनाट पर्मा, मुष्टिमैथुनानें आलेली कृशता इत्यादि अनेक विकार खात्रीनें बरे होऊन शरीर निरोगी, मजबूत व सतेज बनते. पचनशक्ति व स्मरणशक्ति भरपूर वाढून धातू व रक्त यांची शुद्धि, वीर्यस्तंभन व भरपूर कामोद्दीपन होतें, व मनास उत्साह देतात. दूध व जडान्न भरपूर पचूं लागतें. त्यांत उपयुक्त वनस्पतींचें मिश्रण केले असल्यामुळें त्यांत अपायकारक पदार्थ अगदीं नसून वरील विकारांवर अत्यंत गुणकारक आहेत, करितां गुणाबद्दल असंख्य सर्टिफिकिटें मिळाल्या व नित्य मिळतात. पथ्यसेवनाची गरज मुळींच नसून स्त्रिया, पुरुष व मुलें यांस पाहिजे त्या दिवसांत घेण्यास अत्यंत उपयोगी आहेत एका रुपयांचे आंत मिळणार नाहींत. एकदम ४ रुपयांच्यावर कितिही घेणारास टपालखर्च माफ आहे. चार रुपयाचें आंत वेगळा टपालखर्च ५ आणे पडेल. दर एकदम ३५ गो० १ रु० ७२ गो० २ रु० १६५ गो० ४ रु० २७५ गो० ६ रु० ५५० गो० १० रुपये.

१. **अपूर्व नेत्रांजन**—पानें वडस, सारा, फुलें, खुपऱ्या, बिंदु, काच, इ० नेत्रांचें सर्व विकार त्वरित बरे होऊन दृष्टि तीव्र व थंडगार राहते. या रोगास हें अंजन खरें रामबाण आहे. १॥ तो. ड. १ रु.

२. **परम्यावर अपूर्व मिश्रण**--कोणत्याही नवा जुना पर्मा व तज्जन्य दाह. तिडीक, मुत्रांची लाला, सकाच, पुयस्राव, रक्तस्राव इत्यादि विकार पथ्य नसतां सात दिवसांत जातात. तिडीक एका वटकेंत जाते. असे रामबाण औषध कोठेंच मिळत नाहीं. बा० किं० १ रु० १। भार २ रु० सर्व औषध व्हा० नें पाठवूं.

सर्व साधनांचा मोठा क्याटलाग मागवावा. तो फुकट पाठवूं. औषधांत अपायकारक पदार्थ अगदीं नसून तीं पूर्ण खात्रींची असल्याबद्दल असंख्य सर्टिफिकिटें आहेत. याशिवाय मोठमोठे रोगांवर अनेक औषधें, ग्रंथोक्त रसायनें, भस्में, पाक, गुटिका आसवें, तेलें व सुगंधी अत्तरें वगैरे माफक दरानें मिळतात. अनु० ख० सो० ट० ख० बे० पडेल. रोखीनें किंवा व्ही. पी. नें पाठवूं. प्रकृतिमान कळविल्यास रोग्याचें निदान व चिकित्सा कळवूं.

पत्ताः—मु० मुर्डी, पो० दर्णें, जिल्हा रत्नागिरी } कृष्णशास्त्री पेंडसे वैद्य.

ना० नं० २०



## Oriental Government Security Life Assurance Co., Ltd.

ESTABLISHED 1874.

HEAD OFFICE, BOMBAY.

### FUNDS almost 5 CRORES.

INVESTED IN GOVERNMENT SECURITIES AND MUNICIPAL AND PORT TRUST BONDS.

Claims paid 4½ CRORES

### A Decennial Record of Progress.

| Year. | No. of Polices in force. | Existing Assurances. |
|---|---|---|
| 1884 | 4.823 | 1,59,25,200 |
| 1894 | 20,110 | 5 26,08,850 |
| 1904 | 43,356 | 8 88,02,223 |
| 1914 | 65,269 | 12,37,10,910 |

| Year. | Total Income. | Total Assets. |
|---|---|---|
| 1884 | 6,77,552 | 14,41,429 |
| 1894 | 4259,,607 | 94,49,971 |
| 1904 | 43,64,808 | 2,47,18,8 |
| 1914 | ,72,46,0 | 4,96,8650 |

### *SPECIAL FEATURES.*

Absolute Security—Low Rates—Liberal Conditions.
Forty years continuously increasing prosperity.
Ninety per cent of the entire Profits, after proviaing for the Reserve and divided among the Policyholders every 3 years.
Native Lives are accepted at the same rates as Europeans
Loans granted to policyholders at reasonable rates.
Prompt Payment of Claims.

***Influential and active agents wanted. Terms liberal.***

Full particulars, prospectus and proposal forms on application to:—

R. Paterson Brown
Manager

*A. C. Lal,*
Branch Secretary.
*C. P. Berar & Khandesh*
Nagpur.

N. N. 22


हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवाश्रमांत छापून प्रसिद्ध केलं.

Regd-No. N 150

# वऱ्हाडसमाचार.

Berar-Samachar.

वर्ष ५० ] आकोला--सोमवार तारीख २१ माहे फेब्रुवारी सन १९१६ ई० [ अंक ८

## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवीं ट. हां. ........२ रुपये
वर्गणी आगाऊच घेण्याची वहिवाट आहे.

---

### जाहिरात

**मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक.**

ह्या बँकेंत खालीं दिलेल्या अटीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर याच्या दरम्यान एक हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील आणि तो पैसा यापैकीं एकास अथवा जास्त इसमांस अगर यापैकीं मयताचे मागें राहील त्यांस काढतां येईल.

व्याज दर साल दर शेकडा तीन रुपयाप्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ट शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारावरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं. नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक आकोला ९।९।०९ } S. Clements; एजंट

नं १

---

**अस्सल अंगुरी.**

## हिंग

केवळ एक आणा तो. पवित्र केशर १॥ तो. शुद्ध शिलाजीत. ।॥- तो. खालिस कस्तूरी रु. २५ तो. तिबेती ममीरा रु. ३ तो.

**काश्मीर स्टोर्स श्रीनगर नं० २**

नो० नं० २

### हिंदुस्थानावर अरिष्ट

हिंदुस्थानांतील रहिवाशांच्या पाठीस ज्वर व हिवताप यांचें अरिष्ट सदोदित लागलें आहे. पण त्याचा प्रतिकार करण्यास बाटलीवाला यांचें हिवतापाचें औषध व गोळ्या ह्या रामबाण आहेत. ताप किंवा शीतज्वर येणारसें वाटतांच हें औषध घ्यावें. किं. १ रु.

**बाटलीवाला यांच्या निस्तेज लोकांसाठीं शक्तिकारक गोळ्या**

हें औषध घेतल्यानें भगवटा, मेंदूचे श्रम, पौरुषनाश, अशक्तता व क्षयरोगाचें स्वरूप, त्याप्रमाणें अजीर्ण इ. इ. विकार तावडतोब दूर होतात किं रु. १८.

**बाटलीवाला यांचें दंतमंजन.**

हें दंतमंजन मायफळाशीं कांहीं इंग्रजी औषधांचा वैद्यकीय रीतीनें मिलाफ करून बनविलें आहे. किं. ८४

**बाटलीवाल्याचें गजकर्णावर मलम.**

यानें गजकर्ण, कुजली, खरूज यांचा विकार एका दिवसांत नाहींसा होतो. किं. ८४

हीं औषधें सर्व औषधी विकणाऱ्या दुकानावर व डॉ. एच. एल. बाटलीवाला जे. पी. मु. वरळी लेबोरेटरी दादर, मुंबई यांजकडे मिळतात.

DR. H. L. Batliwala. Sons & Co Ltd
N. N. 3 Dadar Bombay.

---

# चांदीचीं भांडीं

नाशिक येथें तयार केलेलीं सर्व प्रकारचीं सुबक व वाटदार भांडीं आमचेकडे विक्रीस तयार असतात. भाव माफक व्ही. पी. नें अगर रोखीनें पाठवू. मालाचे खरेपणाबद्दल ग्यारंटी देऊ.

**पुरुषोत्तम रामचंद्र वैशंपायन**
**रविवार पेठ नाशिक सिटी**

नो. नं. ४

---

अतिशय पौष्टिक व स्तंभक

## विलासिनी वटिका.

शक्ती येण्याकरितां व ती कांयम टिकण्याकरितां एकदां वापरा पहिल्याच दिवशीं गुणाबद्दल औषध घेणाराची खात्री. किं० बाटलीस १२ आणे. पूर्ण गुणास ३ बा. अ. पत्रक सोबत.

सकळकळे ॲन्ड सन्स
शहर आकोला.

---

त्वरा करा. **जंगी लूट** अपूर्व लाभ

**जानेवारी अखेर खर्च माफ.**

उत्तम रंगदार निळीकाळी शाईच्या पुड्या पाव आणा दराच्या १०० रु. १। डायरी बक्षिस. पुडी २०० रु. २। कापडी डायरी. पुडी ४०० रु. ४ डायरी सोनेरी. इनाम न घेतां १००० पुडीस रु. ७॥

**गुण न आल्यास पैसे परत.**

वृद्धपण टाकून तरुणत्व प्राप्त करून घ्या.

## तरुण मित्र पाक

किं० २ रु०

केस काढणारा रमेश सोप ३ वड्यांचे पेटीस रु. १ दोन पेट्यास १॥। रु. चार पेट्यास रु. ३ आग न होतां डाग पडणार नाहीं. उत्तम सुवासिक आहे.

पत्ता — दयाल्दास लाल्दास आ. कं. जंगी स्टोअर बऱ्हाणपूर

नो. नं. ५

---

## नोटीशीचे दर

दर ओळीस दीड आणा.
हेडिंगच्या दोन ओळी धरल्या जातील.
नोटीस सुवाच्य असली पाहिजे.

**सूचनाः—** गुरुवारच्या आंत येणाऱ्या न टीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील. पापुढें येणाऱ्या नोटीसास स्पेशल चार्ज पडेल.

---

### विक्रीस तयार

आमचे छापखान्यांत दरखास्तीचे, वकील पत्राचे, परत भरल्याचे, लिस्टफार्म पर्च्याचे व नकलेकरितां करावयाच्या अर्जांचे नमूने छापून तयार आहेत. ते आमचे छापखान्यांत कोणत्याही वेळीं विकत मिळतील.

वऱ्हाडसमाचार कार्यालय, सदाशिवाश्रम, आकोला } मॅनेजर

---

## श्री दत्तात्रय अलंकारालय कोल्हापूर

आमचे कारखान्यांत स्वतःचे देखरेखेखालीं, मुद्दाम तयार केलेले उत्तम सान्याच सुबक दागिने— मंगळसुत्र साज, ठुशा-नोड, गुलाबाचीफुलें, बिल्वदळी टीका, मुदा, अग्रफुलें सार्थी व घागऱ्याचीं वगैरे सर्व जातीचा माल—तसेच चांदीच्या मासोळ्या, चाळ, उपकर्णी, ताटें, वाट्या, गडवे, इत्यादि माफक दरांनें मिळतील. आम्ही सर्व सोनें न्याशनलचें शंभर नंबरी वापरीत असतों. व डागाचा उपयोगही नियमितच केलेला असतो. यामुळें जिन्नस पांढरे पडण्याची अगर वाईट निघण्याची भीति बाळगण्याचें मुळींच कारण नाहीं. आमचे जिनसाची लाख काढून वजन तोलून पाहावें. गिऱ्हाइकांची खात्री करून देण्यास आम्ही तयार आहों. व्यापाऱ्यास कमिशन मिळेल. ऑर्डरी प्रमाणें माल तयार करून देऊं, चांदी सोन्याचे खरेपणाबद्दल आम्ही जबाबदार आहों. माल रोखीनें अगर व्ही. पी. नें पाठविला जातो. ऑर्डरी बरोबर एक रुपया अगाऊ पाठविला पाहिजे.

श्रीदत्तात्रय अलंकारालय—कोल्हापूर

नो नं ६

---

# कौतुकरत्नाकर

छिन्नमस्तानी धुमावती; मातंगी भैरव षोडश देवतांचे चित्रांसह
पृष्ठसंख्या ६००; विषय ६०० वर आवृत्ती ५ वी. प्र. २००००,

बंगाल्यांतील कामरूपदेशी ही विद्या फार प्रबल असून तिकडील नटेली, लगोटे, छाछु करणारे अज्ञानवादी यांचेकडून खरी माहिती मिळवून सिद्धनागार्जुन मंत्र महोदधि, महानिर्वाणतंत्र उड्डीश वगैरे ग्रंथाचे आधारें हा भानुमती ग्रंथ तयार केलेला आहे. ह्याच धर्तीवर प्रसिद्ध झालेल्या इंद्रजाल, जादुबाई इतरसंग्रह, कौतुकचिंतामणी, किमिया, गुप्त गारुडी विद्या वगैरे पुस्तकांचा ह्याचेपुढें हिशेब नाहीं. यांत कोणते विषय आहेत याचा विस्तार कळविणें फार कठीण आहे. मंत्र तंत्र व यंत्र विधिपूर्वक करणें नियम प्रहारीकांचीं वर्णनें भानुमती यंत्र वशिकरणशास्त्र नानाप्रकारचे स्तंभन प्रयोग, उच्चाटन, जारण, मारण प्रयागविधि, औषधी हुन्नर, नानारंग कला, आत्मावियामेस्मेरिझम प्रयोगविधि वैगेरे अनेक विषय आहेत. किं. ट. व्ही. पी. सह १॥ रुपया.

# कोकशास्त्र अथवा जीवनसौख्य.

ज्यांना खरोखरीच सौख्य भोगणें आहे त्या प्रत्येकांनीं हें पुस्तक अवश्य संग्रहीं ठेवावें. या पुस्तकांत कोणते विषय आहेत हे पुस्तकाच्या नांवावरून सहज समजण्याजोगें असल्यामुळें त्याचें वर्णन करणें नको. किंमत १ रुपया ट. ख. २ आणे.

पत्ताः— गंगाधर आर. आणि कंपनी.
हरिश्चंद्र बिल्डिंग मुंबई नं. ४

नो. नं. ७

## नोटीस

नोटीस बेशमी रहीमान वा॥ सेखमकतुम जात मुसलमान धंदा सुतारीचा राहणार देऊळगांव गुजरी तालुका जामनेर जिल्हा खानदेश

यांसः—

नोटीस बेशमी खालीं सही करणार चांदबी मर्द सेखरहिमान हल्लीं रा. बुल्ढाणे नोटीस देते ऐसाजे कीं मी तुमची लग्नाची बायको असून लग्न होऊन ४ वर्षे झालीं असून त्या वेळ पासून मी तुमचे येथें फक्त २-३ महिने राहिले असून तुह्मी नंतर तंटा करून मजला माझे बापा बरोबर तुह्मी परत पाठविले तेव्हां पासून नेण्यास येत नाहीं. माझा बाप गरीब असल्या कारणानें त्याजला मला पोसण्याची ऐपत नसलेमुळें बीसमीलाखां रा. राजूर यांचे मजला देणे रुपये १८० एकशे ऐंशी झाले आहे. सबब नोटीस देण्यांत येते कीं ही नोटीस पावल्यापासून तुह्मी मजला ८ दिवसांत वरील सावकाराचे रुपये देऊन घऊन जावे नाहींतर तुह्मी न आलेमुळे तुमचा माझेवर कांहीं एक हक्क राहणार नाहीं. मी दुसरा नवरा करुन जाईन. मग तुमची हीच फारकती समजली जाईल कळावें तारीख ९-२-१६ इसवी.

दस्तुर मनोहर गोविंद देशपांडे अर्जनवीस राहणार बुलडाणें.

सही.

चांदबी मर्द सेखरहीमान नि. खुद.

आंगठा दस्तुर लेखक.

नो. नं. ७८

## नोटीस

नोटीस बेशमी जानजी हुजरे धंदा कापसाचे आढतीचा रा. डोंगाळेवेस खामगांव

यासः—

या नोटीशीनें खालीं सही करणार कळवितो कीं माझी बायको नामे मुक्ती ही तुमची साक्षांत मुलगी असून तुमचा जावई नामे न्याहाशी होनाळे रा. तरोडा ता. खामगांव ग्रामीं तिला लग्नाचे निमित्त करून येथून नेले व त्यावर त्यांचे येथून तुह्मी घेऊन गेलांत त्यांस ही सुमारें १० महिने होत आले. तिच्या अगावर दागीने होते ते. गुंडवाळ्या, कोपरवाळ्या, कडीं एकूण चांदी तोळे सुमारे ६० व सोनें मुडक्या ४ एकूण सोनें ९ मासे असें दागीने तिच्या अंगावर होते. तिला नेण्याकरितां मी तुमच्या गांवीं ३ वेळ गेलों व २ वेळ वहाळ्यास व २ वेळ तरोड्यास गेलों, परंतु तुह्मी पाठवीत नाहीं. अखेरीस मी पुनः वहाळ्यास गेलों तेव्हां तुह्मी न पाठवितां तंट्यावर आलात. शेवटीं तुह्मास आतां नोटिस देतो कीं ही नोटीस पावल्या पासून १० दिवसांत तुह्मी तिला माझे घरीं दागीन्यासह आणून घालावी. तसें मुदतींत न केल्यास तिला वरील दागीन्यांसह ताब्यांत मिळण्याबद्दल मला कोर्ट मार्फत तजवीज करावी लागेल व मग तसें करण्यास जो खर्च येईल तो व या नोटिशीस लागलेला खर्च तुमचे कडून वसूल करण्यांत येईल. मग मी तुमची कोणतीच तक्रार ऐकणार नाहीं. क. ता. १२-२-१९१६ इ.

सहीची निशानी आंगठा

सोनाजी वा॥ कडताजी जाधव

रा. पांगर पो. चान्ही

ता. बाळापूर यांचा खुद

नो. नं. ७९

## नोटीस

नोटिस बेशमी गुनी उर्फ कपुरी धनगर रा. नवसाळ ता. मुर्तिजापूर

यांसः—

खालीं सही करणार यांजकडून नोटिस देण्यांत येत आहे कीं, तुझा नवरा मोनाजी हा माझा साक्षात चुलता होता. तो मयत झाल्यास सरासरी दोन वर्षे होत आली. त्याची स्थावर जंगम इस्टेट आहे. तिच्यावर ( इस्टेटवर ) तूं कर्ज काढणार असें ऐकिले. करितां या नोटिशीनें कळविण्यांत येत आहे कीं, तुजला पुत्रसंतान नाहीं, त्या इस्टेटीचा वारसा मजकडे येत आहे सबब तुजला विकावयाचा खरीदी अगर गहाण किंवा त्याजवर कर्ज काढण्याचा अधिकार नाहीं. तूं फक्त अन्नवस्त्राची मालकीण आहेस. जर करितां माझे परवानगी वांचून कोणास खरीदी अगर गहाण दिल्यास तो दस्तैवज पोकळ रद्द होऊन त्या कर्जाचा जबाबदार मी होणार नाहीं हें पक्के समजावे. त्याचे कर्मांतर वगैरे मीच केलें आहे. करितां नोटिशीनें सूचना दिली. कळावें. ता. १९-२-१९१६

सही

तानाजी वा॥ वडाजी धनगर रा. नवसाळ ता. मुर्तिजापूर द. खुद

नो नं. ८०

## जाहिर नोटीस

जाहिर नोटिस कजबे कुरुम व मौजे नवसाळ ता. मुर्तिजापूर येथील शेट साहूकार व इतर सर्व लोकांस कळविण्यांत येत आहे कीं, नवसाळ ता मुर्तिजापूर येथील माझा साक्षांत चुलता मोनाजी वा॥ सोनाजी धनगर हा मयत झाला असून त्याजला पुत्रसंतान कांहीं नाहीं. फक्त विधवा बायको गुनी उर्फ कपुरी आहे मयताची स्थावर व जंगम इस्टेट आहे. त्या स्थावर इस्टेटीवर मयताची बायको कर्ज काढणार असें ऐकिले. करितां सर्वत्र लोकांस मी जाहिर करितो कीं, त्या इस्टेटीवर कोणी तिजला कर्ज देऊं नये. व खरीदी अगर गहाण कोणी घेऊं नये. जर करितां कोणी घेतल्यास तो दस्तैवज कायद्याप्रमाणें पोकळ रद्द होऊन त्या कर्जाचे जबाबदार आह्मी पुढें व हल्लीं होणार नाहीं. सबब जाहिर नोटिशीनें कायद्याप्रमाणें सर्वत्र लोकांस कळविले आहे. ता. १३-२-१६

सही

तानाजी वा॥ वडाजी धनगर रा. नवसाळे ता. मुर्तिजापूर द. खुद

नो. नं. ८१

वऱ्हाडसमाचार

मिति माघ व ।। २ शके १८३७

## युद्ध आणि शास्त्रीय ज्ञानाची प्रगति.

प्रस्तुतच्या युद्धानें यूरोप व अमेरिका खंडांतल्या लोकांच्या शास्त्रीय शोधांचा सगळा कल आपल्याकडे आकर्षून घेतला आहे. गेल्या दीड दोन वर्षांत जेवढे शास्त्रीय शोध लागले तेवढे सगळे युद्धकलेला उपयोगीं पडण्यासारखे होते. बंदुका आणि तोफा यांचा नेम अचूक करणें, शत्रु किती अंतरावर आहे तें गाणिताच्या रीतीनें बिनचूक काढणें, अदृश्य विमानें तयार करणें वगैरे शोधांच्या मुळाशीं शत्रूवर हल्ला करून त्याचा नाश करण्याची व स्वतःचा बचाव करण्याची बुद्धि होती यांत कांहीं शंका नाहीं. विमानांच्या बाबतींत विशेषतः शास्त्रीय ज्ञानें गेल्या दीड वर्षाच्या अवधींत आश्चर्य करण्यासारखी प्रगति केली. हल्लीं समुद्रांतल्या वेडर जहाजाप्रमाणें हवेंतली वेडर विमानें बांधण्याकडे शास्त्रज्ञ आपली बुद्धि खर्चीत आहेत. पण याशिवाय सामान्यतः शांततेच्या काळांत मानवजातीच्या कल्याणाला उपयोगीं पडतील असे शोध करण्याविषयींची प्रवृत्ति अगदींच नाहींशी झाली आहे असें नाहीं. उत्तम उत्तम शास्त्रज्ञ आपली प्रयोगशाला सोडून रणक्षेत्रावर खाकी पोशाख चढवून गेले आहेत ही गोष्ट खरी आहे तरी पण मध्यम प्रतीच्या शास्त्रज्ञांनीं मागें राहून ज्ञानदेवीची आराधना करून तिचा प्रसाद मिळविण्याचें व्रत अजीबात बंद ठेवलेलें नाहीं. यामुळें इतर बाबतींतही शास्त्रीय ज्ञानाची थोडीशी प्रगति झालेली दिसते. उदाहरणार्थ, एका शास्त्रज्ञानें विजेचा प्रवाह धातूंतून लवकर जातो. आणि कांच किंवा चिनी माती यांच्यातून कां जात नाहीं याचे कारणावर नवा प्रकाश पाडण्याचा प्रयत्न केला आहे. पूर्वी शास्त्रज्ञांची अशी समजूत होती कीं धातूंतून विजेचा प्रवाह जातो त्याचें कारण धातूचे परमाणु तो वाहून नेतात. त्या बरोबर त्या वनपदार्थाचे कण ही वाहन जातात ही कल्पना कोणाला झाली नव्हती. हीं कल्पना फक्त प्रवाही पदार्थाबद्दल खरी मानीत असत. या परमाणूंना इलेक्ट्रॉन ह्मणतात. आतां लागलेल्या शोधाचा माथितार्थ असा आहे कीं धातूंचे कण मोठे असल्यामुळें त्यांच्या फटींत हे इलेक्ट्रॉन परमाणु जाऊन बसतात. ह्मणजे विद्युत्प्रवाह हा परमाणूंचा बनलेला असतो असें सिद्ध करण्याकडे या नव्या शोधाचा कटाक्ष आहे.

दुसरी कल्पना फारच प्रचंड व आश्चर्यचकित करून सोडणारी आहे आणि ती राक्षसी प्रमाणावर करनेचे व्यूह रचिणाऱ्या अमेरिकन लोकांनाच शोभणारी आहे. ही कल्पना ह्मणजे नायगाराच्या धबधब्याचें पाणी रात्रीं अडवून धरावें आणि त्यापासून विद्युच्छक्ति उत्पन्न करून देशांतल्या कारखान्याकडे ती पाठवावी, आणि दिवसा पुनः तें पाणी सोडून देऊन सृष्टीचा तो अप्रतिम देखावा पाहण्यास येणाराचे सुखाचे आड न येतां सृष्टी देवीला आपलें कौतुक खुशाल दाखवूं द्यावें. या कल्पनेचें श्रेय प्रो. नार्टन नांवाच्या एका शास्त्रज्ञाकडे आहे. लोणावळ्याजवळ जसा टाटा हायड्रो इलेक्ट्रिक कारखाना आहे तसाच नायगाराच्या धबधब्यावरचा हा कारखाना व्हावयाचा आहे. मात्र त्यांत देखावा दिवसा कायम ठेवून रात्रीं मात्र धबधबा अगदीं कोरडा ठणठणीत करण्याची अजब कल्पना या अमेरिकन कल्पनेंत विशेष आहे. या कार्याप्रीत्यर्थ ६० कोटी डॉलर ( १ डालर-सरासरी ३ रुपये ) खर्च होतील असा अंदाज आहे.

ज्योतिषाच्या बाबतींत ही शास्त्रज्ञांच्या कल्पनांत क्रांति होत आहेत. इतके दिवस अशी कल्पना होती कीं पृथ्वी, चंद्र शुक्र बृहस्पति वगैरे ग्रह फिरतां फिरतां जोरानें आपलाच कांहीं अंश फेकतात व त्या फेंकलेल्या अंशाच्या अंगीं पूर्वीची गति असल्यामुळें ते उपग्रह या नांवानें तसेंच ग्रहा भोंवतीं फिरत राहतात. पण ही कल्पना शनि व गुरु यांच्या उपग्रहांच्या व्युत्क्रम गतीशीं जुळेना. तेव्हां आतां प्रो. टर्नर यांनीं अशी कल्पना काढली आहे कीं शनि व गुरु हे ग्रह सुद्धां पूर्वी उलटे फिरत असत; अर्थात् त्यांचे उपग्रहांनाही ती उलटी गति मिळाली, पण पुढें या दोन ग्रहांनीं उपग्रहांचा डोळा चुकवून चटकन आपली गति फिरविली आणि इतर ग्रहांसारखे ते फिरावयाला लागले.

तिसरा शोध भूगोल विषयक आहे. पुष्कळांची आतांपर्यंत अशी समजूत आहे कीं पृथ्वीवर सर्वांत अतिशय थंडी ह्मणजे उत्तर किंवा दक्षिण ध्रुवापाशीं आहे. पण एका शास्त्रज्ञानें ही कल्पना खोटी ठरविली आहे. तो ह्मणतो कीं साऱ्या जगांत अतिशय थंड भाग सैबेरियांत एके जागीं आहे. तेथें पारा सुद्धां थिजतो व त्यामुळें पारा भरलेलीं थरमामिटरें निरुपयोगी होतात. येथें थंडीमुळें मृत्यूचेंच साम्राज्य सर्वत्र दिसतें. ह्मणून या जागेला डेथ व्हॅली असें नांव पडलें आहे.

चवथा शोध गल्फ स्ट्रीम नांवाच्या समुद्रांतर्गत प्रवाहाच्या दिशेसंबधानें चकित करून सोडणारा आहे. एक शास्त्रज्ञ ह्मणतो कीं हा प्रवाह आपली दिशा बदलूं लागला आहे. यामुळें ग्रेटब्रिटन हा देश इतके दिवस थंड, असे तो आतां हळूं हळूं उष्ण होत जाईल. इंग्लंडांतल्या लोकांना फ्लानेलचे सूट अंगांत घालण्याचें कारण पडणार नाहीं, आणि लोकरी कापडाच्या कारखान्यांची जागा बर्फाचे कारखाने घेतील. या नव्या शोधांत सत्य किती आहे व कल्पनेची भेसळ किती आहे याची परीक्षा करण्यास युरोपियन शास्त्रज्ञांना सध्यां लढाईमुळें फुरसत नाहीं. तथापि हे शोध गमतीचे आहेत खरे.

## मि. गांधी व मिसेस बिझांट.

काशीच्या हिंदु युनिव्हर्सिटीच्या स्थापनेच्या कार्यक्रमाच्या इतिहासांत एक अकल्पित व

अतिशय शोचनीय प्रसंग घडून येऊन जमलेल्या लोकांच्या मनाचा फार विरस झाल्याची गोष्ट प्रसिद्ध झाली आहे. मि. गांधी हे भाषणाच्या ओघांत सी. आय. डी. च्या लोकांनीं व्हाइसरायसाहेबांच्या रक्षणासाठीं घेतलेल्या विशेष खबरदारीच्या उपायांना उद्देशून बोलूं लागले, तेव्हां मिसेस बिझांट बाईनीं त्यांच्या त्या भाषणाला हरकत घेतली. मि. गांधी यांनीं दरभंगाच्या महाराजांना लिहिलेल्या पत्रावरून त्यांच्या त्या भाषणाचा जो खुलासा होतो तो असा आहे कीं युनिव्हर्सिटी स्थापनेसारख्या शुभप्रसंगीं थोड्याशा अविचारी व उच्छृंखळ तरुणांच्या वर्तनामुळें सी. आय. डी. च्या लोकांना विशेष खबरदारीचे उपाय योजावे लागले ही शोचनीय गोष्ट आहे असें मि. गांधी म्हणत होते. त्यांनीं अराजक लोकांचा तीव्र निषेध अगोदर करून मग सी. आय. डी. नें घेतलेल्या खबरदारीचा उल्लेख केला असता तर कांहीं गडबड झाली नसती. पण दुर्दैवानीं वाक्याची रचना उलटी पडून अगोदर पोलीस बद्दलचा उल्लेख आला, आणि अराजकांच्या निषेधपर वाक्य वक्तयांच्या तोंडून निघण्याचे पूर्वींच जमलेल्या राजे लोकांचा गैरसमज होऊन ते उठून चालते झाले. सुदैवानें मि. गांधी यांचें आजपर्यंतचे चरित्र इतकें निष्कलंक आहे कीं त्यांच्या राजनिष्ठेबद्दल सी. आय. डीच्या लोकांना सुद्धां शंका घेण्यास कारण मिळणार नाहीं. तथापि मिसेस बिझांट बाईच्या उतावळ्या वर्तनानें देशी संस्थानिकांना त्या सभेंत बसणें अशक्य झालें, आणि सभेचा विचका झाला. या संबंधानें बाईनें जो खुलासा केला आहे तो आह्मांला तरी समाधानकारक वाटत नाहीं. त्या म्हणतात कीं आपल्या मागें सी. आय. डीचा एक आफिसर बसला होता व मि. गांधीच्या तोंडचें आक्षेपार्ह वाक्य ऐकतांच तो म्हणाला कीं या भाषणाचा रिपोर्ट आतां कमिशनर साहेबांकडे करण्यांत येईल. म्हणून मी घाबरलें व पुढचा अनर्थ टाळण्यासाठीं मी स्वतःच त्या भाषणाला आक्षेप घेतला. जर त्या भाषणांत खुद्द बाईला आक्षेपार्ह कांहीं वाटत नव्हतें, तर सी. आय. डी. आफिसराच्या गुरकावणीला भिऊन त्यांनीं सभेचा असा विचका कां करावा तें कळत नाहीं. त्या इतक्या भित्र्या खास नाहींत.

---

## युद्धाच्या गोष्टी

जर्मनी तहासाठीं अतिशय आतुर झालेला दिसतो. त्यानें सर्बियाच्या, बेल्जमच्या व राशियाच्या मार्फत तह जुळवून आणण्याची खटपट करून पाहिली, पण जुळलें नाहीं. इंग्लंड लढत आहे तोंपर्यंत आह्मी लढणार असें सर्वांनीं उत्तर दिलें.

सध्यां समरभूमीवर नुसत्या इंग्लंडमधल्या वर्तमानपत्रांचेच दोन हजार बातमीदार गेले होते. पैकीं साठ मारले गेले व १०० जखमी झाले.

पायोनियरचा बातमीदार म्हणतो कीं पेट्रोग्राडहून अशी खबर मिळते कीं बुकोव्हिना प्रांतांतून शत्रु आपलें सैन्य काढून नेत आहे. पण तें सैन्य कोठें जात आहे तें मात्र कळत नाहीं. जर्मन लोक कांहीं तरी मोठा व्यूह रचीत आहेत, व दारूगोळ्याची वगैरे जय्यत तयारी चालली आहे खास. युद्ध सामग्रींत तोफांचीच संख्या अधिक आहे. सर्वांत मोठ्या म्हणजे २१ इंची तोफा आणिल्या आहेत. या तोफा ठेवण्याचे प्लाटफार्म पोलादाचे आहेत, व या तोफांचा एकेक गोळा १८ फूट लांब असून त्याचें वजन ८० मण आहे!

---

## बादशहाचें आश्वासन.

प्रस्तुतच्या युद्धांत लढण्यासाठीं हिंदुस्थानांतून गेलेल्या शिपायांपैकीं कित्येक जखमी होऊन विलायतेंत इस्पितळांत पडले होते. त्यांनीं बरे झाल्यानंतर बादशहाचें दर्शन घेऊन त्यांना मानपत्रद्वारें आपले राजनिष्ठेचे उद्गार कळविण्याची संधी साधली ही गोष्ट हिंदुस्थानचे इतिहासांत नमूद करण्यासारखी झाली आहे. कारण तिच्यामुळें बादशाहा पांचवे जॉर्ज यांना हिंदुस्थानच्या राजनिष्ठ प्रजेबद्दलची आपलें प्रेम, सहानुभूति आणि दयाळु राजनीतिचें धोरण पुढें ठेवण्याविषयींचे आश्वासन हीं व्यक्त करण्याची संधी मिळून साध्वी व्हिक्टोरीया महाराणीनें दिलेल्या सनदेच्या पुनरुक्तीनें त्या सनदेला एक प्रकारची बळकटी प्राप्त झाली आहे. बादशाहांनीं सदर मानपत्र देणाऱ्या शिपायांना 'सरदार' अशा संज्ञेनें संबोधिलें. हिंदुस्थानांत 'सरदार' या शब्दाला किती मान व महत्त्व आहे हें ज्यांना माहित आहे त्यांना त्या संज्ञेवरूनच बादशाहाचे ठायीं हिंदी शिपायांबद्दल किती आदर वाटत असला पाहिजे व ती संज्ञा आपणांस लाविल्याबद्दल हिंदी शिपायांना ही केवढा अभिमान व संतोष वाटत असला पाहिजे याची बरोबर कल्पना करतां येईल. मानपत्र देणाऱ्या शिपायांचे विचार हेच साऱ्या हिंदी प्रजेचे विचार होत अशी जी जाणीव बादशहांनीं व्यक्त केली ती अक्षरशः खरी आहे. हिंदुस्थाननें ज्या युद्धांत वस्तुतः पाहतां आपला विशेषसा संबंध नाहीं अशा युद्धांत लढण्यासाठीं आपल्या जन्मभूमीपासून आणि प्रियजनांपासून हजारों मैल दूर जाऊन तेथें केवळ राजनिष्ठेसाठीं आपला रक्तपात करण्यास सिद्ध व्हावें या गोष्टीचा परिणाम जरी कित्येक निष्ठुर हृदयाच्या इंग्रज लेखकांवर झाला नाहीं व हिंदुस्थाननें या युद्धांत जेवढी जबाबदारी उचलावयास पाहिजे होती तेवढी अद्याप उचलली नाहीं अशा तऱ्हेनें बोलून गरीब हिंदीप्रजेच्या अंतःकरणावर डागण्या देण्यास ही प्रसंगीं ते तयार होतांना दिसतात, तथापि सार्वभौम बादशहाला आपण केलेल्या सेवेची पूर्ण जाणीव आहे आणि या सेवेचा मोबदला हिंदुस्थानला पूर्णत्वानें मिळावा अशी बादशाहाची उत्कट इच्छा ही आहे हें पाहून मानपत्र देणाऱ्या हिंदी शिपायांना व त्याचे बरोबरच साऱ्या हिंदी प्रजेला जें समाधान वाटत आहे त्याची यथार्थ कल्पना शब्दांनीं व्यक्त करणें अशक्य आहे. ब्रिटिश साम्राज्याच्या स्वातंत्र्यावर गदा घालूं पहाणाऱ्या सांप्रतच्या युद्धानंतर हिंदुस्थानांत ज्या मानानें सामाजिक व राजकीय उन्नति होईल त्या मानानें हिंदुस्थानाला अधिकाधिक स्वातंत्र्य देण्याचें बादशहांनीं दिलेलें आश्वासन अत्यंत महत्त्वाचें आहे. हिंदुस्थानच्या प्रजेला धर्मस्वातंत्र्य प्राणांहून ही अधिक प्रिय आहे हें जाणून बादशहांनीं आपल्या भाषणाच्या शेवटीं व्हिक्टोरिया महाराणी साहेबांच्या सनदेचा उल्लेख करून सदर स्वातंत्र्य हिंदुस्थानापासून हिरावून घेण्याचा प्रयत्न केल्यास त्यावर आमचा तीव्र रोष होईल असें ही बादशहांनीं स्पष्टपणें म्हटलें आहे. इतकें कळकळीनें स्पष्टपणें आणि इंग्लंडच्या राजपदावर भाविष्यकाळीं येणाऱ्या वंशजांना ही वचनबद्ध करणारे आश्वासनाला ही अशक्य सनद म्हणणारे अधिकारी यापुढें तरी न निघोत आणि हिंदी प्रजेच्या मनावर आपल्या विषादिग्ध शब्दांनीं प्रखर आघात न करोत येवढीच परमेश्वराजवळ हिंदी प्रजेची प्रार्थना आहे.

---

## राजकुमारांना उपदेश.

मुंबईचे गव्हर्नर ना. लॉर्ड वेलिंग्डनसाहेब काठेवाडांतील संस्थानिकांची मुलाखत घेत घेत हिंडत आहत. त्यांचीं भाषणें रोजच्या रोज वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध होत आहेत, आणि बारीक दृष्टीनें व लक्षपूर्वक वाचणारांस त्यापासून सरकारचें धोरणाचा चांगला अंदाज करतां येण्यासारखा आहे. पण ज्यांना उद्देशून तीं भाषणें करण्यांत येत आहेत ते आमचे देशी संस्थानिक त्यापासून कितीसा बोध घेत आहेत हें सांगणें कठीण आहे. राजकोट येथें राजकुमार कॉलेजांत गव्हर्नर साहेबांचें भाषण झालें. त्यावेळीं त्यांनीं कुमारांना जो उपदेश केला तो बहुमोल होता. आमचीं राजकुमार कॉलेजें इंग्लंडांतल्या पब्लिक स्कूलच्या पद्धतीवर काढण्यांत आलेलीं आहेत खुद्द गव्हर्नर साहेबांना पब्लिक स्कूलमध्येंच शिक्षण मिळालेलें आहे. तेव्हां स्वानुभवावरून त्यांनीं त्या शिक्षणपद्धती पासून होणारे जे दोन फायदे सांगितले ते लक्षांत घेण्यासारखे आहेत. ही पब्लिक स्कूलची शिक्षण पद्धति श्रेष्ठ कां समजली जाते याचीं कारणें त्यांनीं जीं सांगितलीं तीं हीं कीं या शाळांतून बुद्धि आणि शरीर यांच्या वाढीकडे सारखें लक्ष दिलें जात व दुसरी गोष्ट कीं मनुष्याचें वर्तन, कर्तव्याची जाणीव, मनसावाचा कर्मणा प्रामाणिकपणानें राहणें, मानासिक औदार्य व न्यायान्याय विचार यां गोष्टींकडे तेथें विशेष लक्ष दिलें जातें. हे गुण राजकुमारांनाच काय, पण सामान्य जनाला ही आयुष्यांत अत्यंत अवश्यक असे गुण आहेत यांत शंका नाहीं. प्रश्न येवढाच आहे कीं आमच्या इकडे राजकुमारकॉलेजांतून बाहेर पडलेल्या किती संस्थानिकांनीं हे गुण संपादल्याचा पुरावा आपल्या वर्तनांत आतांपर्यंत दिला आहे? इंग्लंडमधल्या सरदार पुत्रांना उद्योगाचा माहिमा कां कळावा आणि आमच्या राजकुमारांना तो कां कळूं नये? आमच्या राजकुमारांना बडेजावानें राहण्यांत कां भूषण वाटावें? ना. गव्हर्नर साहेब म्हणतात त्याप्रमाणें या प्रश्नाचें रहस्य एका गोष्टींत आहे, आणि ती गोष्ट म्हणजे विलायतेंतल्या पब्लिक स्कूल्स मध्यें नोकरचाकरांना तैनातीला घेऊन राहण्याची सरदार पुत्रांना मनाई आहे, व येथें ती नाहीं. यामुळें ऐष आराम, विलास, हांजी हांजी करून घेण्याची संवय, वगैरे दुर्गुण राजकुमाराचे अगीं जे जन्मापासून संवयीमुळें जडलेले असतात ते पुढें कॉलेजांतल्या शिक्षणानें सुद्धां जात नाहींत. खुद्द बादशहाची राहणी अतिशय साधी कां ? आणि त्या मानानें अत्यंत क्षुद्र पदवीच्या अशा आमच्या एखाद्या संस्थानिकाची राहणी थाटामाटाची व कुर्रेबाजीची कां? यांतलें ना गव्हर्नर साहेब नीं दाखविलेलें इंगित 'नळी फुंकली सोनारें' या प्रमाणें व्यर्थ होणार नाहीं अशी आ[illegible] आशा करतों.

---

## सरदार पुत्रांचें जीवित साफल्य.

त्यानंतर गोंडळच्या गिराशिया कॉलेजमध्यें गव्हर्नर साहेबांचें एक भाषण झालें. काठेवाडांत विवक्षित जमीनदार व सरदार यांना गिराशिया असें नांव आहे. या कॉलेजच्या प्रिंसिपाल साहेबांनीं रिपोर्ट वाचतांना मोठ्या आढ्यतेनें सांगितलें कीं आह्मी आमच्या विद्यार्थ्यांना शिक्षणाला प्रारंभ केल्यापासून इंग्रजी भाषा शिकवितों. जणूं काय जन्मभाषा शुद्ध बोलतां न येईना कां, पण इंग्रजी चांगलें बोलतां आलें कीं सरदार पुत्रांचें जन्मसाफल्य झालें! विद्यार्थ्यापुढें जीवितसाफल्याचा असा आदर्श ठेवणाऱ्या शिक्षकांच्या हातून इंग्रज अधिकाऱ्यांची खुशामत करण्यांत तरबेज असेच विद्यार्थी निघावयाचे असें अनुमान कोणीं केल्यास तें बहुधा चुकावयाचें नाहीं. ना. गव्हर्नर साहेबांनीं या आढ्यतेनें सांगितलेल्या शिक्षणतत्त्वाची तिरस्कारपूर्वक संभावना केली, व त्यासंबंधानें आपल्या भाषणांत पूर्ण मौन स्वीकारलें. तथापि या सरदार पुत्रांना ज्या लोकांत व ज्या रीतीनें आयुष्य काढावयाचें त्या परिस्थितीला अनुरूप असें वर्तन त्यांनीं ठेवावें हें सांगितलें यावरूनच प्रिंसिपाल साहेबांनीं ओळखून शहाणे व्हावें.

---

## संस्थानिक आणि प्रजा.

यांच्यात मायलेकरांचें नातें आहे असें नेहमीं सांगण्यांत येतें व प्रजा तर याही पेक्षां ज्यास्त—प्रत्यक्ष देवाच्या जागीं राजाला मानीत असते. पण आमच्या राजे लोकांचा कुर्रा इतका विचित्र असतो कीं आपल्या प्रजेला तिचीं दुःखें कळविण्याची संधी सुद्धां ते फारशी देत नाहींत. या नियमाला श्रीमंत गायकवाडासारखे अपवाद नाहींत असें नाहीं, पण सामान्यतः राजे लोकांबद्दलची ओरड ही आहे कीं ते आपल्या प्रजेला आपलें द्वार खुलें ठेवीत नाहींत. या गोष्टीस उद्देशूनच ना. गव्हर्नर साहेबांनीं स्वतःच्या वर्तनाचा उल्लेख केला असावा असें वाटतें. ते म्हणाले कीं मी मुक्तद्वार ठेविलें आहे; इतकेंच नाहीं तर रिपोर्टावरून लोकस्थितीचें ज्ञान करून घेण्यापेक्षां लोकांत मिसळून व त्यांच्याशीं बोलून मी त्यांच्या स्थितीचें ज्ञान करून घेत असतों. ना. गव्हर्नर साहेबांसारखें वर्तन

किती देशी राजाचें आहे हें त्या राजांनींच आपल्या मनाशीं ताडून पाहावें.

---

## हिंदुस्थान आणि साम्राज्यपरिषद

ब्रिटिशसाम्राज्य परिषदेंत सामिल होण्याचा मान हिंदुस्थानला देण्यांत यावा अशा अर्थाचा ठराव हिंदुस्थान सरकारच्या वरिष्ठ कायदे कौंसिलांत येऊन त्याला हिंदुस्थान सरकारची इंग्लंडांतल्या सरकारची व सामान्यतः वसाहत सरकारची ही अनुमति मिळाली, पण हिंदुस्थानला स्वराज्याचा हक्क नसल्यामुळें त्याला या परिषदेंत प्रतिनिधि पाठविण्याचा हक्क कसा देतां येईल हा प्रश्न येऊन पडला आहे. इच्छा असली कीं मार्ग सापडतो ही ह्मण येथें ही लागूं करतां येईल. साम्राज्य परिषदेची घटना कांहीं ईश्वरानिर्मित नाहीं. ती मनुष्यकृतच आहे. तेव्हां परिषदेच्या सर्व सभासदांनीं हिंदुस्थानची अढळ राजभक्ति आणि सांप्रतच्या युद्धांत त्यानें केलेली अश्रुतपूर्व सेवा ध्यानीं आणून आपल्या घटनेंत इष्ट ते फेरफार करून हिंदुस्थानला न्याय द्यावा, व व्हाइसराय साहेबाच्या कौन्सिलानें निवडून पाठविलेल्या प्रतिनिधींचा परिषदेंत समावेश करून परिषदेपुढें चर्चेसाठीं येणाऱ्या विषयांसंबंधानें हिंदुस्थानच्या लोकमताला ही योग्य मान द्यावा अशी जी सूचना केपटाइम्स सारख्या पत्रानें केली ती सर्वथैव विचार करण्यासारखी आहे.

---

## शेतकी सुधारणा.

हिंदुस्थानचें जीवन व हिंदुस्थान सरकारच्या खजिन्याची समृद्धि या दोन्ही गोष्टी मुख्यतः शेतकीवर अवलंबून असल्यामुळें सध्यां सरकार व प्रजा या दोघांचें ही लक्ष शेतकीच्या सुधारणेकडे लागावें हें साहजिक आहे. पण आश्चर्य हें आहे कीं अशा सार्वजनिक हिताच्या गोष्टीच्या चर्चेंत सुद्धां सरकारी अधिकारी बिनसरकारी लोकनायकांचें ह्मणणें ऐकून घेण्याविषयीं विशेषसे उत्सुक दिसत नाहींत हें पुसा येथें नुकत्या भरलेल्या परिषदेच्या रिपोर्टावरून दिसतें. हिंदुस्थानांत शेतकी संबंधाच्या शास्त्रीय ज्ञानाचा प्रसार करून शेतकऱ्यांच्या मुलांना आपला उद्योग इंग्रज किंवा अमेरिकन शेतकऱ्यांइतका चांगल्या रीतीनें चालविण्यास समर्थ करणें हें शेतकीखात्याचें व सरकारचें आदर्श धोरण आहे असें अध्यक्ष ना. मि. हिल यांनीं सांगितलें. पण त्याबरोबरच हें सूचित केलें कीं शेतकी कॉलेजांतन निघालेले पदवीधर नोकऱ्यांचे मागें लागतात यामुळें हीं कॉलेजें काढण्याचा उद्देश सफळ होत नाहीं. या पदवीधरांनीं स्वतः शेती हाकून सुधारणा करावी हा उत्तम मार्ग आहे याविषयीं शंका नाहीं. पण त्यांना रेव्हेन्युखात्यांत जागा दिल्यानें ते शेतकऱ्यांना आपल्या ज्ञानाचा फायदा करून देतील हा ही कांहीं सामान्य फायदा नाहीं. इकडच्या शेतकी कॉलेजांतली शिक्षणपद्धति भिन्न परिस्थितींतल्या इंग्लंडच्या पद्धतीच्या नमुन्यावर ठेवण्याचें कारण आह्मांस दिसत नाहीं. त्यापेक्षां इकडच्या स्थितीला जुळणारी अशी एखादी पद्धति काढवयास पाहिजे आहे शेतकीखात्यानें आपल्या पुढें जें ध्येय ठेविलें आहे त्यांत ही सुधारणा होणें अवश्य आहे. सध्यांचें ध्येय ह्मणजे केवळ शेतकीच्या पद्धतींत सुधारणा करणें ' आहे. पण शेतकीची स्थिति ही शेतकऱ्यांच्या स्थितीशीं नेहमीं संबद्ध राहणार. तेव्हां शेतीची स्थिति सुधारावयाची ह्मणजे तिच्या बरोबर शेतकऱ्यांचें अज्ञान घालवून त्यांना सज्ञान करणे, त्यांना ऋणमुक्त करणें, त्यांना शास्त्रीय ज्ञान त्यांच्या भाषेंत करून देण्याची तजवीज करणें, वगैरे अनेक गोष्टी केल्या पाहिजेत, व सरकार अंशतः त्या करीत ही आहे ही गोष्ट कृतज्ञतापूर्वक आह्मी सांगतों. तथापि अद्याप करण्यासारख्या गोष्टींचा पर्वत पडला आहे. लोकनायकांचें साह्य या कामीं घेतल्याशिवाय एकट्या सरकारनें हा पर्वत पालथा घालवणार नाहीं. नुसत्या लोकांच्यानें ही तें काम होणार नाहीं. पुष्कळ ठिकाणीं कायद्याची ही मदत घ्यावी लागेल. उदाहणार्थ, शेताचे लहान लहान तुकडे पडत जाणें हें शेतसुधारणेस अत्यंत अनिष्ट आहे. पण हें कायद्याशिवाय कसें बंद होणार? शेतकऱ्यांच्या मुलांना नुसतें शेतकी शिक्षण द्यावें, प्राथमिक शिक्षणाची जरूरी नाहीं असें कित्येकांना वाटत आहे. पण ही चूक आहे. पण शेत सुधारणा शास्त्रीय पद्धतीनें व्हावयास पाहिजे आहे तर ती प्राथमिक शिक्षणाच्या अभावीं कशी होणार? स्वतःच्या दुर्दशेचें डोळ्यांत उत्तम अंजन घालण्यास शिक्षणासारखें खरोखर अंजन नाहीं. अशा शिक्षणासारख्या महत्त्वाच्या साधनापासून पराङमुख होण्याकडे सरकारी अधिकाऱ्यांची अधिकाधिक प्रवृत्ति दिसावी ही जितकी शोचनीय तितकीच आश्चर्याची गोष्ट ह्मटली पाहिजे.

---

## युद्धसमाचार

जसजसा युद्धाचा कालावधि वाढत जात आहे, तसतशीं जर्मनीचें बळ संपुष्टांत येत चालल्याचीं अधिकाधिक प्रमाणें दृग्गोचर होंत आहेत. पश्चिम रणक्षेत्रांत सध्या फ्रेंच सैन्याची सरशी आहे ही सरशी किती जागा जर्मनीच्या दाढेंतून काढण्यांत आली या मापानें मोजतां येण्यासारखी नाहीं, पण शत्रूला जर्जर करण्याकडे तिचा रोख आहे हें ध्यानांत ठेवल्यानेंच दिसणारी आहे. बेलज्यममध्यें शत्रूनीं इसेर कालवा ओलांडून जाण्याचा अनेकवेळां प्रयत्न केला, पण फ्रेंचांनीं त्यांना तसें करूं दिलें नाहीं. मेसानिल टेकडीच्या सुरक्षित जागेवर हल्ले करून फ्रेंचांना तेथून हटविण्याचे प्रयत्न ही वृथा झाले. इतर भागांतून ही जर्मनीची अशीच फजीती झाल्याचीं उदाहरणें दररोज घडत आहेत. रशियाचा हुरूप अद्याप सारखा वाढत्या प्रमाणांत आहे. रिगाच्या प्रदेशांत तोफखान्यांचें द्वंद्व चालूच आहे. तेथें जर्मनीच्या हातून गारबुनोनका हें महत्त्वाचें ठिकाण रशियानें सोडविलें. झरनोव्हित्झ येथील संग्राम प्रतिक्षणीं जर्मनीची व आस्ट्रियाची काळजी वृद्धिंगत करीत आहे. फ्रेंच सैन्यानें वर्डर नदी ओलांडल्यानें बाल्कन प्रकरणाला पुनः लवकरच रंग चढेल असा सुमार आहे. रूमानिया दोस्त राष्ट्रांना मिळेल कीं काय अशी भीति शत्रूला पुष्कळ दिवसांपासून वाटत आहे, पण आतां त्या भीतीला वाचा फुटलेली दिसूं लागली आहे ग्यालिशियामध्यें राशियन तोफखान्याचें खरें भीषण स्वरूप दिसत आहे अशी कबुली शत्रूकडून मिळूं लागली आहे. कॉकेशसकडेही रशियाची मर्दुमकी सर्वतोमुखीं गाजत आहे. तिकडे थंडीचा कडकपणा इतका विलक्षण आहे कीं उष्णतामापक यंत्रांतला पारा ० अंशाखालीं ९० डिग्री गेला आहे. व सारी जमीन बर्फाच्या जाड थरानें आच्छादित झाली आहे. तरी अशा अडचणींतून राशियन लोक मार्ग काढीत अर्जरूमकडे जात आहेत अर्जरूमच्या जवळच्या कित्येक दुर्गम खिंडी, त्यांनीं हस्तगत केल्या आहेत. इतकेंच नाहा तर ८०० शत्रूंना कैद करून ८ तोफा व पुष्कळशी लूट मिळविली आहे. अर्जरूमचा किल्ला दुर्भेद्य समजला जातो पण त्यांत ही रशियन तोफखान्यानें भेद निर्माण केला आहे.

---

इंग्लंडमध्यें सक्तीच्या लष्करी नोकरीचा कायदा केल्यापासून सैन्यांत भरती होण्यास माणसांची वाण कधीं पडली नाहीं. डर्बी येथील अविवाहितांच्या शेवटच्या वर्गाला लष्करांत हजर राहण्याविषयींचे हुकुम सुटले आहेत. लॉर्ड फिशर यांना आरमारी खात्यावर पुनः आणण्याचे प्रयत्न कित्येकांकडून अद्याप चालले आहेत. पण तसें करणें ह्मणजे मि. बाल्फर यांचे विषयीं अविश्वास व्यक्त करण्यासारखें आहे व तीं गोष्ट पुष्कळांना पसंत नाहीं. लॉर्ड कर्झन यांना विमानखात्याचे प्रधान नेमण्यांत येईल असें ह्मणतात. जर्मन विमानांनीं इंग्लंडच्या किनाऱ्यांवर वारंवार बांब टाकून निरुपद्रवी स्त्रियां व मुलें यांची हत्या केली, तिचा सूड घेण्यासाठीं इंग्रज विमानांनीं जर्मनीवर जाऊन तशींच कृत्यें करावीं असें ह्मणणारा एक पक्ष इंग्लंडमध्यें निघाला आहे. आणि जशास तसें हा न्याय युद्धाच्या काळांत जरी समर्थनीय असला तरी इंग्लंडसारख्या सुधारलेल्या राष्ट्राच्या इभ्रतीस, न्यायप्रियतेस व भूतदयेविषयींच्या लौकिकास तो बट्टा लावणारा आहे ह्मणून या सूचनेच्या विरुद्ध पुष्कळ मोठमोठ्या लोकांकडून मतें प्रदर्शित करण्यांत येत आहेत.

---

इंग्लंडच्या युद्धफंडाला हिंदुस्थानच्या राजेरजवाड्याकडून मोठमोठ्या देणग्या दिल्याबद्दलच्या बातम्या आल्यावांचून एक आठवडा ही सुना जात नाहीं. मागच्या आठवड्यांत श्रीमंत गायकवाड सरकारांनीं तह होईपर्यंत दरमहा १२००० रुपये ब्रिटिश सरकारला युद्धाचे साह्यार्थ देण्याची आपली इच्छा प्रगट केल्याचें प्रसिद्ध झालें होतें. गेल्या आठवड्यांत कच्छ संस्थानच्या रावांनीं युद्ध संपेपर्यंत एका हिंदी पायदळ पलटणीच्या खर्चास मदतीदाखल ह्मणून दरमहा ४९००० रुपये देण्याचा आपला मानस इंग्रज सरकारास कळविला आहे. हिंदी संस्थानिक स्वयंस्फूर्तीनें अशा देणग्या देण्यांत परस्परांशीं अशी स्पृहणीय स्पर्धा चालवीत असतां व या त्यांच्या औदार्याबद्दल खुद्द शाहिनशहा पांचवे जॉर्ज बादशहा व मुख्य प्रधानापासून ता चीफ कमिशनरापर्यंत सगळे अधिकारी संतोष प्रदर्शित करीत असतां कित्येक क्षुद्रबुद्धीचे इंग्रज लेखक हिंदुस्थाननें योग्य मदत अद्याप केली नाहीं असें ह्मणत आहेत, या क्षुद्रपणाला काय ह्मणावें तें कळत नाहीं.

---

## अभिनंदनीय प्रौढ विवाह.

प्रौढ विवाह आतां हिंदुसमाजांत लवकरच रूढ होतील असें भाकीत करण्यास आतां कांहीं फारसें अंतर्ज्ञान नको आहे. इंदुरसारख्या मागसलेल्या प्रांतांत सुद्धां ते होऊं लागले आहेत. नुकत्या हातीं आलेल्या तेथील ' मल्हारिमार्तंड विजय ' पत्राच्या ताज्या अंकांत तेथें एकाच दिवशीं दोन प्रौढ विवाह झाल्याची हकीकत प्रसिद्ध झाली आहे. दोन्ही विवाहांत वधूंचीं वय १८ वर्षांचीं होतीं. दोघेही वर प्रथम वर असून त्यांचीं वयें २९ व. २७ वर्षें आहेत. एक वधू तर मॅट्रिकपर्यंत शिकलेली असून पुढचे महिन्यांत त्या परीक्षेला बसणार आहे. दुसऱ्या विवाहाचें विशेष स्वरूप ह्मणजे तो जातिभेदाला झुगारून देणारा झाला हें आहे. दोन्ही विवाहांच्या मिरवणुकीला प्रोत्सहन देण्यासाठीं तेथील महाराजांनीं हत्ती घोडे वगैरे सरंजाम पुरविल्याचें ही सदर पत्रावरून कळतें. श्रीमंत महाराजांनीं स्वतःच जातिभेद नष्ट करण्याचें प्रशंसनीय उदाहरण दोन वर्षांपूर्वीं घालून दिलें. त्याचें हें प्रथम अनुकरण असावें असें दिसते. दोन्ही विवाहांतलीं दांपत्यें चिरायु होऊन गृहसौख्याचा लाभ चिरकाल घेवोत असें आह्मी चिंतितों.

---

## स्टांडर्ड ऑईल कंपनीचें कॉलेज.

अमेरिकन लोक कोणतें ही काम किती दक्षतेनें आणि अव्यंग रीतीनें करतात याचें उदाहरण ह्मणून एका संस्थेची हकीकत सांगण्यासारखी आहे. अमेरिकेंत स्टांडर्ड आईल कं. नांवाची राकेल तेल काढून तें विकणारी कंपनी आहे. या कंपनीचा व्यवहार साऱ्या जगाशीं आहे. तथापि तो आणखी वाढावा ह्मणून या कंपनीनें एक कॉलेज काढलें आहे. त्यांत ज्यांना प्राच्य देशांत कंपनीचे नोकर ह्मणून जावयाचें असेल त्यांना तिकडच्या भाषा, रीती, व्यवहार, वगैरे शिकविण्यांत येतात. त्यांना खाणींतून तेल कसें काढतात, तें कसें शुद्ध करतात, तेलांत भेसळ आहे हें कसें ओळखावें वगैरे गोष्टींची ही प्रत्यक्ष माहिती करून देण्यांत येते. अभ्यासक्रम पुरा झाल्यावर कडक रीतीनें त्यांची परीक्षा घेतात. यांत शेंकडा ३० च विद्यार्थी पास करून त्यांना दरमहा ५०० रुपये पगार आरंभींच देऊन पाठवितात. तीन वर्षांनीं त्यांना भर पगारी रजा ६ महिने देऊन कंपनी आपल्या

खर्चानें स्वदेशी नेते. अशा रीतीनें कंपनीनें आपल्या नौकरांस शिक्षण देण्याची व त्यांच्या सोयीची काळजी घेतल्यावर ते कंपनीचें हित करण्यासाठीं जीवापाड मेहनत करतात यांत काय आश्चर्य आहे ?

## अमृत तुल्य उपदेश.

कार्यकर्ते पुरुष कधी वायफळ बोलत नाहींत, आणि वायफळ बोललेलें त्यांना खपत नाहीं. हिंदुस्थानांत आज तोंडची वाफ दवडणारेच फार आहेत हें पाहून प्रो. जगदीश चंद्रबोस यांच्यासारख्या कर्तृत्ववान् पुरुषाला वाईट वाटतें तें यामुळेंच. नुकतेच एके ठिकाणीं भाषण करतांना त्यांनीं श्रोत्यांना स्पष्टपणें सांगितलें कीं आपले कुल मोठें, आपले पूर्वज मोठे होते वगैरे गोष्टी सांगण्यांत भूषण मानण्याचे दिवस गेले. आतां तुमचा मोठेपणा जगाच्या विचारांत ज्ञानांत व सुधारणेंत किताशी भर घालीत आहे या कसोटीला तुमचा मोठेपणा उतरला तरच तो खरा ठरेल. वस्तुतः आमचा देश केवळ दुसऱ्याच्या धर्मादायावर-केवळ भिक्षेवर चरितार्थ चालवित आहे. अशा भिक्षेकऱ्यानें मानाची अपेक्षा कां करावी? सर्वांकडून हेटाळणी हीच त्याच्या नशीबीं ठेवलेली ! आपण आज दरिद्री झालों आहों खरे, पण सदोदित दरिद्रीच राहण्यासाठीं खास जन्माला आलो नाहीं. आपला जीवितोद्देश याहून उच्चतर आहे. आपण मनुष्यें आहों, भाकरीच्या तुकड्यासाठीं धन्याची खुशामत करणारीं कुत्रीं नाहीं, येवढी गोष्ट जर हिंदुस्थानचा प्रत्येक तरुण हृदयांत वागवील, आणि राष्ट्रमालिकेंत आपल्या देशाला उच्च स्थान मिळवून देण्यासाठीं मनापासून निःस्वार्थ बुद्धीनें झटेल, तरच जन्मास आल्याचें सार्थक. अमृततुल्य उपदेश ! पण ग्रहण करील त्याला.

## चीन देशांतली गडबड.

चीनचे प्रेसिडेंट युआनशिकाई हे तेथील बादशहा होऊं पहात होते. ज्यूलियस सीझर प्रमाणें तीन तीनदा राजमुकुट धारण करा असा लोकांकडून आग्रह, व मला कशाला बादशाहीपद पाहिजे? मी आपला साधा मनुष्य आहे तो बरा आहे असें बाह्यतः विनयाचें बोलणें वगैरे नाटकी प्रकार ही झाला, आणि आतां युआनशिकाई महाराज की जय असा जयध्वनि कोट्यावधि चीनी लोकांच्या तोंडून निघालेला ऐकण्याचीच काय ती बाकी राहिली होती. इतक्यांत रामराज्यारोहणाच्या वेळच्या प्रसंगाची पुनरावृत्ति झाली. चीनमध्यें ही कोणी मंथरा उत्पन्न होऊन तिनें तो सगळा व्यूह ढासळला असें दिसतें. चीन देशांतल्या कित्येक अधिकाऱ्यांची व सैन्यांतल्या शिपायांची या गोष्टीला प्रतिकूलता होऊन देशांत बंडें झालीं, व युआनशिकाईला आपले विनययुक्त औपचारिक शद्ब खरे करून दाखविण्याची व राज्यपदाच्या लोभाला तिलांजलि देण्याची पाळी खरोखरच आली! हा प्रकार पाहून चिनचें अभिनंदन करावें कीं युआनशिकाईची कींव करावी हेंच कळत नाहीं.

## फ्रेंच सरकारची भाग्यवान् प्रजा.

हल्लीं वर्तमानपत्रांतून अशी बातमी वाचण्यांत येते कीं कलकत्त्याजवळ चंद्रनगर येथें फ्रेंच सरकारकडून देशी लोकांना सैन्यांत भरती करण्याबद्दलची नोटीस निघाली आहे. तींत म्हटलें आहे कीं युरोपांत युद्धासाठीं माणसें पाहिजेत. तेव्हां जे कोणी या वेळीं सैन्यांत भरती होतील, त्यांना ३० रुपये पगार व भत्ता मिळेल, व लढाईंत शौर्याचें व धाडसाचें कृत्य केल्यास सुरक्षित लोकांना लेफ्टनंट, कॅपटन वगैरे ऑफिसरांच्या जागाही देण्यांत येतील. सैन्यांत भरती होण्याचा हा योग अर्थात् हिंदुस्थानांतल्या फ्रेंच प्रजेपुरताच आहे. फ्रेंच सरकारच्या या नोटिशीचा परिणाम काय होतो तो पहावा. आम्हांला खात्री आहे कीं सैन्यांत भरती होण्यासाठीं हपापलेल्या बंगाली लोकाचे इतके अर्ज त्या सरकाराकडे जातील कीं त्या सरकारला पाहिजे आहे त्याच्या शतपट अर्जांची संख्या होईल. देशी लोकांना सैन्यांत भरती करण्याला फ्रेंच सरकारला जर कांहीं शंका वाटत नाहीं, तर आमच्या दयाळु व प्रजावत्सल ब्रिटिश सरकारलाच ती कां वाटावी तें कळत नाहीं. चंद्रनगरच्या बंगाली लोकांच्या रक्तांत व कलकत्त्याच्या बंगाली लोकांच्या रक्तांत कांहीं भेद आहे कीं काय याची तपासणी केमिकल अनालायझर कडून होईल तर बरें होईल.

## प्रेसिडेंट विल्सनची जागृति

अमेरिकेला जर्मनीनें दिलेल्या मगरुरीच्या जबाब परंपरेनें प्रेसिडेंट विल्सन यांची जागृति होईना, तेव्हां लोकांची सदर प्रेसिडेंटाविषयीं निराळी कल्पना झाली होती. पण या आठवड्यांत ते खडबडून जागे झाल्याचें व अमेरिकेच्या हक्काचें रक्षण करण्यासाठीं तयार असल्याचें वर्तमान आलेलें पाहून पुष्कळांना समाधान वाटेल. लुसिटानिया जहाजाचा प्रश्न जर्मनीचा पिच्छा अद्याप पुरवीत आहे, आणि त्याच प्रश्नानें शत्रुत्व किंवा मित्रत्व यांचा अखेरचा निकाल लागणार असा रंग दिसत आहे.

## शुभाशीर्वाद.

व्रतबंधनाच्या निमित्तानें एका सद्गृहस्थानें खालील शुभाशीर्वाद पाठविला आहे. तो मननीय आहे म्हणून आम्ही तरुण वाचकां पुढें मांडतों.

प्राचीनैः सुकृतैस्त्वया जनुरिदं
विप्रस्य लब्धं शिशो ।
संस्कारं लभसे च सांप्रतमिमं
विप्रत्वसंपादकम् ॥
तन्मातापितरावुपास्स्व नियतं
संतोषय त्वं गुरुं ।
विद्यां लोकहितां लभस्व च ततः
सद्ब्राह्मणः स्या यथा ॥

अर्थ—मुला ! पूर्वे पुण्याईनें तुला हा ब्राह्मण जन्म मिळाला आहे. आज ब्राह्मणत्वाचा संस्कार तुझ्यावर घडत आहे तर तूं नियमानें मातापित्यांची सेवा कर, गुरूला संतोष दे, आणि जिच्यापासून लोकांचें कल्याण होईल, व जिच्या योगानें तूं खरा ब्राह्मण होशील अशी विद्या मिळीव.

# वऱ्हाडवृत्त.

**हवामान**— या सप्तकांतील प्रथमची खंडवृष्टी, नंतरची कडक थंडी, आणि मागून पुनः शिशीर ऋतूची गुलाबी शतोष्णता यांनीं सर्व ऋतूंचा अनुभव एकदम आणून दिला. इनफ्लुएनझा, मलेरिया व प्लेग यांस या वातावरणांतील गडबडीमुळें जोर आला आहे. आकोल्यास जठारपेठ प्लेगामुळें खाली झाली असून पुनः स्वारी परतते कीं काय अशी भिती वाटते.

**प्लेग**— ता. ९ फेब्रुआरीपर्यंतच्या प्लेगाचे मृत्यु जिल्हेवारीनें येणे प्रमाणे असून बहुतेक गांव व खेडीपाडीं कमजास्त मानानें ग्रस्त आहेत.

| | |
|---|---|
| आकोला | ३२४ |
| उमरावती | २२१ |
| बुलढाणा | १६७ |
| यवतमाळ | २९ |

**शेतकी परिषद्**— आज व उद्या येथील शेतीच्या प्रयोगशाळेवर निरनिराळ्या कामांची गर्दी आहे. राजश्री स्टांडन कमिशनर हे अध्यक्ष राहतील.

लेडी हार्डिंज रुग्णालयाचा वास्तुसमारंभ श्री. सौ. स्टांडनबाई यांच्या यशस्वी हातून येत्या बुधवारीं सायंकाळीं ५ वाजतां होणार आहे.

रावबहादूर काशीनाथ केशव ठाकूर यांनीं गेल्या सोमवार पासून पेनशन घेतलें, आणि या रीतीनें एका सुंदर श्रेष्ठ सरकारी चाकरीची इतिश्री म्हणजे देशकार्याचा हरिः ओम् असें आम्ही समजतों. बहुविध अनुभव, न्यायाची विचारसरणी व थोरली विद्वत्ता यांचीं परिपक्व फळें मातृभूमीच्या उपयोगीं पुष्कळदा पडत नसतात पण आपल्या उदाहरणानें रावबहादूर ठाकूर आपल्या मागून होणाऱ्या पेनशनदारांस निराळा कित्ता घालून देतील असा भरंवसा लोकांनीं त्यास गेल्या बुधवारीं निरोप देतांना आपल्या प्रेमळ भाषणांत व उद्गारांत अगोदरच व्यक्त केलेला आहे.

अलिशान नामदार चीफ कमिशनर सर बेंजामिन यांची स्वारी गेल्या सोमवारीं शेगांवाहून नागपूरास परत गेली. या दौऱ्यांत साहेब बहादुरांचा परिचय वाढला इतकेंच नाहीं तर वऱ्हाडच्या लोकांविषयीं त्यांचें प्रेम बहुगुणीत झालें आहे हें कळविण्यास संतोष वाटतो.

कार्ले ता. बाळापूर येथें येत्या शिवरात्रीला नर्मदेश्वराची यात्रा नव्यानें भरविण्याची योजना तेथील रा. रा. भगवान जगदेव पाटील हे करीत आहेत.

## सचित्र हास्य-विनोद.

अत्यंत मनोरंजक व हास्यकारक सचित्र साप्ताहिक. ता. १ जानेवारीपासून सुरु झालें. यांत पोट धरधरून हासविणारे लेख, गोष्टी, व चित्रें प्रसिद्ध होतात. वर्गणी बक्षीस पुस्तकासह रु.२॥= कोणत्याही महिन्यापासून पत्र सुरू करितां येतें. नमुन्याचा अंक ०॥। एजंट पाहिजेत.

मॅनेजर, हास्य-विनोद.
भांगवाडी, मुंबई नं. २
नों. नं, ८३

# नोटीस

—:*:*:*:—

**आकोला म्युनिसीपाल ऑफिस.**
ता. १६ फेब्रुआरी सन १९१६

आकोला येथील सर्व लोकांस जाहीर करण्यांत येत आहे कीं, खालीं लिहिलेल्या बाबींचें सन १६-१७ सालांत फी वगैरे वसूल करण्यासंबंधानें व कचरा वगैरे उचलून नेण्यासंबंधाचे मक्ते देण्याकरितां जाहीर लिलाव टाऊन हॉल मध्यें सोमवार ता. २८ फेब्रुआरी सन १९१६ रोजीं सायंकाळीं ४ वाजतां केला जाईल. करितां ज्यांची मक्ते घेण्याची इच्छा असेल त्यांनीं सदरहू दिवशीं लिलावाच्या वेळीं हजर रहावे.

करारनामे व जामीन कसवे लिलाव झाल्यापासून ५ (पांच) दिवसाचे आंत दिले पाहिजेत. इतर शर्ती हरासाचे वेळेस वाचून दाखविण्यांत येतील.

| | |
|---|---|
| आठवडे बाजार. | कचरा-शहर |
| मोठा कमेला, १ | " पेठ. |
| लहान कमेले. २ | " जठार पेठ. |
| टाऊनहाल बगीचा. | " पडाव. |
| लादा-कमेले. ३ | " ग्रेनमार्केट. |
| | "कोंडवाडे २. |

A. S. khan.
व्हाइस चेअरमन.
म्यु. कमिटी, आकोला.

नों. नं. ८४

## जाहिर नोटीस

सर्वत्र लोकांस जाहीर करण्यांत येते कीं गंगु कृष्णपक्षीण राहणार खामगांव इची जिनगी कोणाजवळ असल्यास त्यांनीं आमचे स्वाधीन करून भर पावती न्यावी व तिच्या नांवाचे देणलेण असल्यास व शेतीचे, घराचे पट्टे असल्यास त्याचा निकाल करून कागद न्यावेत व यापुढें तिच्या नांवाचे भांडपट्टे करून न देतां आमचे नांवानें द्यावेत. व दिल्यास रद्द होऊन जबाब द्यावा लागेल क. ता. ६-२-१६ इसवी

सही.

विश्वनाथ बापुजी कुलमुखत्यार रा. निंभोरा ता. आकोला पो. केळीवेळी दस्तुर खुद.

नो. नं. ८१

## NOTICE

The Treasury officer is now prepared to issue and encash Universal Currency Notes and Home Notes (Bombay Circle) of other denominations for the public on demand as far as possible

Endeavours will be made as far as possible in all trnsactions to meet the equrements of the payee as to the form of currency in which he desires to take payment.

The above orders do not yet apply to the Treasuries at Nagpur, Akola and Amraoti where Government treasury work is done by branches of Presidency Banks. As soon as arrangements are completed with the Banks concerned, a further notice will be issued giving the date from which free encashment of currency notes at these centres will be available.

## मध्यप्रांत वार-- रिलीफ असोशियेशन.

(वऱ्हाड शाखेचा जानेवारी महिन्याबद्दल हिशेब.)

वरील संस्थेचे वऱ्हाड शाखेचे आकडे आमचेकडे प्रसिद्धीकरितां आले आहेत त्यांवरून पाहतां जमेचे बाजूस जिल्हेवारीनें:—

| | उमरावती. | आकोला. | बुलडाणा. | यवतमाळ. |
|---|---|---|---|---|
| मागील शिल्लक. | १३८९-१३-६ | २४६८४-७-९ | १३७४-४-१ | ५९०-१५-५ |
| चालूं महिन्यांत वसूल आलेली रकम | ५३०-१-० | ११२०-८-१० | ४५९-११-० | ५८९-११-० |
| सन्यास सुखोपयोगीं सामान पुरविण्यासाठीं. | १६५-४-० | ५९३-१५-६ | ३०१-५-० | १५-४-० |
| कलकत्ता यंगमेन ख्रिश्चन असोशियेशन करितां. | ७५-०-० | ०-०-० | ०-०-० | ३००-८-८ |
| बेलजम रिलीफ फंडाकारितां | ३६-०-० | ०-०-० | ०-०-० | ०-०-० |
| सिमला येथील सेंट जान अँम्बुलन्स असोशियेशन करितां. | ७५-०-० | ५००-०-० | ०-०-० | ०-०-० |
| मुंबइ आरमारी रिलीफ फंडा करितां. | ०-०-० | १००-०-० | ०-०-० | ३००-८-८ |
| आफिस खर्च. | ०-८-० | ५२-०-० | ०-०-० | ०-०-० |
| माहिना अखेर शिलक. | १५६८-२-६ | २४९५९-१-१ | १५३२-१०-१ | ५६४-३-१ |


ॐ नमः श्रीगणेशाय.

## आर्यवनौषधींचा कारखाना —मुर्डी.

### मदनामृतसंजीवनी.

धातुवर्धक, अत्यंत कामोत्तेजक व पौष्टीक, वीर्यस्तंभक, रक्तशोधक, मनोत्साहक कांतिबुद्धिवर्धक, सुवर्णमाक्षिक, मौक्तिक, कस्तुरी व अनेक वनस्पतीमिश्र अद्भुत गुटिका.

यांच्या सेवनानें नपुंसकत्व, स्वप्नजन्य व इतर धातुपात, उन्हाळे इंद्रियशिथिलता कडकी, गर्भसंबंधी मरकेले विकार मूत्रसंकोच, धातूचा पातळपणा, स्त्रियांची धुपणी छातींत रोग हात, पाय मूत्रमार्ग व नेत्र यांचा दाह, क्षय, पांडुरोग, मुलांची खर, जीर्णज्वर, अग्निमांद्य; मस्तकशूळ, मुळव्याधी, वातरोग, निद्रानाश, पित्तविकार बाळांतरोग, मधुमेह, जुनाट पर्मा, मुष्टीमैथुनानें आलेली कृशता इत्यादि अनेक विकार खात्रीनें बरे होऊन शरीर निरोगी, मजबूत व सतेज बनतें. पचनशक्ती व स्मरणशक्ति भरपूर वाढून धातू व रक्त यांची शुद्धि, वीर्यस्तंभन व भरपूर कामोद्दीपन होतें, व मनास उत्साह देतात. दूध व जडान्न भरपूर पचूं लागतें. त्यांत उपयुक्त वनस्पतींचें मिश्रण केले असल्यामुळें त्यांत अपायकारक पदार्थ अगदीं नसून वरील विकारांवर अत्यंत गुणकारक आहेत, करितां गुणाबद्दल असंख्य सर्टिफिकिटा मिळाल्या व नित्य मिळतात. पथ्यसेवनाची गरज मुळींच नसून स्त्रिया, पुरुष व मुलें यांस पाहिजे त्या दिवसांत घेण्यास अत्यंत उपयोगी आहेत एका रुपयांचे आंत मिळणार नाहींत. एकदम ४ रुपयांच्यावर कितिही घेणारास टपालखर्च माफ आहे. चार रुपयांचे आंत वेगळा टपालखर्च ५ आणे पडेल. दर एकदम ३५ गो० १ रु० ७५ गो० २ रु० १६५ गो० ४ रु० २७५ गो० ६ रु० ५५० गो० १० रुपये.

१. अपूर्व नेत्रांजन—पानें वडस, सारा, फुलें, खुपऱ्या, बिंदु, काच, इ० नेत्रांचे सर्व विकार त्वरित बरे होऊन दृष्टि तीव्र व थंडगार राहते. या रोगास हें अंजन खरें रामबाण आहे. १॥ तो. ड. १ रु.

२. परम्यावर अपूर्व मिश्रण —कोणत्याही नवा जुना पर्मा व तज्जन्य दाह, तिडीक, मुत्रांचा काळा, सकोच, पुपचाव, रक्तस्त्राव इत्यादि विकार पथ्य नसतां सात दिवसांत जातात. तिडीक एका घटकेंत जाते. असे रामबाण औषध कोठेंच मिळत नाहीं. बा० किं० १ रु० ११ भार २ रु० सर्व औषध व्हा० नें पाठवूं.

सर्व सामानाचा मोठा क्याटलाग मागवावा. तो फुकट पाठवूं. औषधांत अपायकारक पदार्थ अगदीं नसून ती पूर्ण खात्रीची असल्याबद्दल असंख्य सर्टिफिकिटें आहेत. याशिवाय मोठमोठे रोगांवर अनेक औषधें, ग्रंथोक्त रसायनें, भस्में, पाक, गुटिका आसवें, तेलें व सुगंधी अत्तरें वगैरे माफक दरानें मिळतात. अनु० ख० सो० ट० ख० वे० पडेल. रोखीनें किंवा व्ही. पी. नें पाठवूं. प्रकृतिमान कळविल्यास रोग्याचें निदान व चिकित्सा कळवूं.

पत्ताः—मु० मुर्डी, पो० हर्णे. जिल्हा रत्नागिरी.

कृष्णशास्त्री पेंडसे वैद्य.

ना० नं० २०



## Oriental Government Security Life Assurance Co., Ltd.

ESTABLISHED 1874.

HEAD OFFICE, BOMBAY.

### FUNDS almost 5 CRORES.

INVESTED IN GOVERNMENT SECURITIES AND MUNICIPAL AND PORT TRUST BONDS.

*Claims paid* 4½ CRORES

### A Decennial Record of Progress.

| Year. | No. of Polices in force. | Existing Assurances. |
|---|---|---|
| 1884 | 4,323 | 1,59,25,200 |
| 1894 | 20,110 | 5 26,08,850 |
| 1904 | 43,356 | 8 88,02,223 |
| 1914 | 66,269 | 12 37,10,910 |

| Year. | Total Income. | Total Assets. |
|---|---|---|
| 1884 | 6,77,552 | 14,41,429 |
| 1894 | 4259,,607 | 94,49,971 |
| 1904 | 43,64,808 | 2,47,18,8 |
| 1914 | .72,46,0 | 4,96,8650 |

### SPECIAL FEATURES.

Absolute Security—Low Rates—Liberal Conditions.

Forty years continuously increasing prosperity.

Ninety per cent of the entire Profits, after providing for the Reserve und divided among the Policyholders every 3 years.

Native Lives are accepted at the same rates as Europeans

Loans granted to policyholders at reasonable rates.

Prompt Payment of Claims.

*Influential and active agents wanted Terms liberal.*

Full particulars, prospectus and proposal forms on application to:—

R. Paterson Brown
Manager

*A. C. Lal,*
Branch Secretary.
*C. P. Berar & Khandesh*
Nagpur.

N. N. 22


हें पत्र आकोला येथें केकासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवाश्रमांत छापून प्रसिद्ध केलें.

Regd-No. N 150

# वऱ्हाडसमाचार.

Berar-Samachar.

वर्ष ५० ] आकोला---सोमवार तारीख २८ माहे फेब्रुवारी सन १९१६ ई० [ अंक ९

## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवीं ट. हां. ........ २ रुपये
वर्गणी आगाऊच घेण्याची वहिवाट आहे.

---

### जाहिरात

**मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक.**

ह्या बँकेंत खालीं दिलेल्या शर्तीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर याच्या दरम्यान एक हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील आणि तो पैसा यापैकीं एकास अथवा जास्त इसमांस अगर यापैकीं मयताचे मागें राहील त्यांस काढतां येईल.

व्याज दर साल दर शेकडा तीन रुपयाप्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारावरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं. नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक
आकोला ९।९।०९ } S. Clements, एजंट
नं १

---

### अस्सल अंगुरी.

# हिंग

केवळ एक आणा तो. पवित्र केशर १॥ तो. शुद्ध शिलाजीत. ।। तो. खालिस कस्तूरी रु. २५ तो. तिबेटी ममीरा रु. ३ तो.

**काश्मीर स्टोर्स श्रीनगर नं. ५**
नो. नं. २

---

### हिंदुस्थानावर अरिष्ट

हिंदुस्थानांतील रहिवाशांच्या पाठीस ज्वर व हिवताप यांचें आरिष्ट सदोदित लागलें आहे. पण त्याचा प्रतिकार करण्यास बाटलीवाला यांचें हिवतापाचें औषध व गोळ्या ह्या रामबाण आहेत. ताप किंवा शीतज्वर येणारसें वाटतांच हें औषध घ्यावें. किं. १ रु.

**बाटलीवाला यांच्या निस्तेज लोकांसाठीं शक्तिकारक गोळ्या**

हें औषध घेतल्यानें भागवटा, मेंदूचे श्रम, पौरुषनाश, अशक्तता व क्षयरोगाचें स्वरूप, त्याप्रमाणें अजीर्ण इ. इ. विकार ताबडतोब दूर होतात किं रु. १८.

**बाटलीवाला यांचें दंतमंजन.**

हें दंतमंजन मायफळाशीं कांहीं इंग्रजी औषधांचा वैद्यकीय रीतीनें मिलाफ करून बनविलें आहे. किं. ८४

**बाटलीवाल्याचें गजकर्णावर मलम.**

यानें गजकर्ण, कुनटी, खरूज यांचा विकार एका दिवसांत नाहींसा होतो. किं. ८४

हीं औषधें सर्व औषधी विकणाऱ्या दुकानावर व डॉ. एच. एल. बाटलीवाला जे. पी. मु. वरली लेबोरेटरी दादर, मुंबई यांजकडे मिळतात.

DR. H. L. Batliwala. Sons & Co Ltd
N. N. 3 Dadar Bombay.

---

# चांदीचींभांडीं

नाशिक येथें तयार केलेलीं सर्व प्रकारचीं सुबक व घाटदार भांडीं आमचेकडे विक्रीस तयार असतात. भाव माफक व्ही. पी. नें अगर रोखीनें पाठवूं. मालाचे खरेपणाबद्दल ग्यारंटी देऊं.

**पुरुषोत्तम रामचंद्र वैशंपायन**
**रविवार पेठ नाशिक सिटी**
नो. नं. ४

---

### अतिशय पौष्टिक व स्तंभक

## विलासिनी वटिका.

शक्ती येण्याकरितां व ती कायम टिकण्याकरितां एकदां वापरा पहिल्याच दिवशीं गुणाबद्दल औषध घेणाराची खात्री. किं० बाटलीस १२ आणे. पूर्ण गुणास ३ बा. अ. पत्रक सोबत.

सकळकळे अॅन्ड सन्स
शहर आकोला.

---

त्वरा करा. **जंगी लूट** अपूर्व लाभ

**जानेवारी अखेर खर्च माफ.**

उत्तम रंगदार निळीकाळी शाईच्या पुड्या पाव आणा दराच्या १०० रु. १। डायरी बक्षिस. पुडी २०० रु. २। कापडी डायरी. पुडी ४०० रु. ४ डायरी सोनेरी. इनाम न घेतां १००० पुडीस रु. ७॥

**गुण न आल्यास पैसे परत.**

वृद्धपण टाकून तरुणत्व प्राप्त करून घ्या.

## तरुण मित्र पाक

किं० २ रु०

केस काढणारा रमेश सोप ३ वड्यांचे पेटीस रु. १ दोन पेट्यास १॥। रु. चार पेट्यास रु. ३ आग न होतां डाग पडणार नाहीं. उत्तम सुवासिक आहे.

**पत्ता** — दयालदास लालदास आ. कं.
जंगी स्टोअर बऱ्हाणपूर
नो. नं ५

---

## नोटीशीचे दर

**दर ओळीस दीड आणा.**
**हेडिंगच्या दोन ओळी धरल्या जातील.**
**नोटीस सुवाच्य असली पाहिजे.**

**सूचनाः–** गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील. पुढें येणाऱ्या नोटीसास स्पेशल चार्ज पडेल.

---

## विक्रीस तयार

आमचे छापखान्यांत दरखास्तीचे, वकील पत्राचे, पात भरण्याचे, लिस्टफार्म पर्च्यांचे व नकलेकरितां करावयाच्या अर्जांचे नमूने छापून तयार आहेत. ते आमचे छापखान्यांत केव्हांही वेळीं विकत मिळतील.

वऱ्हाडसमाचार कार्यालय,
सदाशिवाश्रम, आकोला } मॅनेजर

---

## श्री दत्तात्रय अलंकारालय
## कोल्हापूर

आमचे कारखान्यांत स्वतःचे देखरेखेखालीं, मुद्दाम तयार केलेले उत्तम सोन्याचे सुबक दागिने— मंगळसुत्र साज, ठुशा-जोड, गुलाबाचीं फुलें, बिल्वदळी टीका, मुदा, अग्रफुलें सार्वी व घागऱ्याचीं वगैरे सर्व जातीचा माल–तसेच चांदीच्या मासोळ्या, चाळ, उपकर्णी, तार्टे, वाट्या, गडवे, इत्यादि माफक दरानें मिळतील. आह्मी सर्व सोनें न्याशनलचें शंभर नंबरी वापरीत असतों. व डागाचा उपयोगही नियमितच केलेला असतो. यामुळें जिन्नस पांढरे पडण्याची अगर वाईट निघण्याची भीति बाळगण्याचें मुळींच कारण नाहीं. आमचे जिनसाची लाख काढून वजन तोलून पाहावें. गिऱ्हाइकांची खात्री करून देण्यास आह्मी तयार आहों. व्यापाऱ्यास कमिशन मिळेल. ऑर्डरी प्रमाणें माल तयार करून देऊं, चांदी सोन्याचे खरेपणाबद्दल आह्मी जबाबदार आहों. माल रोखीनें अगर व्ही. पी. नें पाठविला जातो. ऑर्डरी बरोबर एक रुपया अगाऊ पाठविला पाहिजे.

श्रीदत्तात्रय अलंकारालय–कोल्हापूर
नो नं ६

---

# कौतुकरत्नाकर

**छिन्नमस्तानी धुमावती; मातंगी भैरव षोडश देवतांचे चित्रांसह पृष्ठसंख्या ६००; विषय ६०० वर आवृत्ती ९ वी. प्र. २००००,**

बंगाल्यांतील कामरूपदेशी ही विद्या फार प्रबळ असून तिकडील जटेली, लंगोटे, छा उ करणारे अज्ञानवादी यांचेकडून खरी माहिती मिळवुन सिद्धनागार्जुन मंत्र महोदाधि, महानिर्वाणतंत्र उड्डीश वगैरे ग्रंथाचे आधारें हा भानुमती ग्रंथ तयार केलेला आहे. ह्याच धर्तीवर प्रसिद्ध झालेल्या इंद्रजाल, जादुबाई इतरसंग्रह, कौतुकचिंतामणी, किमिया, गुप्त गारुडी विद्या वगैरे पुस्तकांचा ह्याचेपुढें हिशेब नाहीं. यांत कोणते विषय आहेत याचा विस्तार कळाविणें फार कठीण आहे. मंत्र तंत्र व यंत्र विधिपूर्वक करणें नियम ग्रहादिकांचीं वर्णनें भानुमती यंत्र वशिकरणशास्त्र नानाप्रकारचे स्तंभन प्रयोग, उच्चाटन, जारण, मारण प्रयोगविधि, औषधी हुन्नर, नानारंग कला, आत्मविद्यामेस्मेरिझम प्रयोगविधि वगैरे अनेक विषय आहेत. किं. ट. व्ही. पी. सह १॥ रुपया.

# कोकशास्त्र अथवा
# जीवनसौख्य.

ज्यांना खरोखरीच सौख्य भोगणें आहे त्या प्रत्येकांनीं हें पुस्तक अवश्य संग्रहीं ठेवावें. या पुस्तकांत कोणते विषय आहेत हे पुस्तकाच्या नांवावरून सहज समजण्याजोगें असल्यामुळें त्याचें वर्णन करणें नको. किंमत १ रुपया ट. ख. ३ आणे.

**पत्ताः—** गंगाधर आर. आणि कंपनी.
हरिश्चंद्र बिल्डिंग मुंबई नं. ४

नो. नं. ७

## सचित्र हास्य–विनोद.

अत्यंत मनोरंजक व हास्यकारक सचित्र साप्ताहिक. ता. १ जानेवारीपासून सुरू झालें. यांत पोट धरधरून हासविणारे लेख, गोष्टी, व चित्रें प्रसिद्ध होतात. वर्गणी बक्षीस पुस्तकासह रु.२।८ कोणत्याही महिन्यापासून पत्र सुरू करितां येतें. नमुन्याचा अंक ८।।। एजंट पाहिजेत.

मॅनेजर, हास्य–विनोद.
भांगवाडी, मुंबई नं २

नो. नं, ८३

## जाहीर नोटीस

आह्मी खालीं सह्या करणार लोक राहणार खरोळ तालुके वाशीम जि० आकोला यांजकडून लक्ष्मीनारायण वल्लद मंगलचंद मारवाडी राहणार खरोळ तालुके वाशीम जिल्हा आकोला

यांसः—

व सर्वत्र लोकांस जाहिर करण्यांत येते कीं आह्मी सदरील लक्ष्मीनारायण वल्लद मंगलचंद मारवाड्यांस कुलमुखत्यारपत्रानें सर्व अधिकार दिलां होता तो सर्व अधीकार तारीख ११२।१९१६ इ. पासून आह्मी त्याजकडून काढून घेऊन ते मुखत्यारपत्र रद्द केलें आहे. सबब सदरील लक्ष्मी नारायण वल्लद मंगलचंद यांनीं अगर दुसरे कोणीही ह्या सदरील माजी मुखत्याराशी आमचे संबंधीं कोणताच व्यवहार करूं नये केल्यास आह्मी अगर आमची इस्टेट जबाबदार धरली जाणार नाहीं कळावें तारीख २१।२।१९१६ इ०

दस्तुर शेख इस्माइल अर्जनवीस वाशीम

सह्या

१ कळनाजी वल्लद शिवजी याचे हातचीं नि. रेघ द० वर प्र०
२ संभाजी वा फकीरजी याचे हातची नि० रेघ द० वर प्र०
३ बळीराम वा दर्याजी याचे हातची नि० रेघ द० वर प्र०
४ नयाजी वा गंभीरजी याचे हातची नि० रेघ द० वर प्र०

साक्ष

१ रावजी देवजी पाटील माळेगांव दस्तुर खुद
१ शंकर त्रिंबक साने रा. वाशीम दस्तुर खुद

नो. नं. ८५

## नोटीस

भोनाई मर्द दावल धनगर वा मुकळी ता आकोला.

हीसः—

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुझी धाकटी मुलगी इनला माझे मुलास सन १९१४ सालीं सुमारें २ वर्षें झालीं दिली. तेव्हां पंच खालील प्रमाणें.

१ महादु धनगर कान्हेरीकर २ राघो धनगर कान्हेरीकर ३ शिवाजी धनगर कान्हेरीकर ४ चह्लादु धनगर किनखेडकर व तुझा भाऊ मारुती व पुतण्या नाबु या पंचा समक्ष देऊन आपले जातीधर्माप्रमाणें मुलीस फडकी चोळी डागीना व जातीस पंगत वगैरे मजकडून देवविली. ह्या कामास मजला सुमारें ७५ रुपये खर्च करविला व लग्न आपले रिवाजा प्रमाणें ११२ वर्षांनी करण्याचे ठरलें. त्या प्रमाणें मी व वरील पंचासह माहे कार्तिक मासीं सन १९१५ इसवी रोजीं तुमचेकडे यंदा लग्न करण्याकरितां तिथी ठरविण्यास आलो. तेव्हां तुह्मी पंचासमक्ष मुलीस देत नाहीं असें कळविलें. तरी सोयरीकी करितां माझा झालेला खर्च सुमारें ७५ रुपये कपड्यालत्त्यासह झाला तो ही नोटीस पावल्या पासून ८ दिवसाचे आंत ह्या नोटीशीचे खर्चासह आणून द्यावा. नाहीं तर मुलीचें लग्न लावुन देण्याचा अगर वरील खर्चा बद्दल दिवाणींत दावा आणून खर्चासह योग्य तजवीज केली जाईल जर तुह्मी मुलीस दुसरे ठिकाणीं देऊन लग्न लाविल्यास व आमचे वरील गोष्टीचा निकाल न केल्यास सर्व प्रकारें जबाबदार तुह्मी आहांत ही नोटीस दिली. सही ता० २४।२।१६ इ.

सही
लक्ष्मण वा तुकाराम धनगर राहणार शिलोड ता० आकोला नि० खुद आंगठा असे

नो. नं. ८६

वऱ्हाडसमाचार

मिति माघ वद्य १० शके १८३७

## आपल्या भावी उन्नतीचा मूलमंत्र.

बनारस येथें हिंदु युनिव्हर्सिटीची कोनशिला बसविण्याचे समारंभाचे प्रसंगीं जीं अनेक विद्वानांचीं अनेक विषयांवर विद्वत्तापूर्ण भाषणें झालीं, त्यांत कलकत्त्याचे सुप्रसिद्ध शास्त्रज्ञ प्रो. जगदीशचंद्र बोस यांचें भाषण सर्वोत्कृष्ट झालें. प्रो. साहेबांचे भाषणांत नेहमींच प्रतिभा, ओजस्विता, विवेक आणि दूरदृष्टि इत्यादि गुणांचा प्रकर्ष दिसून येतो. या प्रसंगाचे त्यांचे भाषणांत हे सगळे गुण असून शिवाय त्यांत आपल्या भावी उन्नतीचा मूलमंत्र काय आहे तें उत्तम प्रकारें व्यक्त झालें आहे. ते ह्मणाले— आपण पाहत आहों हें विश्व ह्मणजे केवळ कांहीं स्थूल पदार्थांचा संयोग नसून त्यांत चैतन्य भरलेलें आहे. त्याचें जें बाह्यरूप दृग्गोचर होतें त्याच्या मुळाशीं जीवतत्व असून या दोन शक्तींच्या योग्य प्रमाणावर विश्वाची स्थिति अवलंबून आहे. जी स्थिति पदार्थांची व जीवाची आहे तीच स्थिति राष्ट्राच्या बौद्धिक जीवनाची असते. ही दोन्ही कार्यें राष्ट्राच्या जीवनक्रमांत जेव्हां दिसून येतात तेव्हांच तें सजीव किंवा चैतन्ययुक्त आहे असें ह्मणतां येतें. जें राष्ट्र दुसऱ्या राष्ट्रापासून त्याचें ज्ञान व कल्पना हीं फक्त ग्रहण करीत राहतें व दुसऱ्यास आपल्या कल्पना देण्याचें त्यांत सामर्थ्य नसतें तेव्हां त्याचें जीवन रोगग्रस्त स्थितींत आहे असें निःशंकपणें समजावें. जगांतील सजीव राष्ट्रांत हिंदुस्थानची गणना व्हावयाची असल्यास त्यानें जगाच्या ज्ञानभांडारांत भर घातली पाहिजे हें उघड आहे. राष्ट्रानें ज्ञानसंपन्न होण्यास त्यांच्या आंगीं दोन शक्ति असावयास पाहिजेत. एक तर त्या राष्ट्रांतील बुद्धिमान लोकांच्या आंगीं प्रतिभाशक्ति व कल्पनाचातुर्य असलें पाहिजे. व दुसरी गोष्ट अशी कीं ह्या कल्पना मूर्तिमंत करण्याचा प्रयत्न सुरू असतांना त्यांच्यामागें लागून लोकांनीं भलतेसे अतिरेक करून दुःखाच्या गर्तेंत जाऊन पडण्याइतका अविवेक त्यांच्या आंगीं असूं नये. चालत्या यंत्राची गति नियमित किंवा कुण्ठित करण्याकरितां ज्याप्रमाणें "ब्रेक" ची अवश्यकता असते त्याप्रमाणेंच कल्पनेची गति आपल्या ताब्यांत ठेवण्याकरितां विवेकाची जरूरी असते. ज्ञानाच्या पाठीमागें लागणाऱ्या विद्यार्थ्यानें आपले परिश्रम लोकनिंदेस न जुमानता, स्वार्थबुद्धीवर तिलांजलि देऊन, ज्ञानस्वरूपी ईश्वरावर भरंवसा ठेवून व जगांतील प्राणीमात्राचें कल्याण करण्याच्या शुद्ध भावनेनें प्रेरित होऊन एकसारखे सुरू ठेविले पाहिजेत. पाश्चात्यांनीं ज्ञानाच्या शाखांची अतिशय संख्या वाढविल्यामुळें त्यांना पुष्कळ शोध लावता आले हें खरें, तथापि त्यामुळें त्यांची दृष्टि अतिशय संकुचित झालेली आहे. आमची स्थिती तशी नाहीं. वरून दिसणाऱ्या विरोधमय अनेकांतत ऐक्य शोधून काढण्याकडे आमची निसर्गतः प्रवृत्ति आहे व त्यामुळेंच आमच्या पूर्वजांनीं सर्व विश्वाचें अवलोकन करून त्या सर्वांच्या मुळाशीं व सर्वांस प्रेरित करणारें एकच तत्व आहे असा अनुभवानें सिद्धान्त बसविलेला आहे व हाच सिद्धान्त आधुनिक शास्त्रीय शोधांच्या साहाय्यानें आम्हांस सिद्ध होत आहे. मी जे शोध केलेले आहेत यावरून आपण ज्यांस प्राणि ह्मणून समजतों व ज्यास निर्जीव वनस्पति असें ह्मणतों त्यांच्यामध्यें सजीवतेच्या दृष्टीनें मुळींच भेद नसून तीं एकाच चैतन्याच्या अधिष्ठानावर स्थित आहेत हें मी सप्रमाण सिद्ध करून दाखविलें आहे. ज्ञानरथाची धुरा वाहण्यास हिंदुस्थान समर्थ आहे हें सिद्ध झालेलें आहे पण यापुढें प्रश्न आहे तो असा कीं, हें ज्ञान फक्त व्यक्तीपुरतें मर्यादित राहणार कीं सर्व राष्ट्र त्याचा अंगीकार करणार ? प्राचीन वैभवाची मधुर व मोहक गाणीं गाण्याचें आपण सोडून देऊन आज विद्यमान असलेल्या जगांतील प्रमुख राष्ट्रांत आपल्या देशास अग्रेसरत्व कसें प्राप्त होईल याबद्दल आपण अहर्निश चिन्तन करून तदनुरूप प्रयत्न केले पाहिजेत. केवळ परंपरागत चालत आलेल्या अंधश्रद्धामय कल्पनांचा सर्वस्वी त्याग करून निसर्गाचीं गूढ तत्वें उकलण्यास आपण लागलें पाहिजे. आपले प्राचीन काळचे ऋषि व मुनि हे बुद्धिमत्तेचा वेग तत्कालीं प्रचलित व मान्य असलेल्या कल्पनांच्या शृंखलेनें केव्हांही कुण्ठित करीत नसतात. ते आपल्या प्रतिभाशक्तीस कल्पनेच्या साम्राज्यांत अव्याहत संचार करूं देत असत व याच बौद्धिक स्वातंत्र्याच्या योगानें त्यांनीं सर्व जगांतील प्रथम स्थान पटकाविलें होतें. आपल्या संस्कृतीवर काळाचे एवढे आघात झाले तरी त्यास न जुमानतां ती जिवन्त राहिली आहे. ॲसीरिया, बाबिलोन, ईजिप्त, ग्रीस, रोम इत्यादि राष्ट्रांच्या सुधारणा नामशेष झाल्या असूनही त्या सर्वांच्या पूर्वीची आपली संस्कृति आज विद्यमान आहे यावरून तिची सजीवता दिसून येते. आपली प्राचीन थोरवी संपादन करण्याच्या कार्यास आपण उद्याची वाट न पाहतां आतांच्या घटकेपासून सुरुवात केली पाहिजे. दृढनिश्चय असला ह्मणजे त्याच्यापुढें सर्व संकटें हात टेकतात व अशक्याचें शक्य होतें. आपल्या पूर्वजांच्या अढळ ज्ञाननिष्ठेचा आश्रय करून आपण आपल्या मातृभूमीचा उद्धार करावयास लागूं तर आपला संकल्प सिद्धीस गेल्याशिवाय राहणार नाहीं अशी दृढनिष्ठा पाहिजे.

## आमची प्राचीन काळची गृहरचना

आमचें पूर्वीचें तेवढें सगळें वाईट असें ह्मणण्याचा प्रघात आज कित्येक वर्षें आपण पाहत आहों. पण हा प्रघात बंद पडून आमच्या प्राचीन पूर्वजांच्या बुद्धीच, ज्ञानाचें, व दूर दृष्टीचें कौतुक करण्याचा समय आलेला आहे. आमचीं पुराणें शिमगा ठरलीं होतीं, पण आतां तींच उत्कृष्ट नीतितत्वें व सृष्टितत्वें गर्भित असलेलीं रूपकमय ज्ञानभांडारें आहेत असें पाश्चात्य पंडित सुद्धा कबूल करूं लागलीं आहेत. आयुर्वेदावर सध्यां किटाळ आलें आहे, पण त्याच्या मुळाशीं राजकारण ह्मणा अगर डाक्तर लोकांची स्वार्थ बुद्धि ह्मणा कांहीं तरी आहे. तत्वतः आयुर्वेद अत्युत्कृष्ट शास्त्र आहे ही गोष्ट सर पार्डेल्युकिस साहेबांनीं सुद्धां इंदूर येथील मेडिकल स्कूलपुढे केलेल्या आपल्या भाषणांत कबूल केलें आहे. आमच्या आरोग्य विषयक कल्पना ही उच्च होत्या व त्यांना धरून आमच्या पूर्वजांनीं घालून दिलेले शुचिर्भूतपणाचे आचार हीं शास्त्र सिद्ध आहेत हें मत सध्यां प्रचलित होऊं पहात आहे. तीच गोष्ट आमच्या गृहरचनेची आहे. पेशवाईतल्या सारख्या धामधुमीच्या काळांत बांधल्या गेलेल्या जुन्या अंधारमय वाड्यावरून आमच्या पूर्वजांच्या आरोग्यविषयक कल्पनांचें अनुमान करणें चुकीचे आहे. गृहरचनेबद्दल चरकसंहिता, बृहत्संहिता, वगैरे शास्त्रग्रंथ काय ह्मणतात तें पाहिलें पाहिजे, आणि या ग्रंथांत गृहरचनेचे जे नियम दिले आहेत ते कोणत्याही बाबतात हल्लींच्या पाश्चात्य आरोग्य शास्त्राच्या नियमांना सोडून नाहींत असें दिसून येईल. उदाहरणार्थ, चरकसंहितेच्या सूत्रस्थानाच्या पंधराव्या अध्यायांत सांगितलें आहे कीं घरांत हवा चारी बाजूंनें खेळती राहिली पाहिजे. खोल्या विस्तीर्ण असाव्या. घरांत सर्वत्र प्रकाश यावा. घराचें आढें उंच असावें. घराचें जोतें उंच असावें. घराची जागा दुर्गंधीची नसावी. स्वैंपाकघर, स्नानगृह व शौचकूप हा राहत्या घरापासून अलग असावीं. शौचकूपाचा उपयोग फक्त आजारी माणसांनीं करावा. धडया कड्या

माणसांनीं उघड्या मैदानांत शौचासाठीं जावें. हें अंतर बाणाच्या टप्प्याहून कमी नसावें. घराला अंगण असावें. मत्स्यपुराण, अग्निपुराण, इत्यादि पुराणग्रंथांतून ही अशा प्रकारचे नियम गरीब, मध्यम स्थितींतले लोक, सरदार, राजेमहाराजे, वगैरे सर्व स्थितींतल्या लोकांना सोयीचे व आरोग्यवर्धक होतील अशा रीतीनें दिले आहेत. घराचा पाया कशा रीतीनें घालावा, कोणत्या मातीच्या विटा आरोग्याला साधक व कोणत्या बाधक होतात, घराला खांब, तुळया आढीं वगैरे कोणत्या लांकडांची असावीं किंवा असूं नयेत, घराचा कोणता भाग कोणत्या दिशेला असावा, वगैरे सर्व बारीक सारीक गोष्टींचा विचार या ग्रंथांतन केलेला आहे. घरापासून जलाशय किती अंतरावर असावा, घराभोंवतीं कोणतीं झाडें लावावीं, घरांत माशांचा उपद्रव बंद करण्यास काय इलाज करावे, खिडक्या किती उंचीवर व अंतरावर ठेवाव्या, वगैरे सर्व गोष्टींचा विचार आरोग्याच्या दृष्टीनें प्राचीन ऋषींनीं केला आहे व त्यांचे सिद्धांत आजच्या घटकेला ही अबाधित आहेत. तरी अद्याप त्यांना मूर्ख ह्मणणारे कित्येक शहाणे आमच्यांत आहेतच !

## वैद्यकी पदव्यासंबंधाचें बिल.

मिथ्या वैद्यकी पदव्या दान करण्याच्या मनाईचें बिल व्हाइसराय साहेबांच्या कौंसिलापुढें येऊन तें विचारासाठीं सिलेक्ट कमिटीकडे सोंपविण्यांत आलें हें बिल कौंसिलापुढें आणतांना सर पार्डे लुकिस यांनीं सांगितलें कीं या देशांतलें युरोपियन व हिंदी लोकमत बिलाच्या तत्त्वाला मान्यता देत आहे, फक्त किरकोळ बाबतींत मतभेद आहे. त्यांनीं वैद्यकी शिक्षण द्यावयाचें त्यांच्याचकडे विद्यार्थ्यांची परीक्षा न घेतां तें काम कांहीं एका विशिष्ट परीक्षक मंडळाकडे द्यावें व त्या योगानें वैद्यकी शिक्षणाच्या खाजगी संस्थांची महती वाढवावी, त्यांना नाहींसे करूं नये असा बिलाचा उद्देश आहे, आपण पूर्वीं पासन खाजगी संस्थाच्या पुरस्कर्त्यांपैकीं आहों, इतकेंच नाहींतर देशांतल्या प्रत्येक शहरांत उत्तम प्रकारचें हिंदी लोकांनीं चालविलेलें खाजगी वैद्यकी कॉलेज असावें अशी ही आपली इच्छा आहे असें ही त्यांनीं सांगितलें. इतक्या आश्वासनानंतर त्यांच्या शद्वांविषयीं अविश्वास धरणें अशक्य आहे. सर पार्डे ल्युकिस यांचा उद्देश यावरून उच्च प्रतीचा व थोर आहे हें निर्विवाद आहे. पण थोर उद्देश मनांतल्या मनांत राहतात, आणि बिलाचे प्रत्यक्ष व्यावहारिक परिणाम अगदीं विपरीत होतात असा अनुभव प्रेस आक्टावरून व इतर ही अनेक प्रसंगीं आल्यामुळें अनेक लोक नियुक्त सभासदांकडून या बिलाला विरोध करण्यांत आला. हा विरोध करण्यांत अग्रेसर ना. सुरेंद्रनाथ ब्यानर्जी हे होते यांचें ह्मणणें होतें कीं या बिलाचें तत्त्वच मुळीं वादग्रस्त आहे, सरकारी कागदपत्रांवरून लोकमत त्याला अनुकूळ दिसत नाहीं, इतकेंच नाहीं, तर उलट प्रातिकूलताच ज्यास्त दिसते, बिल अपकारक आहे व तें युनिव्हर्सिट्या, खाजगीं वैद्यक कॉलेजें, किंवा समाज यां सर्वांना ही तें नको आहे. हें बिल पास झाल्यास खाजगी वैद्यकी कॉलेजांतून निघणाऱ्या पदवीधरडाक्तरांचा वर्ग नाहींसा होईल, आणि भोंदू डाक्तर किंवा वैद्य यांचें मात्र या बिलानें कांहीं वाकडें होणार नाहीं. अगोदरच सरकारी वैद्यकी कॉलेजांत विद्यार्थ्यांचा प्रवेश होणें मुष्किल झालें आहे, पण खाजगी कॉलेजें बंद झाल्यावर तर अनर्थ होईल. ही गोष्ट तर बिलाच्या मूळ तत्त्वालाच बाधक आहे. सर पा. ल्युकिस यांनीं याला कांहींच उत्तर दिलें नाहीं फक्त हॉस्पिटल असिस्टंट पक्षां कमी दर्जाच्या माणसाला औषधें देण्याचा अधिकार देण्यानें देशाचें फार नुकसान होणार आहे येवढेंच सांगितलें. ना. मि. ब्यानर्जी यांच्या भाषणांतली प्रत्येक गोष्ट खरी आहे, आणि अगोदरच लोकांना डाक्तर लोकांच्या अल्प संख्येमुळें वैद्यकी मदत मिळणें दुर्लभ आहे, तें अधिकच दुर्लभ होऊन बसेल हें त्यांचें ह्मणणें सरकारनें अवश्य विचार करण्यासारखें आहे. सरकार या बिलानें खाजगी वैद्यकी कॉलेजावर वज्राघात करून त्यांना नाहींसे करणार. पण त्यांच्या जागीं सरकारी कॉलेजांची स्थापना करण्यास तें तयार असलें तर लोक या बिलाला विरोध करणार नाहींत. सरकार ही गोष्ट करण्यास तयार आहे काय असें आह्मी स्पष्टपणें विचारतों. नसेल तर वैद्यकी मदती सारखी अवश्य सोय आयती लोकांच्या हातची काढून घेणारें हें बिल लोकोपकारक कसें तें त्यांनीं कृपा करून दाखवावें.

## महायुद्धाची प्रगति.

रशयानें अर्जरूमचा मजबूत किल्ला हस्तगत केल्यापासून दोस्त राष्ट्रांच्या पक्षाची केवढी मजबुती व तिच्या बरोबरच तुर्क लोकांची केवढी हानि झाली आहे त्याची बरोबर कल्पना ज्यांना त्या प्रदेशाचा भूगोल माहित आहे त्यांस उत्तम प्रकारें करतां येईल. ग्यांड ड्यूक निकोलस त्यांना त्यांच्या स्वीकृत कार्यांत आतां यशपरंपरा प्राप्त होत जाईल याविषयीं शंका उरली नाहीं. इजिप्तवर स्वारी करण्याचे तुर्क व जर्मन लोकांचे बेत आतां मनोराज्य ठरेल. हिंदुस्थानपर्यंत चालून येण्याचें तर आतां नांवच काढावयास नको. अर्जरूमच्या किल्ल्याची मजबुती, तेथील हवामान व बिकट रस्ते या सगळ्या अडचणी लक्षांत घेतल्या ह्मणजे हा किल्ला रशियाला इतक्या लवकर मिळवून देण्यांत कांहीं तरी ईश्वरीसंकेत असला पाहिजे असें भाविकांच्या मनांत आल्यावांचून राहत नाहीं. पेसोपोटेमियांत चाललेल्या युद्धावर या गोष्टीचा परिणाम घडल्यावांचून राहणार नाहीं. त्रेबिझोंडला आतां शह लागलाच ह्मणून समजलें पाहिजे. रश आणि अकलाट हीं स्थळें रशियानें घेतलींच आहेत, आतां नेसिबिनकडे रशियाची दृष्टि वळण्यास फारसा अवकाश राहिलेला नाहीं. येऊन जाऊन अडचण डोंगराळ मुलुखांतून जाणाऱ्या रस्त्यांची आहे, पण रशियन फौजेला आतां ती तुच्छ वाटेल. तुर्कांच्या हातून अर्जरूम कसें निसटलें याविषयीं अनेकांचे अनेक तर्क आहेत. कोणी ह्मणतो कीं तुर्क लोक किल्ल्याचे मजबुतीवर फाजील भिस्त ठेवून बसले व त्यांनीं आपलें चांगलें सैन्य मेसोपोटेमियाकडे रवाना केलें. कोणी ह्मणतात कीं रशिया बर्फांतून चाल करून येणार नाहीं असें समजण्यांत तुर्की सेनापतींची मोठी चूक झाली. ते कांहीं ही असो, पण टायग्रीस नदीच्या तीरावरील प्रदेश, इराण व हिंदुस्थान हे तूर्त तरी निर्भय झाले आहेत यांत शंका नाहीं. पूर्वेकडे जें नांव घालविलें तें पश्चिमेकडे अधिक चळवळ करून मिळविण्याची जर्मनीची हाव दिसत आहे. फ्रान्स व फ्लांडर्स मध्यें जर्मन हल्ले सपाट्यानें सुरू होण्यास दुसरें कांहीं कारण दिसत नाहीं. तथापि ह्मणण्यासारखा जय त्यांना अद्याप कोठें ही मिळाला नाहीं. सुरुंग लावून कांहीं खंदकांचा त्यांनीं नाश केला इतकेंच; याच्या पलीकडे त्यांचें पाऊल फारसें गेलें नाहीं. कदाचित् वसंतऋतूंत होणाऱ्या एका जंगी लढाईच्या वादळाच्या पूर्वींची ही प्रस्तावना असेल. जर्मन लोक जिवापाड यत्न करून पुनः क्यालेकडे जाणार आहे अशा गप्पांनीं वातावरण क्षुब्ध झालें आहे. पण या गप्पा पसरणारांना तेथें ब्रिटिश बंदोबस्त किती कडेकोट आहे याची खरी कल्पनाच नाहीं असें दिसतें. जर्मनीच्या क्यालेवरच्या पहिल्या मोहिमीच्या वेळीं तिकडे जितकें ब्रिटिश सैन्य होतें, त्याच्या पांचपट आतां तें आहे ही गोष्ट गप्पाष्टकें पसरविणारे विसरतात. बाल्कनमध्यें रूमानियाला आपल्याकडे वळविण्याचे जर्मनी व आस्ट्रिया यांचे प्रयत्न एकसारखे सुरू आहेत. त्याला १॥ कोट पौंडाचें कर्ज देण्यास ही जर्मनी तयार आहे. साम, दाम, दंडादि उपायाला रूमानिया वश होईल असें दिसत नाहीं भेद मात्र तेथें होऊं नये ह्मणजे झालें. रूमानियांतले लोक आतांपर्यंत आस्ट्रियनांस शत्रु समजत आले आहेत. बल्गेरिया आपल्या नाशावर टपून बसला आहे हें ही त्यांना पूर्णपणें ठाऊक आहे. तेव्हां ते अशावेळीं जर्मनीच्या कांचनाला बळी पडतील हें संभवत नाहीं. ते दोस्त राष्ट्रांचेंच साह्य मागतील हेंच अधिक संभवनीय दिसतें. सालोनिकाकडे अद्याप शांतता आहे. बल्गेरियानें मात्र ग्रीसच्या हद्दींत पाऊल टाकल्यापासून ग्रीसची अस्वस्थता वाढली आहे. आतां तो दोस्त राष्ट्रांना मिळेल असा संभव अधिक दिसतो. कामेरूनची मोहीम सर्वस्वी यशस्वी ठरून चुकली आहे. ईजिप्तकडून ही आरब लोकांची आपसांत दुफळी तिफळी चालल्याची शुभवार्ता येत आहे. सुएझच्या कालव्यावर येऊं पाहणारें तुर्की संकट मावळत चाललें आहे.

## शेतकी कान्फरन्स.

पुसा येथें शेतकीच्या संबंधांत तज्ञ अशा लोकांची परिषद नुकतीच झाली, पुष्कळ प्रश्नांची चर्चा झाली, विद्वानांचीं भाषणें झालीं, पण या सर्वांची या देशांतल्या शेतकीच्या सुधारणेला कितीशी मदत होणार तें एक परमेश्वरालाच माहित ! सरकारचे उद्देश थोर आहेत. शेतसुधारणेच्या कामीं सल्ला देण्यासाठीं पुष्कळ पैसा खर्चून सरकारनें तज्ञ आणविले आहेत, आणि आजपर्यंत कित्येक परिषदा झाल्या आहेत. पण त्यापासून शेतकऱ्यांचें किंवा शेतकीचें कोणतें हित झालें आहे तें दाखविणें फार कठीण आहे. तज्ञ येतात, देशाची माहिती करून घेतात, प्रयोग करतात, इंग्रजींत व्याख्यानें देतात, आणि नोकरीची मुदत संपली कीं पेनशन घेऊन स्वदेशीं चालते होतात. शेतकरी वर्ग अडाणी आहे तो आहेच सरकारच्या शेतकी कॉलेजांतून शेतकी खात्याला क्लार्क सारखीं कामें करणारे पदवीधर मिळतात, यापलीकडे कांहीं होत नाहीं, अशी कबुलीसुद्धां पुसाच्या परिषदेंत देण्यांत आली. यावरून सरकारचे उद्देश जरी चांगले असले तरी त्यांची पद्धति चुकल्यामुळें ते निष्फळ झाले आहेत असें ह्मणण्यास हरकत दिसत नाहीं. मग शेतकीच्या सुधारणेची खरी बरोबर पद्धत तरी कोणती? या प्रश्नाला उत्तर देण्याचें काम सोपें नाहीं. पण जपानसारख्या देशाचें उदाहरण डोळ्यापुढें ठेविलें ह्मणजे तें देतां येईल. तें उत्तर हें कीं परदेशाहून तज्ञ आणा, त्यांच्या हाताखालीं शेतकी खात्याला नव्हेतर शेतकामाला मदत होईल असे तरुण शेतकरी ( प्रत्यक्ष शेत वाहणारे ) तयार करा, आणि नुसती अमुक अमुक सुधारलेलीं आउतें वापरा ह्मणजे तुमचें काम होईल अस न सांगता ता महाग यंत्रें घेण्याची ऐपत शेतकऱ्यांमध्यें उत्पन्न करा, तर खरी शेतकीसुधारणा होईल. नुसती तज्ञांची संख्या वाढविण्यांत किंवा वारंवार परिषदा भरविण्यांत लाखों रुपयांचा चुराडा करण्यापासून कांहीं फायदा नाहीं. अलीबाग येथें सरदार बिवलकर यांनीं काढलेल्या शेतकीशाळा सारख्या शाळा प्रत्येक गांवीं काढा, सरकारी खर्चानें सुधारलेलीं आउतें आणून तीं सवलतीच्या भाड्यानें शेतकऱ्यांना द्या, त्यांचा उपयोग कसा करावयाचा तें प्रत्यक्ष दाखवा, ह्मणजेच कांहीं झालें तर होईल. अजून शेतकऱ्यांना न कळणाऱ्या भाषेंत व्याख्यानें देण्याची व मोठमोठाले अगडबंब रिपोर्ट छापून ते लायब्रऱ्यांच्या कपाटांत ठेवण्याची हौस पुरी झाली नसेल, तर ती पुरी होईपर्यंत व प्रथम शेतकऱ्यांची कर्जबाजारी स्थिति व नंतर अज्ञान दूर केल्याशिवाय हिंदुस्थानच्या शेतकीच्या सुधारणेचा प्रश्न असाच राहणार हें पक्कें समजून ठेवा.

## शेतकी परिषद.

**(तारीख २१ रोजीं सकाळीं ११ वाजतां येथें सराकिटहौस मध्यें भरलेल्या सभेचे प्रोसीडिंग.)**

सदर्हू सभा रा. रा. स्टॉडन साहेब कमिशनर वरार यांचे अध्यक्षतेखालीं भरली होती.

**विषय अः—**

सहकारी शेतकी यूनियनचे रिपोर्ट ऐकणे रा. विष्णु गणेश कुळकर्णी गायगांवकर हे ह्मणाले कीं गायगांव यूनियनमध्यें १९ मेंबर असून त्यांनीं ८०० एकर जमीन रोझीया कपाशीनें पेरली होती व त्यांत त्यांना सरकी विकून रु. ३००० फायदा झाला. हीच जर साधी सरकी असती तर १६०० रुपयेच फायदा झाला असता. ह्मणजे रोझिया सरकी पेरल्यानें नीव्वळ नफा

१५०० रु. झाला. सर्व मेंबरांना ही सरकी पेरल्यानें फायदा होतो हें कळून चुकले आहे व आतां इतर शेतकीच्या सुधारणेकडे लक्ष्य देणें जरूर आहे.

पिंपळगांव राजा येथील यूनियनचे चेअरमन मि. गुलाम अहमदखां यांनीं सांगितलें कीं २० मेंबरांना ५०० एकर जमीनीमध्यें २०० खंडी सरकी झाली व ही सरकी दर खंडीस ९ रु. ज्यास्त भावानें विकल्यामुळें १००० रुपये नफा झाला. व दर बोज्यामागें ३९ शेर कापूस जो ज्यास्त लागत होता तो वाचविला. यूनियनचा सर्व कापूस युनियनच्या जिनमध्यें गाळला जातो व सरकी प्रत्येक मेंबरांच्या वरीं सांठविली होती. गरीब मेंबरांना त्यांना कापूस पैशाच्या अडचणीमुळें सधन मेंबरांना विकावा लागला व या सवद्यांत प्रत्येक खंडीमागें त्यांना दुसऱ्या रीतीनें विकून जो भाव आला असतां त्यापेक्षां ३।४ रुपये अधिक मिळालें. कांहीं लोखंडी नांगर देखील यूनियनच्या डेपोमधून विकले गेले.

**विषय १ ब**

सदर्हू यूनियननें शेती सुधारणेचे कामीं ज्यास्त उपयोगीं कशीं करितां येतील याचा विचार करणें.

(१) रुईच्या गाठीं सहकारित्वानें मुंबईस विकणें. मे. डायरेक्टर ऑफ अग्रिकल्चर यांनीं सभेस यूनियनला गरीब मेंबरांचा कापूस विकत घेतां येईल किंवा नाहीं अगर अशा गरीब मेंबरांना पैशाची मदत देतां येईल किंवा नाहीं व सहकारित्वानें यूनियनचा कापूस विकण्यांत खराखरे फायदा आहे कीं काय या बद्दल विचार करण्यास सांगितलें. व यावर सर्व बाजूंनीं विचार केल्यावर असें ठरलें कीं सहकारित्वानें रोझिया कापूस विकण्यांत भाव चांगला मिळेल व दलाली वगैरे पासून देखील थोडासा बचाव होईल. परंतु त्या बरोबरच खालील अडचणी दिसून आल्या.

(अ) कोठे (Godowns) बांधण्याकरितां व गरीब मेंबरांना पैशाची मदत देण्याकरितां भांडवलाची वाढ करावी लागेल.

(ब) निरनिराळ्या मेंबरांनीं उत्पन्न केलेल्या कपाशीच्या गुणांत फरक पडेल.

(क) हा सट्याचा धंदा असल्यामुळें व भावांत चढ उतार होत असल्यामुळें यूनियनला नुकसानी येण्याचा संभव आहे.

(ड) धंदे वाईक लोकांशी जे लोक कपाशींत गाठीं बांधतांना रुई वजन वाढण्याकरितां भिजवून हलक्या मालांत भेसळ करितात अशा लोकांशीं चढा ओढ करतांना अडचण येईल.

(इ) तसेंच विम्याकरितां देखील बरीचशी रक्कम खर्च होईल.

सबब सर्व साधारण मत या सभेचे असें ठरलें कीं सहकारी रीतीनें कापूस विकण्याची वेळ युनियनला अद्याप आलेली नाहीं.

गायगांवचे रा. विष्णुपंत कुळकर्णी हे ह्मणाले कीं एकदम जर पुष्कळसा रोझिया कापूस बाजारांत विक्रीकारितां आणिला तर त्याला बाजार भावापेक्षां किंमत ज्यास्त येते सबब युनियनच्या सर्व मेंबरांनीं मिळून एकदम रुई विकणें सोईचे होईल व ही सूचना मताधिक्यानें पसंत ठरली. (२) खतांचा साठा वाढविणें व त्यांचा गुणधर्म सुधारणें. यावर गायगांवचे रा. विष्णुपंत कुळकर्णी यांनी अशी सूचना आणिली कीं प्रत्येक युनियन मेंबरानें काळजी पुरःसर शेणखत एक खड्डा करून त्यांत साठवावें. व मूत्र (Dry earth system) प्रमाणें सांठवावें. व गाई ह्मशी ज्यास्त बाळगाव्यांत व त्यांच्या करतां लागणाऱ्या हिरव्या चाऱ्या करितां ४ ते ८ एकर जमीन राखून ठेवावी. त्यांचे शेण व मूत चांगल्या रीतीनें खत होईल. त्याच प्रमाणें दुधा तुपा पासून फायदा होईल तो वेगळाच. मे. डायरेक्टर आफ अग्रिकल्चर यांनी गायगांव युनियनला एक शेत भाड्यानें द्यावयाचे ठराविलें. असून यांत एक कामदार नेमून बेर्सीम हिरवा अगर इतर चारा तयार करून दाखविण्याचें ठरविलें आहे. मात्र या प्रयोगाचा निकाल पुढले वर्षी काय होतो हे कळविले पाहिजे. योजनेचा परिणाम फायदेशीर वाटूं लागल्यास तिचा स्वीकार इतर युनियनांनी करण्याबलद्द शिफारस करण्यांत येईल.

(३) यूनियन फंड.

मे. डेप्युटी डायरेक्टर ऑफ अग्रिकल्चर यांनीं असें सुचविलें कीं दरसाल प्रत्येक यूनियननें आपल्या नफ्यापैकीं कांहीं भाग शेतीच्या सुधारणे करितां काढून ठेवावा. उदाहरणार्थ.

(अ) शेतीच्या औजारांची खरेदी करणें.

(ब) गुरांच्या चाऱ्याची वाढ करणें.

(क) डुकरांचा नाश करणें.

(ड) सरकी ढेप वगैरेसारखीं पौष्टिक खाद्यें शेतकऱ्यांसाठीं विक्रीस ठेवणें.

यावर बराच वादविवाद होऊन ही सूचना मान्य झाली व याच्या सविस्तर कामाची माहिती काढण्याकरितां मे. डेप्युटी डायरेक्टर आफ अग्रिकल्चरल मि. के. जे. देशमूख खामगांव व रा. विष्णुपंत कुळकर्णी गायगांव या तिघांची एक सब-कमिटी नेमण्यांत आली.

**विषय २ (अ)**

तालुका शेतकी परिषदेच्या गांवीं शेतकीची औजारांचा संग्रह ठेवणें.

मि. कुळकर्णी यांनीं अशी सूचना आणिली कीं या परिषदेनें नुसती औजारें संग्रहीं ठेवावी एवढेंच नव्हे तर त्यांनीं एक फिटर देखील त्यांच्या दुरस्तीकरितां ठेवावा. ही व्यवस्था शेतकी खात्याकडून एखाद्या तालुक्यांत प्रयोगा दाखल केली जाईल.

(ब) सुधारलेल्या औजारांचा लोकांत विशेष प्रसार होण्याकरितां त्यांचे फिरते प्रयोग व्हावयास पाहिजे.

**विषय ३**

बिन नोंदलेली यूनियनें विशेष लोकोपयोगी व त्यांचे मेंबरांस सुधारलेल्या शेतीची सहकारीत्वाचीं तत्वें शिकविण्यास काय मार्ग आहेत याचा विचार करणें.

मे० राजिस्ट्रार साहेब गैरहजर असल्यामुळें सभेला याबद्दल यूनियन इन्स्पेक्टरांची नेमणुकी करणें हे सुचविण्या पलीकडे कांहीं करतां येणें शक्य नव्हतें.

**विषय ४ (अ)**

तालुका शेतकी परिषदांना काय काय कामें करितां येतील याचा विचार करणें त्यांत असें ठरलें कीं सदरहू परिषदांनीं शेतकीची हत्यारें ठेवणें, त्यांचे दुरस्ती करितां एक खेडोखेडी हिंडणारा मिस्त्री ठेवणें. सरकारी शेतावर कामदाराना शिक्षण देण्यांत मदत करणें नवीन सीड यूनियनें काढणें शेतीची हत्यारें भाड्यानें देणें व युनियनचे बीं विकून देण्यांत मदत करणें. हीं कामें करावींत.

(ब) जिल्हा परिषदांच्या घटनें संबंधी विचार करणें.

बराच वाद झाल्यानंतर असें ठरलें कीं प्रत्येक जिल्हा परिषदेची अशारीतीनें पुनर्घटना करावी कीं हल्लींचे असलेले सर्व तहाहयात मेंबर त्यांत असावेत व प्रत्येक तालुक्यांतून निवडलेले १ सभासद असावेत. व प्रत्येक जिल्हा परिषदेतून ४ मेंबर्स वार्षिक शेतकी कान्फरन्सच्या अगोदर जी कमिटी भरते तींत असावेत.

**विषय ५**

बागाइती करितां माळ्यांची नेमणूक करणें फळझाडांच्या लागवडीची वाढ करण्या करितां दोन माहितगार माळ्यांची फार जरूरी आहे. व ते नेमले जावेत अशी सूचना खामगांवचे रा. के. जे. देशमुख यांनी आणिली. यावर वादाविवाद होऊन असें ठरलें कीं सध्या या कामाकरितां एकच माणूस पुरें आहे.

**विषय ६**

खामगांवचे रा. देशमुख यांनी अशी सूचना आणिली कीं जिल्हा बोर्डानीं दरसाल १०००।१२०० रुपयापर्यंतची रक्कम तालुका शेतकी परिषदेस देण्याकरितां जिल्हा शेतकी परिषदेच्या स्वाधीन करावेत. व ही सूचना मान्य झाली.

नंतर अध्यक्षांचे आभार मानण्यांत आल्यावर सभेचें काम आटोपलें.

# वऱ्हाडवृत्त.

**हवामान**—भावी ऊष्ण कालाचा प्रारंभ सुचविणारी ऋतुस्थिति थोडी अगोदरच भासूं लागली आहे. वसंताची बहार ही त्या मानानें एक महिनाभर अगोदरच अनुभवण्यास सांपडेल. प्लेगाच्या ठिकठिकाणच्या मंद मंद विस्ताराला प्रतिबंधच नाहीं. इतर रोगराई पासून आरोग्य बरेंच अलिप्त होत चाललें आहे.

रा. रा. श्रीधर व्यंकटेश केतकर पी. एच. डी. हे "महाराष्ट्रीय ज्ञानकोश" तयार करण्याच्या कामीं सध्या निमग्न आहेत आणि येथील सुशिक्षित वर्गाच्या त्यांनीं भेटी घेतल्या व आपली योजना लोकांपुढें मांडली आहे. हा एनसायक्लोपीडिया तयार करण्यासाठीं ते एक कंपनी काढणार असून त्यांत प्रत्येक शेअर १०० रुपयांचा असे ५०० शेअरचें भांडवल राहील. ही सर्व योजना फार काळजीपूर्वक तयार केली असून त्यांच्या प्रयत्नाला चांगलें यश येईल अशी आशा वाटते. हा भगीरथ उद्योग आहे आणि त्याला महाराष्ट्रांतील प्रमुख विद्वानांचें साह्य आहे. डाक्टर केतकर यांचा भव्य संकल्प सिद्धीस जाऊन जेव्हां त्याला वाङ्मयांतील प्रतिष्ठित ग्रंथांचें मूर्तरूप येईल. तेव्हां नव्या मराठी वाङ्मयाचा हा पायाच तयार होत आहे असें आह्मी समजतों. डाक्टर केतकर यांचें निवासस्थान सध्यां नागपूर हें आहे.

**वास्तुसमारंभ**— येथील लेडिहार्डिंज दवाखान्याच्या वास्तुसमारंभास गेल्या बुधवारीं श्रीमती सौभाग्यवती स्टॅाडनबाई यांच्या यशस्वी हातानें करण्यांत आला. स्त्री-पुरुषांचा मोठा समुदाय जमला असून इंग्रजी, मराठी व उर्दू भाषेंत या स्त्रियांच्या रुग्णालयाचा इतिहास सांगण्यांत आला व सर्वांनीं स्मित वदनानें आयुर्देवीची तेथें प्रार्थना करून अशा उत्कृष्ट संस्थेच्या द्वारानें दुःखशमन अधिकाधीक होत जावें अशा इच्छा सर्वतोमुखी प्रदर्शित झाली.

**पांचहजार रुपये बक्षिस.**

येथील अबकारी कान्ट्रक्टर रा. रा. महमद बशिरुद्दीन हे सुरापानाचा इतका तिटकारा करतात कीं जर कोणी त्यांस रात्रीं किंवा दिवसा सुरेच्या अमृत भांडाला संस्पर्श करतांना शोधून काढील तर ते या उपकृती बद्दल पांच हजार रुपये हरण्यास तयार राहतील. यांनीं येथील स्त्रियांच्या दवाखान्याला २१० दोनशेदहा रुपयांची वर्गणी दिली.

**सतीचा उपक्रम**—रा. रा. जानकीप्रसाद हर्दे माजी सबार्डिनेट जज्ज आकोला, हे आपल्या दुर्धर आजारावर उपचार करण्यास कलकत्याच्या कालेजांतील दवाखान्यांत होते. तेथेंच त्यांचा अंत झाला हें ऐकून अशा बुद्धिमान तरुण गृहस्थाविषयीं लोक फारफार हळहळतील. आणि त्यांतल्या त्यांत त्यांच्या मरणाच्या अगोदर दोन दिवस पतीची ही मरणावस्था पाहून निराशेनें त्यांच्या पत्नीनें राकेल तेल अंगावर ओतून घेतलें आणि त्या साध्वी सतीनें स्वर्गाचा रस्ता साफसूफ करण्यासाठीं ही आघाडी मारली !

## NOTICE

The Treasury officer is now prepared to issue and encash Universal Currency Notes and Home Notes (Bombay Circle) of other denominations for the public on demand as far as possible Endeavours will be made as far as possible in all trnsactions to meet the equ re uents of the payee as to the form of currency in which he desires to take payment.

The above orders do not yet apply to the Treasuries at Nagpur, Akola and Amraoti where Government treasury work is done by branches of Presidency Banks. As soon as arrangements are completed with the Banks concerned, a further notice will be issued giving the date from which free encashment of currency notes at these centres will be available.

हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवाश्रमांत छापून प्रसिद्ध केलें.